# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०६/ २०१५** **दिनांक ०५ मे, २०१५**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०५.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ०५.०५.२०१५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ७३९/ २०१५, दिनांक ०५ मे, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक ०५.०५.२०१५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १८.०३.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१४३** दिनांक १८.०३.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ श्रीरामनवमी उत्सव २०१५ चे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचा निर्णयः**

दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.०७ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*"सन २०१५ मधील श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्ताचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.*

सामान्य प्रशासन, उत्सव विभाग यांनी श्री रामनवमी उत्सवानिमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणा-या खर्चाचा समावेश श्रीरामनवमी उत्सवाचे अंदाजपत्रकामध्ये केलेला असल्यामुळे सदरहू खर्च वगळता प्रस्तावातील ब मध्ये नमूद केलेप्रमाणे उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणा-या अंदाजे रु.२१,६७,०७१/- मात्रचे खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन,मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले".

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे प्रतीवर्षी प्रमाणे याहीवर्षी दि.२७/०३/२०१५ ते दि.२९/०३/२०१५ अखेर "श्री" चा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर, भक्तनिवास (५०० रुम्स) परिसर, श्री साईनाथ रुग्णालय परिसर व जुने प्रसादालय या ठिकाणी तसेच मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी, गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा, व निमगांव- को-हाळे येथे कापडी/ शामियाना मंडप, कनात, बिछायत व विद्युत व्यवस्थेसह तात्पुरते उभारणी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**श्री रामनवमी उत्सव २०१५ करीता करावयाची मंडप व्यवस्था:-**

**(१) समाधी मंदिर, जुने प्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनगर इ. परिसरात करावयाचे मंडप, स्टेज, पार्टीशन, बॅरेकेटींग व दर्शनरांगेकरीता कनात इ. व्यवस्था**

**(कालावधी दि. २७/०३/२०१५ ते दि.२९/०३/२०१५)**

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण/एकक |
|---|---|---|
| ०१ | मंगल कार्यालय, तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलिस स्टेशन जवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे, तसेच कुस्ती ग्राउंडवर शामियाना मंडप उभारणे | ८२२० चौ.फुट |
| ०२ | साईनगर मैदानावर कलाकरांचे कार्यक्रमासाठी ३०'x२०' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ६०० चौ.फुट |
| ०३ | मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी १६'x२४' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ३८४ चौ.फुट |
| ०४ | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेटींग व्यवस्था | १५०० र.फुट |
| | अ (1) मधिल कामांकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु. | १,२५,९५०/- |

**(२) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी/ शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवस्थेसह व्यवस्था-**

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | परिमाण/एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | मुंबई ते शिर्डी मार्गावर खडी गोलभान, कसरा, बायपास, लतिफवाडी व घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ३१,६०० चौ.फुट | दि.२१/०३/२०१५ ते दि.२५/०३/२०१५ अखेर ०५ दिवस |
| ०२ | मुंबई ते शिर्डी मार्गावर सिन्नर, खोपडी, पांगरी व वावी येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ७६,६५१ चौ.फुट | दि.२२/०३/२०१५ ते दि.२६/०३/२०१५ अखेर ०५ दिवस |
| ०३ | मुंबई ते शिर्डी मार्गावर पाथरे व पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-को-हाळे येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवसथेसह | ३२,७३० चौ.फुट | दि.२२/०३/२०१५ ते दि.२६/०३/२०१५ अखेर ०५ दिवस |
| | अ (2) मधिल कामांकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु. | | ६,७५,४६०/- |
| | **श्री रामनवमी उत्सवाकरीता करावयाचे मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणारा एकूण अपेक्षीत खर्च (अ) रु.** | | **८,०१,४१०/-** |

श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन को-या निविदा फॉर्मची विक्री दि.०२/०२/२०१५ ते दि.१३/०२/२०१५ कार्यालयीन वेळेत तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.१६/०२/२०१५ रोजी सायं ०५:०० वाजेपर्यंत ठेवणेत आली होती. याकामी विहीत मूदतीत खालील मंडप ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

०१. जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी
०२. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर
०३. बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड
०४. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स अ.नगर
०५. झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, खैरी निमगांव
०६. साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर
०७. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०८. कु-हे टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०९. कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर
१०. रोकडे डेकोरेटर्स ॲण्ड केटर्स, अ.नगर
११. शेटे डेकोरेटर्स, शहापूर
१२. न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी

विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या मंडप ठेकेदारांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | २१७६४ | १४/०२/२०१५ |
| ०२ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर | २१८४९ | १६/०२/२०१५ |
| ०३ | न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी | २१८५० | १६/०२/२०१५ |
| ०४ | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड | २१८५१ | १६/०२/२०१५ |
| ०५ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, खैरी निमगांव | २१८५२ | १६/०२/२०१५ |
| ०६ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | २१८५३ | १६/०२/२०१५ |
| ०७ | कु-हे टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | २१८५४ | १६/०२/२०१५ |
| ०८ | जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी | २१८५५ | १६/०२/२०१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०९ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स अ.नगर | २१८५६ | १६/०२/२०१५ |
| १० | कल्याणी टेन्ट हाऊस, नांदुर | २१८५७ | १६/०२/२०१५ |
| ११ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | २१८५८ | १६/०२/२०१५ |
| १२ | रोकडे डेकोरेटर्स ॲण्ड केटर्स, अ.नगर | २१८५९ | १६/०२/२०१५ |

उपरोक्त प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयाचे कालावधीतील एकूण रु.२९,६८,४८१/- मात्र खर्चाचे मंडप व्यवस्थेकरिता एकत्रित मागविण्यात आलेल्या आहेत. सदरचे प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समितीचे सभेत उघडून त्यावर निर्णय होणेबाबत दि.१७/०२/२०१५ रोजीचे टिपणीद्वारे प्रस्ताव सादर केला होता. याबाबत दि.०९/०३/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., व मुख्यलेखाधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेत उन्हाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी येणारा अपेक्षित खर्च रु.२१,६१,०७१/- मात्र हा १० लक्ष पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी ई– निविदा मागविण्यात याव्यात. तसेच प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उपसमितीचे सभेपूढे उघडून त्यातील श्रीरामनवमी उत्सवातील मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकरिता वर नमूद तपशिलाप्रमाणे कामासाठी निविदेतील दराबाबत निर्णयार्थ प्रस्ताव सादर करावा अशी सुचना केली आहे.

तरी उपरोक्त प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा. उपसमिती सभेपूढे उघडून त्यातील श्रीरामनवमी उत्सवातील मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकरिता (उन्हाळा कालावधीचे मंडप वगळून) देऊ केलेल्या दरांबाबत प्राप्त झालेल्या १२ सिलबंद निविदेतील लिफाफा क्र.०१ आजचे आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत आला असता, त्यामध्ये फक्त ०४ निविदाधारक पात्र आढळून आल्याने त्यांच्या निविदेतील लिफाफा क्र.०२ उघडणेत आले असता, सदर पात्रताधारक निविदा सादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देवू केलेले आहेत.

त्यांच्या निविदेतील लिफाफा क्र.०२ उघडणेत आले असता सदर पात्रताधारक निविदा सादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देवू केलेले आहेत.

| अ. नं. | कामाचा तपशिल | ठेकेदारांचे नाव | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शेटे डेकोरेटर्स, शहापूर | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स अ.नगर | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | रोकडे डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स, अ.नगर |
| | | निविदेमधील मुळ दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. | निविदेमधील मुळ दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. | निविदेमधील मुळ दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. | निविदेमधील मुळ दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. |
| १ | मंगल कार्यालय, पालखी स्वागतासाठी तसेच कुस्ती ग्राऊंडवर शामियाना मंडप उभारणे. ८२२० चौ. फुट (कालावधी ३ दिवस) | --- | ५.०० | ४.०० | **२.३५** |
| २ | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमा साठी स्टेज व्यवस्था ६०० चौ. फुट (कालावधी ३ दिवस) | - | ५०.०० | ३५.०० | **३०.००** |
| ३ | मंदिर परिसर सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था ३८४ स्क्वे.फुट (कालावधी ३ दिवस) | -- | ५०.०० | ३५.०० | **२५.००** |
| ४ | दर्शन व भोजन व्यवस्था बॅरेकेडींग १५०० र. फुट (कालावधी ३ दिवस) | - | १५.०० | १०.०० | **८.००** |
| ५ | खर्डी गोलभान ते घोटी मार्गावर कापडी मंडप ३१६०० चौ. फुट (कालावधी ५ दिवस) | २.९५ | ५.०० | ४.५० | **१,८५** |
| ६ | सिन्नर ते वावी मार्गावर शामियाना मंडप ७६६५१ चौ. फुट (कालावधी ५ दिवस) | - | ५.०० | **२.५०** | ३.०० |
| ७ | पाथरे ते निमगांव को-हाळे मार्गावर शामियाना मंडप ३२७३० चौ. फुट (कालावधी ५ दिवस) | - | ६.०० | २.२५ | **१.६०** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दराचे मंडप ठेकेदार रोकडे डेकारेटर्स ॲण्ड केटरर्स, अ.नगर व रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापुर यांनी आजचे सभेपुढे श्री रामनवमी उत्सवानिमित्त श्री साईबाबांच्या चरणी सेवा म्हणून त्यांचे निविदा दरामध्ये आणखी सवलत देऊ केली. त्यानुसार येणारे दर खालीलप्रमाणे-

| अ. नं. | कामाचा तपशिल | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | | रोकडे डेकोरेटर्स ॲण्ड केटरर्स, अ.नगर | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील मुळ दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. | सवलत दिल्यानंतरचे दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. | निविदेमधील मुळ दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. | सवलत दिल्यानंतरचे दर प्रती दिन, प्रती चौ.फुट रु. |
| १ | मंगल कार्यालय, पालखी स्वागतासाठी तसेच कुस्ती ग्राऊंडवर शामियाना मंडप उभारणे. ८२२० चौ. फुट (कालावधी ३ दिवस) | --- | --- | २.३५ | **१.३०** |
| २ | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था ६०० चौ. फुट (कालावधी ३ दिवस) | --- | --- | ३०.०० | **३०.००** |
| ३ | मंदिर परिसर सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था ३८४ स्क्वे.फुट (कालावधी ३ दिवस) | --- | --- | २५.०० | **२०.००** |
| ४ | दर्शन व भोजन व्यवस्था बॅरेकेडींग १५०० र. फुट (कालावधी ३ दिवस) | --- | --- | ८.०० | **६.००** |
| ५ | खर्डी गोलभान ते घोटी मार्गावर कापडी मंडप ३१६०० चौ. फुट (कालावधी ५ दिवस) | --- | --- | १,८५ | **१.८०** |
| ६ | सिन्नर ते वावी मार्गावर शामियाना मंडप ७६६५१ चौ. फुट (कालावधी ५ दिवस) | २.५० | **१.०५** | --- | --- |
| ७ | पाथरे ते निमगांव को-हाळे मार्गावर शामियाना मंडप ३२७३० चौ. फुट (कालावधी ५ दिवस) | --- | --- | १.६० | **१.०५** |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव २०१५ करिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्त तक्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच श्री रामनवमी उत्सव काळात ऐनवेळी काही वाढीव मंडपाची आवश्यकता भासल्यास सदर वाढीव मंडप वरील मंजूर दराने करुन घेण्यास व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०२ श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांचे गणवेश शिलाईकामी प्राप्त निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

मा.व्यवस्थापन सभा दि.18/07/2012 नि.क्र.600 अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.3,44,594/- चे खर्चास मान्यता मिळाली होती, त्यास अनुसरुन इकडील पत्र क्र.2460 दि.14/08/2012 अन्वये 15 पुरवठाधारकांना कोटेशन पत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार एकुण 6 पुरवठाधारकांचे कोटेशन व नमुने प्राप्त झालेले होते. सदर कोटेशन दि.08/12/2012 रोजी उघडण्यात आले होते त्याचा तुलनात्मक तक्ता दि.26/02/2013 रोजी मा.त्रिसदस्य समिती सभेसमोर चर्चा/वाटाघाटीसाठी सादर करण्यात आला होता. यावर चर्चा होऊन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश खरेदी करणेकामी सामान्य प्रशासन विभागाकडे नेमणुक करणेत येणाऱ्या ड्रेस डिझाईनरच्या सल्याने कापडाची कंपनी,रंग,व कोड नंबर यांची निवड करुन कापड कंपनीकडुन अधिकृत विक्रेत्याकडुन विहीत पध्दतीने कापड खरेदी विहीत पध्दतीने करणेत

यावे व तदनंतर फक्त गणवेश शिलाईसाठी कोटेशन मागविणेत येऊन कर्मचाऱ्यांची मापे घेऊन गणवेश तयार करणेत यावे असे ठरले.

त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी सो. व उपकार्यकारी अधिकारी सा ो. यांनी दि.30/03/2013 रोजी अहमदनगर येथील रेमंड कंपनीचे शोरुममध्ये समक्ष सर्व कापडाचा नमुना निवडुन मा.जिल्हाधिकारी सा ो. यांचेशी चर्चा करुन मान्य करुन घेतला होता. रेमंड कंपनीचे कापडाच्या नमुन्याचे पुणे,व मुंबई,अहमदनगर येऊन कापडाचे व शिलाईचे कोटेशन समक्ष आणलेले होते. कापड खरेदीचे 3 व शिलाईचे 3 असे एकुण 6 कोटेशन मा.व्यवस्थापन सभा दि.18/10/2013 चे सभेपुढे उघडण्यात आले होते. यावर सविस्तर चर्चा होऊन गणवेश खरेदीकामी रु.13,72,039/- व शिलाईकामी रु.4,31,440/- अशाप्रकारे खर्चास मान्यता देऊन याकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात तसेच याकामी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन कार्यवाही करणेत यावी असे ठरले.

त्यानुसार कोर्टाची मान्यता घेऊन सदर गणवेश खरेदीकामी आपला वार्ताहर- मुंबई, पुढारी-पुणे, पुण्यनगरी-औरंगाबाद, सार्वमत-अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यानुसार दि.17/03/2014 ते 29/03/2014 पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होते तर दि.01/04/2014 अखेर तांत्रिक सिलबंद निविदा स्विकारणेची मुदत होती. त्यास अनुसरुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदीकामी एकूण 03 सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या होत्या, सदर ई-कमर्शियल निविदा मा.त्रिसदस्य समिती सभा दि.11/09/2014 रोजी उघडण्यात आल्या असुन दरांमध्ये आणखी सुट मिळणेकरीता मा.कार्यकारी अधिकारी/ मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेसमोर बोलविणेत यावे व त्यांचेकडून अंतीम निम्नत्तम दर घेण्यात येऊन,त्या दरानुसार त्यांना कार्यादेश देणेत यावा असे ठरले.

त्यानुसार मा.उपकार्यकारी अधिकारी सो .यांचेसमोर मे.राजेंद्र क्लॉथ,राहुरी यांना बोलवुन व त्यांचेशी चर्चा केल्यानंतर मे.राजेंद्र क्लॉथ, राहुरी यांना पुरवठा आदेश इकडील पत्र क्र.2948 दि.27/11/2014 अन्वये देण्यात आलेला आहे.

मा.त्रिसदस्य समिती सभा दि.18/10/2013 रोजीचे सभेत गणवेश शिलाईसाठी कोटेशन मागविणेत येऊन कर्मचाऱ्यांची मापे घेऊन गणवेश तयार करणेत यावे असे ठरले. त्यामुळे शिलाईकरीता पुढारी-अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तसेच दि.09/01/2015 ते 22/01/2015 पर्यंत व www.shrisaibabasansthan.org या संकेत स्थळावर उपलब्ध होती तर दि.24/01/2015 अखेर निविदा स्विकारणेची मुदत होती. त्यास अनुसरुन एकुण 6 सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| 1 | शिरडी कार्यालय | 06 |
| 2 | मुंबई कार्यालय | -- |
| | एकूण निविदा | 06 |

| अ. नं. | पुरवठाधारकाचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| 1 | मे.स्टिचवेल मेन्स वेअर,लोणी | (2 बंद निविदा प्राप्त 23.01.2015) |
| 2 | मे.साईसागर गारमेंन्ट,नाशिक | (1 बंद निविदा प्राप्त 23.01.2015) |
| 3 | मे.साईदिप लेडीज टेलर,राहाता | (2 बंद निविदा प्राप्त 24.01.2015) |
| 4 | मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे | (1 बंद निविदा प्राप्त 23.01.2015) |
| 5 | मे.प्रिया गारमेंट,नाशिक | (2 बंद निविदा प्राप्त 23.01.2015) |
| 6 | मे.आर.के.कलेक्शन,नाशिक | (2 बंद निविदा प्राप्त 24.01.2015) |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे 02 धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांचे गणवेश शिलाईकामी प्राप्त निविदा झालेल्या 6 सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **Sr. No** | **Type of Uniform / Description** | **M/s. R.K. Collection, Nashik** | **M/s. Stitchwell, Loni** | **M/s. Saisagar, Nasik** | **M/s. Saideep** | **M/s. Bhantia, Pune** | **M/s. Priya Nashik** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Rate per in Rs** | **Rate per in Rs** | **Rate per in Rs** | **Rate per in Rs** | **Rate per in Rs** | **Rate per in Rs** |
| 1 | Full Apran (For Consultant)<br>Three pocket-One upper side pocket,2 below both side<br>120 Nos. | 80/- | 125/- | **54/-** | 175/- | 90/- | 110/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Half Apran (For C.M.O., R.M.O, Technician, Sister, Brother, M.S.W.) Three pocket, One upper side pocket, 2 below 640 Nos. | 70/- | 115/- | **49/-** | 165/- | 75/- | 102/- |
| 3 | Salwar & Kudta (Sister) 342 Nos. | 125/- | 125/- | **75/-** | 155/- | 130/- | 240/- |
| 4 | Pant & shirt (Half) (Accountant, Pharmacist, Jr. Bio. Med. Engineer) Pant-2, Side pocket, 2 back pocket & Inner pocket-1, Shirt-1, pocket. 24 Nos. | 200/- | 310/- | **150/-** | --- | 210/- | 250/- |
| 5 | Pant & Shirt (Half) (Brother, O.T. Assistant) Pant-2, Side pocket, 2 back pocket & 1 Inner pocket-1, Shirt-1, pocket. 44 Nos. | 200/- | 310/- | **150/-** | --- | 210/- | 250/- |
| 6 | Pant & Shirt (Full) (Sr. Manager & Sr. Bio Med.Engineer) Pant-2, Side pocket, 2 back pocket & 1 Inner pocket-1, Shirt-1, pocket. 20 Nos. | 225/- | 330/- | **160/-** | --- | 240/- | 290/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांचे गणवेश शिलाई करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील मे.साईसागर गारमेंन्ट, नाशिक यांचे प्रती नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना सदरहूकामाचा कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०३ श्री साई प्रसादालयाकडील मालवाहु लिफ्ट व पॅसेजर लिफ्टचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेबाबत**

मे.ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना श्री साई प्रसादालयात माल वाहतुकीकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट् व व्ही.आय.पी. भोजन कक्षाकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक पॅसेजर लिफ्ट पुरविणे व बसविणेकामी एसएसएस/विद्युत/9237/2007 दिनांक 23/06/2007 अन्वये रुपये 30,41,000/- रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता.

मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड यांनी श्री साई प्रसादालयामध्ये मालवाहतुकरीता कोलॅप्सीबल डोअर्सचे एक लिफ्ट् व पॅसेजरकरीता स्टेनलेस स्टील डोअर्सचे एक लिफ्ट् बसवून कार्यान्वित केल्या आहेत. लिफ्ट् चालू झाल्यानंतर त्यांनी टेंडरमधील कार्यादेशातील अटीनुसार प्रथम वर्षी फ्री सर्व्हीस दिली आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षी आपण लिफ्ट् बसविलेल्या कंपनीलाचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देत असतो.

मागील वर्षी या दोन्ही लिफ्टसाठी दिनांक 01/04/2014 ते 31/03/2015 या कालावधीसाठी सर्व करांसहीत रुपये 1,98,196/- इतक्या रकमेस देण्यात आलेले होते. त्याची मुदत दिनांक 31/03/2015 रोजी संपणार आहे.

जर रिस्क् कॉन्टॅक्ट् (रिस्क् प्रोटेक्शन् कॉन्ट्रॅक्ट् टाईप) केलेले नसेल आणि मशीनरीला मेकॅनिकल प्रॉब्लेम आले व मशीनरीचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्सचे वेगळे बील भरावे लागते. शिवाय हे स्पेअर्स लगेच उपलब्ध् होतील याची शाश्वती नसते.

या रिस्क् कॉन्ट्रॅक्ट् टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट्मध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स हे रिस्क् प्रोटेक्शन् कॉन्ट्रॅक्ट् टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् असल्याने त्या स्पेअर्सची कोणतीही किंमत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून दरमहा कंपनीचा प्रशिक्षित एक्स्पर्ट मेकॅनिल येऊन मशीनरीची साफसफाई करुन सेटींग करुन देत असतो. जेणेकरुन लिफ्ट् सुरळीत चालू राहणे शक्य् होणार आहे. सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (रिस्क् प्रोटेक्शन् कॉन्ट्रॅक्ट् टाईप) पिरिअडमध्ये मशीनरीचा कोणताही मेकॅनिकल पार्ट नैसर्गिकरित्या (मशीनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास ती बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड, मुंबई यांनी दिनांक 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधी (रिस्क् प्रोटेक्शन् टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट्) करीता खालीलप्रमाणे रकमेचा खर्च कळविलेला आहे.

| Unit Number | Maintenance Charges for the Period | | Basic Amount | Tax Amount | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| | From | To | (Rs) | (Rs.) 16.44203% | (Rs.) |
| M9667 | 01 April 2015 | 31 March 2016 | 1,10,669/- | 18,196/- | 1,28,865/- |
| M9668 | 01 April 2015 | 31 March 2016 | 79,048/- | 12,997/- | 92,045/- |
| | | Total : | 1,89,717/- | 31,193/- | 2,20,910/- |

दिनांक 20/05/2007 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 386 अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरीचे (उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागाकडील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअर कंडीशनरस्, वायुवीजन यंत्रण वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् अथवा रिस्क् प्रोटेक्शन् टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

तरी उपरोक्त् ठरावानुसार लिफ्टचे उत्पादक कंपनी मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना श्री साई प्रसादालयाकडील दोन्ही लिफ्टचे 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेस व याकामी त्यांनी कळविलेली एकत्रीत रक्कम् रुपये 2,20,910/- (दोन लाख, वीस हजार, नऊशे दहा) मात्र ॲडव्हान्स् रक्कम् मे. ओटीस इलेव्हेटर कंपनी (इंडिया) लि., मुंबई यांना अदा करणेचा प्रस्ताव मा. उप-समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील मालवाहु व पॅसेजर लिफ्टचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेसाठी AMC अंतर्गत कोणत्या बाबींचा समावेश होतो. मागील वर्षी कोणते स्पेअरपार्ट बदलले, मागील वर्षापेक्षा चालु वर्षामध्ये AMC रकमेत किती टक्के वाढ झाली याचा उल्लेख करणेत येऊन, सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**०४ लाडूपॅकिंग मशिनसाठी लाडू ठेवणेकरिता प्लास्टीक कप (ट्रे) खरेदीबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियम २१ (१घ) नूसार साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रस्तावीत-** संदर्भ क्र. ०१ अन्वये श्री अन्सीलरी इंडस्ट्रीज मुंबई यांचेकडून लाडू पॅकिंग मशिन देणगी स्वरुपात मिळालेले आहे. दिनांक २४/१२/२०१४ रोजी मशीनचे मॅकेनिकल विभागामार्फत उभारणी करुन मान्यवरांचे हस्ते पुजन करणेत आलेले आहे.

साईभक्तांना लाडु प्रसाद कॅन्टीन विभागामार्फत विक्री करणेत येत आहे. सदरचे मशीनमुळे साईभक्तांना लाडू प्रसाद तत्परतेने च मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देणेस मदत होईल. सदरचे लाडू पॅकिंग मशीनला ०३ नग लाडू ठेवणेसाठी प्लास्टिक कप ( ट्रे ) कपाची आवश्यक आहे. प्लास्ट्रिक कपामुळे लाडू पॅकिंग करतेवेळी लाडू फुटणार नाही. व भक्तांना प्रसाद लाडू देतेवेळी प्लास्ट्रिक कपामुळे लाडू सुरक्षित राहातील.

लाडू मशीनला लाडू ठेवणेकामी खालिल तपशिलाप्रमाणे प्लास्टिक ट्रे खरेदी करावे लागतील.

१) PVC फुड ग्रेड मटेरियल

२) १०० - २०० मायक्रॉन.

३) 150 mm length, 25 mm hight, 50 mm – width.

**मागणी**– दररोज सरासरी २०,००० नग लाडू प्रसाद पॅकेटची विक्री होते. साधारण: ३ महीने म्हणजे ९० दिवसासाठी प्लास्टिक कप (ट्रे) खरेदी करावे लागतील. एका ट्रे साठी साधारणत: ०.५० पैसे खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च खरेदी विभागाचे बजेट तरतुद खर्चातुन प्लॅस्टिक कप) (ट्रे) खरेदी करता येतील. त्याचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत** – खालिल तपशिलाप्रमाणे प्लास्ट्रिक कप ( ट्रे) खरेदी करावे लागतील.

| ०१ दिवसास खर्च कप | एकुण दिवस | दर प्रती कप | एकुण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| २०.००० | ९० | ०.५० पैसे | ९०००००/- |

एका दिवसाला २०,०००/- नग प्लास्टिक कप ( ट्रे) ची आवश्यकता असून ३० दिवसाला ६,००,०००/- नग व ९० दिवसाला १८००००० कप लागतील प्लास्ट्रिक कपासाठी .०५० पैसे प्रमाणे एकुण खर्च रु९०००००/- (अ.रु नऊ लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत होणेस मान्यता असावी.

सदरचा प्रस्ताव मा. उपसमिती सभेपुढे निर्णयार्थी सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, लाडूपॅकिंग मशिनसाठी लाडू ठेवणेकरिता आवश्यक असलेले प्लास्टीक कप (ट्रे) खरेदीचा सन २०१५-२०१६ चे वार्षिक खरेदीमध्ये समावेश करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-लाडूप्रसाद निर्मिती विभाग)

---

**०५ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रयोगशाळा साहित्य खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती दि.१२.०६.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.५१४ नुसार खालील नमुद केलेप्रमाणे विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु. १,५०,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे.

जा.नं.वशी-खरेदी/२१२२ दि.१८/०८/२०१४ चे पत्रातील कार्यपध्दती टप्पा क्र.३ मधील अ.नं. ७ मध्ये नमुद केलेनुसार प्राप्त निविदा मधील तांत्रिक निविदा (Technical Bid) नं.१ व दरपत्रक (Commercial Bid) नं.२ सिलबंद पाकिटे एकच निविदा मा. उपसमितीचे सभेपुढे दि.०२/०३/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आली आहे. श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयकडील दि.११/०२/२०१५ ची मंजूर टिपणी नुसार राज सायटिफिक्स, नागपुर यांचे तांत्रिक निविदा (Technical Bid) नं.१ उघडून निविदेतील अटी व शर्तीनुसार लेखाशाखा विभागाकडून तांत्रिक निविदा (Technical Bid) नं.१ चे पाकिट तपासून घेणेत आले आहे. अटी- शर्तीनुसार ते साहित्य खरेदीकामाचा पुरवठा आदेश देणेस पात्र आहे. त्यांना सोबतचे दरपत्रक तक्यात नमुद केलेप्रमाणे खालील प्रयोगशाळा साहित्य खरेदी मटेरियल पुरवठा आदेश देणे आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | A) Physics Laboratory Requirement- १ ते ३२ प्रयोगशाळा साहित्य खरेदीकामी | ९२२४१.०० |
| २ | B) Chemistry Laboratory Requirements -१)अ.क्र.१ ते ४० चे प्रयोगशाळा साहित्य | १२९४०.०० |
| | २) अ.क्र.१ते २८ ग्लास वेअर मटेरियल | २४५२१.०० |
| ३ | C) Biology Laboratory Requirements- अ.क्र.१ ते २८ चे प्रयोगशाळा साहित्य | ३१२९६.०० |
| | **एकूण रुपये -** | **१,६०,९९८.००** |

अक्षरी रुपये – एक लाख,साठ हजार, नऊशे, अठयान्नव मात्र

वरील अ.क्र.०१ ते ३ मध्ये नमुद केलेप्रमाणे मे. राज सायटिफिक्स, नागपुर यांचेकडून प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकूण रुपये १.६०९९८/- (अक्षरी रुपये – एक लाख, साठ हजार,नऊशे अठयाण्णव) मात्र रक्कमेचा पुरवठा आदेश देणेस तसेच त्यांचे वाढीव जादाचे रुपये १०,९९८/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय)

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयातील मेल जनरल वॉर्ड विभागाकरीता मंजूर दराने I/V Stand खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील मेल जनरल वॉर्ड विभागाने दि.२३/०१/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि.३०/०१/२०१५) रोजीचे मागणी पत्रान्वये २० नग I/V Stand ची मागणी केलेली आहे.

सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल/ कार्यालयीन फर्नीचरची मागणी केलेली होती. त्यामध्ये I/V Stand ची देखील मागणी आहे.

उपरोक्त फर्नीचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ७,९९,४२१/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२८/०८/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.७२४ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरिता फर्नीचर खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.७,९९,४२१/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्रि प्रेस जनरल-मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश-पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी– औरंगाबाद या वर्तमानपत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकुण ७२ उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन येथील कार्यालयात ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालील प्रमाणे–

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Quali Surge Surgical Pvt. Ltd., Pune | 22/11/2014 |
| 2. | M/s. Sanjivani Hospital Furniture, Pune | 24/11/2014 |
| 3. | M/s. Sai Enterprises, Shrirampur | 25/11/2014 |
| 4. | M/s. Austin Healthcare, Pune | 25/11/2014 |
| 5. | M/s. Axenic Labs Pvt. Ltd., Nashik | 25/11/2014 |
| 6. | M/s. Janak Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ सिलबंद तांत्रिका निविदा दि.०६/०१/२०१५ रोजी मा. उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. त्यास अनुसरुन एकुण ०५ निविदा तांत्रिक दृष्टया पात्र असून सदर खरेदीकामी कमर्शियल निविदा उघडण्याचा प्रस्ताव मा. उप समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला आहे. सदर खरेदीमध्येच मेल जनरल वॉर्ड विभागाकरिता लागणारे २० नग I/V Stand मंजुर दराने खरेदीस मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील मेल जनरल वॉर्ड विभागाकरीता खरेदी करावयाच्या I/V Stand च्या दराबाबत चौकशी करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०७ श्री साईबाबा रुगणालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाकरीता मंजूर दराने सर्जिकल साहित्य खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाने दि.२७/०१/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि.२८/०१/२०१५) रोजीचे मागणी पत्रकान्वये सर्जिकल साहित्याची मागणी केलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे–

| Sr. no. | Description | Qty. |
|---|---|---|
| 1. | Ommaya Reserwier (Large) | 05 Nos. |
| 2. | EVD Drain | 05 Nos. |
| 3. | Raney Clip | 50 Nos. |

दि.०८/०१/२०१४ रोजीच्या मा. त्रिसदस्य समिती निर्णय क्र.०६ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाकरिता आवश्यक असणारे सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी मे.सुमिरण एन्टरप्रायझोस, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले आहे. त्यानुसार इकडील पत्र ७१३७ दि.१०/०२/२०१४ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पुन्हा न्युरो ओ.टीत अशाच प्रकारचे लागणारे सर्जिकल साहित्य वरील मंजुर दराने खरेदी करता येतील. मंजुर दराने सदर सर्जिकल साहित्य खरेदीकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. no. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Ommaya Reserwier (Large) | 05 Nos. | 3206.25 | 16031.25 |
| 2. | EVD Drain | 05 Nos. | 5343.75 | 26718.75 |
| 3. | Raney Clip | 50 Nos. | 1068.78 | 53439.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **96189.00** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०८ श्री साईबाबा रुगणालयातील ऑर्थो ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता सर्जिकल Implant खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थो ऑपरेशन थिएटर या विभागाने दि.२९/०१/२०१५ रोजीचे मागणी पत्रकान्वये सर्जिकल Implant ची मागणी केलेली आहे. कारण सध्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत गरिब व गरजु रुग्ण दाखल होतात तसेच योजनेअंतर्गत आपणास रुग्णास सर्व प्रकारचे उपचार हे मोफत करावे लागतात. सदर Anchor screw चा वापर हा पेशंटचा खांदा निखळल्यावर तो जोडण्यासाठी वापरतात तसेच तेथील नसही तुटून जाते त्यावेळेस तेथील खांदा व्यवस्थित राहण्यासाठी (Stabilisation for shoulder) वापर होतो, Endobutton चा वापर पेशंटच्या गुडघ्यामधील स्नायु तुटल्यावर त्याला व्यवस्थित भक्कम करण्यासाठी वापरतात.

त्यामुळे त्यांनी खालील प्रमाणे सर्जिकल Implant ची मागणी केलेली आहे.

| Sr.No. | Description | | Qty. |
|---|---|---|---|
| 1. | Titanium Enterferance Screw (each 10 pc) | 8 mm (20mm/25mm/30mm)<br>9mm(20mm/25mm/30mm)<br>10mm(20mm/25mm/30mm) | 120 |
| 2. | Titanium Endobutton (50pc) | Standard | 50 |
| 3. | Endobutton CL with Ti-polyster loop Sterile (Insta button) (each 2 pc) | 14mm/16mm/18mm/20mm/22mm/ 24mm/26mm/28mm/30mm | 18 |
| 4. | Anchor Suture Imported (each 5 pc) | 3.5mm/5mm | 10 |
| 5. | Anchor Suture Regular Titanium (each 15 pc) | 3.5mm/5mm | 30 |

उपरोक्त सर्जिकल Implant खरेदीकामी M/s. Saili Surgical, Shirdi यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यास अनुसरुन त्यांनी दि.०३/०२/२०१५ रोजी दरपत्रक दिले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Description | Size | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Titanium Enterferance Screw (each 10 pc) | 8 mm (20mm/25mm/30mm)<br>9mm(20mm/25mm/30mm)<br>10mm(20mm/25mm/30mm) | 120 | 1800.00 | 216000.00 |
| 2. | Titanium Endobutton (50pc) | Standard | 50 | 1800.00 | 90000.00 |
| 3. | Endobutton CL with Ti-polyster loop Sterile (Insta button) (each 2 pc) | 14mm/16mm/18mm/20mm/22mm/24mm/26mm/28mm/30mm | 18 | 10500.00 | 189000.00 |
| 4. | Anchor Suture Imported (each 5 pc) | 3.5mm/5mm | 10 | 14300.00 | 143000.00 |
| 5. | Anchor Suture Regular Titanium (each 15 pc) | 3.5mm/5mm | 30 | 1800 | 54000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | | **692000.00** |

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थो ऑपरेशन थिएटर विभाग यांचे दि.२९/०१/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि.०६/०२/२०१५) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय–** तरी वरीलप्रमाणे सर्जिकल Implant विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.६९२०००/- चे खर्चास तसेच सदर प्रस्तावास मान्यता असावी

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थो ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सर्जिकल Implant विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु.६,९२,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०९. समूह जनता अपघात विमा योजना दरपत्रके उघडून अंतिम निर्णय घेणेबाबत.**

मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने संस्थान कर्मचा-यांसाठी समुह जनता अपघात विमा योजनेचा कालावधी संपलेला असल्याने पुढील कालावधीसाठी सदरची योजना लागू करणेकामी विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती.

त्यानुसार खालील विमा कंपन्यांनी दरपत्रके बंद पाकीटात सादर केलेली आहेत. सध्या संस्थानमध्ये २१६८ कर्मचारी आहेत. याकामी अंदाजे तीन लाख रुपये खर्च अपेक्षीत आहे.

तरी खालील विमा कंपन्यांची बंद पाकीटातील दरपत्रके अवलोकन करुन अंतिम निर्णय करणेसाठी बंद पाकीट उघडणे व सोबतच्या तुलनात्मक तक्त्यावर निर्णय होणेस विनंती.

| अ.नं. | कंपनीचे नावं | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि., शाखा-राहुरी | ११२६ | ०८.०१.२०१५ |
| २. | दि. न्यु इंडिया ॲश्यूरन्स कं. लि., शाखा-श्रीरामपुर | ११३७ | १०.०१.२०१५ |
| ३. | दि. ओरिएण्टल इंश्योरेंस कं. लि., शाखा-कोपरगाव | ११९४ | २४.०१.२०१५ |
| ४. | युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि., शाखा-राहुरी | ११९५ | २४.०१.२०१५ |
| ५. | युनायटेड इंडिया इन्श्यूरेन्स कं. लि., शाखा-राहुरी | १२०० | २७.०१.२०१५ |

समूह जनता अपघात विमा योजना राबविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात येऊन, त्यांमधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **पुरवठाधारकांचे नांव** | **पॉलसी प्रकार (कालावधी )** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ वर्ष (प्रत्येक व्यक्ती) विमा क्लेम रु. १ लाख | ३ वर्ष (प्रत्येक व्यक्ती) विमा क्लेम रु. १ लाख | ५ वर्ष (प्रत्येक व्यक्ती) विमा क्लेम रु. १ लाख | १ वर्ष (प्रत्येक व्यक्ती) विमा क्लेम रु.२.५ लाख |
| ०१ | युनायटेड इंडिया, इन्श्यूरेन्स कं. लि., शाखा राहुरी | ३६/- | <u>९६/-</u> | -- | -- |
| ०२ | दि.न्यु इंडिया ॲश्यूरन्स कं. लि., शाखा श्रीरामपूर | ४८/- | -- | -- | -- |
| ०३ | दि.ओरिएण्टल इंश्योरेंस कं.लि., शाखा कोपरगांव | ४७/- | १२७/- | १८९/- | -- |
| ०४ | युनायटेड इंडिया इनश्येरेन्स कं.लि., शाखा राहुरी | -- | -- | -- | १००/- (फक्त मुत्यु ) १३५/- (मुत्यु व अवयव गेल्यास) |
| ०५ | युनायटेड इंडिया इन्शयुरेन्स कं.लि., शाखा शिर्डी | ४२/- | १२०/- | १७०/- | -- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचा-यांसाठी समुह जनता अपघात विमा योजना राबविणेकामी युनायेटड इंडिया इन्श्युरेन्स कं. लि.,शाखा राहुरी यांचे ३ वर्ष कालावधीसाठी (प्रत्येक व्यक्ती) विमा क्लेम रु.१ लाख मात्र करिता रु.९६/- हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कामगार विभाग, रुग्णालये व शैक्षणिक संस्था)

---

**१०. वाहनांच्या विमा पॉलिसी नूतनीकरण करणेकामी प्राप्त निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**अधिनियम-२००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ).

**प्रस्ताविका:-** दि.१८/०२/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४९ नुसार, वाहन विभागाकडील एकुण ७८ वाहनांचा विमा दि.३१.०३.२०१५ पुर्वी नुतनीकरण करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

वाहन विभागाकडील वाहने वेगवेगळया मॉडेल व आसन क्षमतेचे आहेत. त्याकरीता कार्यालयीन, रुग्णवाहीका, मालवाहतुक या वाहनांकरीता वेगळ्या व सर्व बसेस करीता वेगळया अशा दोन स्वतंत्र निविदांची वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून मागणी करणेत यावी, असे ठरले.

संदर्भ क्र.०२ चे मंजुर टिपणीनुसार, वाहन विभागातील सर्व वाहनांचा विमा पॉलिसी नुतणीकरण करणे कामी निविदा सुचना जनंसपर्क कार्यालयामार्फत दि.०७/०३/२०१५ रोजीचे सार्वमत वृत्तपत्रात तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दि.०८/०३/२०१५ ते दि.१२/०३/२०१५ अखेर वाहन विभागातुन (०१) २३ बसेस करिता व (०२) ५५ वाहने (कार्यालयीन, मालवाहतुक व रुग्णवाहीका) वाहनांचा विमा पॉलिसी नुतनीकरणाच्या दोन वेगवेगळया स्वतंत्र अ.नं. ०१ ते ०५ निविदांची विक्री करण्यात आलेली होती. त्यानुसार, दि.१४/०३/२०१५ अखेर खालील प्रमाणे ०४ निविदाधारकांच्या प्रत्येकी ०२ अशा एकुण ०८ निविदा प्राप्त झालेल्या आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक क्रमांक / दिनांक | |
|---|---|---|---|
| | | २३ बसेस वाहनांकरीता | ५५ वाहनांकरीता |
| ०१ | दि न्यु इंडिया ॲश्यूरेन्स कं. लि. शाखा- श्रीरामपुर | २३७३७- १४/०३/२०१५ | २३७४२- १४/०३/२०१५ |
| ०२ | नॅशनल इंश्युरन्स कंपनी लि. शाखा- श्रीरामपुर | २३७३८- १४/०३/२०१५ | २३७३९- १४/०३/२०१५ |
| ०३ | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. शाखा-शिर्डी | २३७४० १४/०३/२०१५ | २३७४१- १४/०३/२०१५ |
| ०४ | दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लि. शाखा-कोपरगांव | २३७४४- १४/०३/२०१५ | २३७४३- १४/०३/२०१५ |

तरी वरील प्रमाणे निविदाधारकांनी वाहनांचा वार्षिक (दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६) अखेर विमा पॉलिसी नुतणीकरण करणे कामी देवु केलेल्या (०१) २३ बसेस करिता- ०४ व (०२) ५५ वाहने (कार्यालयीन, मालवाहतुक व रुग्णवाहीका) वाहनांकरिता -०४ अशा एकुण ०८ निविदातील तांत्रिक बीड मध्ये पात्र निविदाधारकांच्या प्राईज बीड आजचे उपसमितीचे सभेसमोर**,** उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. त्यामधील कार्यालयीन, मालवाहतुक व रुग्णवाहीका मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | ५५ वाहनांकरिता (कार्यालयीन, माल वाहतुक व रुग्णवाहीका) निविदेमधील वार्षिक दर रु. | २३ वाहनांकरिता (बसेस) निविदेमधील वार्षिक दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | दि न्यु इंडिया ॲश्यूरेन्स कं. लि. शाखा- श्रीरामपुर | **५,३८,१११/-** | **९,८३,२१९/-** |
| ०२ | नॅशनल इंश्युरन्स कंपनी लि. शाखा- श्रीरामपुर | ५,४९,७०१/- | १०,०२,०००/- |
| ०३ | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. शाखा-शिर्डी | ५,४१,०००/- | ९,८८,५००/- |
| ०४ | दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लि. शाखा- कोपरगांव | ५,६५,५०३/- | १०,३४,१७४/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीसाठी संस्थानचे वाहन विभागातील विविध ५५ कार्यालयीन, मालवाहतुक, रुग्णवाहीका व २३ बसेस अशा एकूण ७८ वाहनांची विमा पॉलिसी नुतनीकरण करणेकामी दि न्यु इंडिया ॲश्यूरेन्स कं. लि., शाखा- श्रीरामपूर यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**११. टायर टयुब (प्लॅपसह) खरेदीकामी आलेल्या फेर निविदा उघडून निम्नतम पात्र निविदाधारकांस कार्यादेश देणेबाबत.**

दि.०९.१२.२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१०२१ नुसार, वाहन विभागाकडील वापरात असलेल्या कार्यालयीन-०३, रुग्णवाहीका-०३, स्कुलबसेस-०५, पॅसेंजर बसेस-०३, व मालवाहतुक-०१, अशा एकुण-१५ वाहनांकरीता नवीन ५१ टायर्स (टयुब, प्लॅपसह) खरेदी करणेकामी ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.४, ६०,०००/- (अक्षरी रक्कम रु. चार लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापी दि. ०९/०२/२०१५ रोजीचे मा. उपसमितीचे सभेसमोर १) सतिश ऑटो सेंटर बेलापुर रोड श्रीरामपुर, २) एस.जे.एस व्हिल्स् अस्तगाव, ३) ओम टायर्स शिर्डी. इ. निविदाधारकांचे निविदा उघडणेत आले. त्यामध्ये अ.न. १ चे निविदाधारक (पात्र) असलेने दुबार निविदा प्रसिध्द करणे योग्य होईल असे ठरले.

त्यानुसार दि.२६/०२/२०१५ रोजीचे सार्वमत (अहमदनगर आवृत्ती) या वृत्तपत्रात जनसंपर्क कार्यालय विभागामार्फत नवीन टायर + टयुब प्लॅपसह खरेदी कामी फेर निविदा शासकीय दराने जाहिरात प्रसीध्द करणेत आलेली होती.

त्यानुसार नवीन टायर + टयुब (प्लॅपसह) खरेदी कामी ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून निविदा बोलाविण्यात आले होते, त्यानुसार दि.२८/०२/२०१५ अखेर विहित मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | आवक नंबर / दिनांक | |
|---|---|---|---|
| ०१. | सतिश ऑटो सेंटर बेलापुर रोड, श्रीरामपुर | ०२०००१-०२, १५/०१/२०१५<br>०२३२०७-०७/०३/२०१५<br>०२३२०७-०७/०३/२०१५ | **पुर्वीची निविदा ग्राहय धरणेबाबतचे दि.०७/०३/२०१५ रोजीचे पत्राने कळविले आहेत.** |
| ०२. | ओम साई गणेश टेडर्स , साकुरी. | ०२३०८६ –१०/०३/२०१५ | **बंद निविदा** |

**मागणी:-** तरी प्रस्तावीत केल्याप्रमाणे नवीन टायर टयुब (प्लॅपसह) खरेदी कामी प्राप्त फेरनिविदांचे टेक्निकल बीड व कमर्शियल बीड उघडने तसेच यापुर्वीचे पात्र निविदाधारक सतिश टायर्स, श्रीरामपुर यांचे पुर्वीचेच दर व अटी शर्ती ग्राहय धरुन तुलनात्मक निम्नत्तम दरांचे निविदाधारकांस कार्यादेश देणे कामी निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांसाठी प्रस्तावीत केल्याप्रमाणे नवीन टायर टयुब (प्लॅपसह) खरेदी करणेकामी दुस-या वेळेस निविदांची मागणी केल्यानंतर एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने तुलनात्मक दर प्राप्त होऊ शकत नाही, त्यासाठी सदरहूकामी तिस-या वेळेस निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**१२. कनकुरी साठवण तलाव येथे नविन केबल टाकणे कामाबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

कनकुरी साठवण तलाव येथे १५ नंबर पंपरुमपासून ते विहीर नंबर १६ पर्यंत टाकलेली केबल ब्लास्ट झालेली असल्यामुळे पंपरुमचा इलेक्ट्रीकल सप्लाय बंद करण्यात आलेला असून तातडीने केबल टाकुन कनेक्शन करुन मिळणेबाबत पाणी पुरवठा विभाग यांनी डि.पी.अन्वये विद्युत विभागाकडे कळविलेले आहे.

त्यानुसार दिनांक ०४-०३-२०१५ रोजी कनकुरी साठवण तलाव येथे जाऊन समक्ष पाहणी केली असता पंपरुम करीता टाकलेली केबल ब्लास्ट झालेली असून सदरची केबल टाकावी लागेल. तसेच १६ नंबर विहीरकरीता पॅनेल रुमपासून टाकलेली केबलही दोन ठिकाणी ब्रेक झालेली असून या केबलला जॉईंट देण्यात आलेले आढळून आलेले आहे. त्यामुळे भविष्यात ही केबल खराब होऊ शकते. त्यामुळे पॅनेल रुमपासून १६ नंबर विहिरकरीता सुद्धा नविन केबल टाकावी लागणार आहे. तसेच याठिकाणी वारंवार खोदाई होत असल्यामुळे सदरची केबल आर.सी.सी.ह्युम पाईपमधून टाकणे सोईचे होईल.

परंतू याकरीता आवश्यक असलेली केबल संस्थानच्या मेन स्टोअरमध्ये तसेच विद्युत विभागाच्या सबस्टोअरमध्ये शिल्लक नसल्याने सदरचे काम हे बाहेरील ठेकेदार यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे. त्याकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामाचा खर्च शासनमान्य CSR ( सन २०१३-२०१४ ) प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 5-1-17 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad HRC fuse switch 415/ 500 V.100 A. with neutral link with ISI marked HRC fuses on angle iron frame as per specification no. SWSWR/TPHRC | 01 No. | 7,233.45 | 7,233.45 |
| 02) | 7-1-17 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 25 sq mm aluminium conductor with continuous12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 680. Mtr. | 241.50 | 1,64,220.00 |
| 03) | 7-1-19 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 50 sq mm aluminium conductor with continuous12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 250. Mtr. | 374.85 | 93,712.50 |
| 04) | 7-7-3 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 25 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 06.Nos. | 78.75 | 472.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 05) | 7-7-5 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 50 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 02Nos. | 129.15 | 258.30 |
| 06) | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs forcable 25 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 24.Nos | 6.30 | 151.20 |
| 07) | 7-10-4 | Supplying & erecting crimping type aluminium lugs forcable 50 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 08.Nos | 12.60 | 100.80 |
| 08) | Non DSR | Providing and construction (including excavation) brick masonary inspection cable chamber 600mm x 600 mm x 750 mm internal side size with 75 mm thick RCC cover,filling screened sand and smooth internal plaster etc including watering, streaking joint on exposed faces, rocking at joint on exposed faces and watering complete and clearing the site by removing debris & making the site good. | 20. Nos. | 6,000.00 | 1,20,000.00 |
| 09) | Non DSR | Supplying and erecting Outdoor Stand Mounted Feeder Pilar Panel with 63 Amp.TPN. TPN MCCB incomer and Four Nos. of Copper Busbars, 500 V, 100Amp for outgoing and provision for termination of Incoming minium 25 sq.mm.& outgoing minium 25 & 16 sq.mm.cbles complete erected in min. 14 gauge CRCA Sheet box with supporting angle, self lock, gasket and slating top erected on CC foundation in an approved manner. | 02 Nos. | 30,000.00 | 60,000.00 |
| 10) | 7-6-7 | Supplying & laying (including excavation) 25 cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to90 cms. below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet). | 630. Mtr. | 788.55 | 4,96,786.50 |
| 11) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of UL Certified / CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of electrode of 17.2 mm diameter low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated eartg with required quantity as per specification no. EA-MOBI | 02 Nos. | 15,764.70 | 31,529.40 |
| 12) | 9-2-4 | Supplying and erecting Annealed bare copper wire of high purity of different size used for earthing on wall with necessary copper clamps fixed on wall/cable/conduit with screws in an approved manner. | 10 Kgs. | 930.30 | 9,303.00 |
| | | | | **Total Rs.:-** | **9,83,767.65** |
| | | | | **Round up Rs.:-** | **9,83,768.00** |

उपरोक्तप्रमाणे कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता तसेच १६ नंबर विहीरकरीता पॅनेल रुमपासून केबल टाकणेचे कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये ९,८३,७६८/- (अक्षरी रुपये नऊ लाख त्र्याऐंशी हजार सातशे अडुसष्ठ मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणे आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता व १६ नंबर विहीरीकरीता पॅनेल रुमपासून केबल टाकणेचे काम करुन घेणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,८३,७६८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**१३. सन २०१५-२०१६ साठी फ्लेक्स बोर्ड व बॅनर्सचे दरपत्रक उघडणेबाबत.**

जनसंपर्क विभागाने सादर केलेलल्या उपरोक्त विषयावर संदर्भीय निर्णयान्वये "सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात संस्थानकरिता फ्लेक्स बोर्ड व बॅनर्स बनवून घेणेकामी शिर्डी आणि शिर्डी परिसरातील पुरवठादारांकडून दरपत्रक मागविणेस व याकामी येणा-या रुपये ५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी." असा निर्णय झालेला आहे. त्या अनुषंगाने शिर्डी व शिर्डी परिसरातील सदरचे काम करणा-या पुरवठादारांना दरपत्रके निर्धारित वेळत सादर केलेली आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | दरपत्रक प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०१. | हेमंत आर्ट, शिर्डी | १४.०३.२०१५ |
| ०२ | श्री.एम.सय्यद पेंटर, शिर्डी | १४.०३.२०१५ |
| ०३ | श्री. रवि दरगोडे, शिर्डी | १४.०३.२०१५ |

"सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात संस्थानकरिता फ्लेक्स बोर्ड व बॅनर्स बनवून घेणेकामी प्राप्त झालेले दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित पुरवठाधारक यांचे समक्ष उघडण्यात येऊन, त्यांमधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.न. | तपशिल / वर्णन | हेमंत आर्टस्, शिर्डी | श्री.एम.सय्यद, शिर्डी | श्री. रविंद्र दरगोडे, शिर्डी |
|---|---|---|---|---|
| | | वार्षीक दर चौ.फुट रु. | वार्षीक दर चौ.फुट रु. | वार्षीक दर चौ.फुट रु. |
| ०१ | फ्रंटलिट (Frontlit) बोर्ड (बिंगर फ्रेम आणि जागेवर येवून पेस्टींग करुन देणे तसेच डिझाईन सह ) २६० जीएसएम | ९/- | १५/- | <u>८/-</u> |
| ०२ | फ्रंटलिट (Frontlit) फ्लेक्स बोर्ड (बिगर फ्रेम आणि जागेवर येवून पेस्टींग करुन देणे तसेच डिझाईन सह) ३१० जीएसएम | १२/- | १८/- | **<u>१०/-</u>** |
| ०३ | फ्रंटलिट (Frontlit) फ्लेक्स बोर्ड (लोखंडी स्क्वेअर पाईप फ्रेमसह पेस्टींग करुन पोहोच तसेच डिझाईन सह) २६० जीएसएम | ३३/- | ३५/- | **<u>३०/-</u>** |
| ०४ | फ्रंटलिट (Frontlit) फ्लेक्स बोर्ड (लोखंडी स्क्वेअर पाईप फ्रेमसह पेस्टींग करुन पोहोच तसेच डिझाईन सह) ३१० जीएसएम | ३६/- | ४०/- | **<u>३३/-</u>** |
| ०५ | फ्रंटलिट (Frontlit) फ्लेक्स बॅनर्स (डिझाईन सह पोहोच करुन देणे) २६० जीएसएम | ८/- | -- | **<u>७/-</u>** |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात संस्थानकरिता फ्लेक्स बोर्ड व बॅनर्स बनवून घेणेकामी श्री.रविंद्र दरगोडे, शिर्डी यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले वार्षीक (प्रती चौ.फुटासाठी असलेले) निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**१४. "श्रीरामनवमी -२०१५" कलाकार हजेरी कायर्क्रमाबाबत.**

प्रति वर्षाप्रमाणे या वर्षी सँस्थानमार्फत श्रीरामनवमी उत्सव-२०१५ शुक्रवार, दि.२७/०३/२०१५ ते रविवार, दि.२९/०३/२०१५ अखेर असा तीन दिवस साजरा केला जाणार आहे. उत्सव कालावधीमध्ये तीनही दिवस होणारे सांस्कृतिक कार्यक्रमांचे (गायन, नृत्य, भजन, प्रवचन, कीर्तन, इ.) मानधन देणे, कार्यक्रमाची वेळ निश्चित करणे, कलाकारांचे राहण्याची सोय, जेवणाची सोय याचे नियोजन सामान्य प्रशासन शाखा (कार्यासन-०५) यांचे मार्फत करण्यात येते.

तसेच प्रत्येकउत्सवाचे मुख्य दिवशी कलाकार हजेरी कार्यक्रम साजरा करण्यात येतो. सदर कार्यक्रमामध्ये गायन, नृत्य व वादन असे कार्यक्रम सादर करण्यात येतात. याकरिता सहभागी होण्यासाठी इच्छुक कलाकारांची नांवे समाधी मंदिराचे बाहेरील बाजुसा असलेल्या अनाऊंसमेंट रुममध्ये उत्सवाचे मुख्य दिवशी सकाळी ०६ वाजेपासून सायंकाळी धूपारतीपर्यंत मंदिर विभागाचे कर्मचा-यामार्फत नांवे नोंदविण्यात येतात व त्याच दिवशी समाधी मंदिराचे उत्तर बाजुस कीर्तन कार्यक्रमाचे ठिकाणी रात्रौ १०:०० ते दुस-या दिवशी पहाटे ५:०० वाजेपर्यंत कलाकार हजेरीचा कार्यक्रम असतो. कार्यक्रमा सादर केल्यानंतर कलाकारांना प्रत्येकी रु.१/- नाणे व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येतो.

तरी प्रति वर्षाप्रमाणे श्रीरामनवमी उत्सवामध्ये कलाकार हजेरी कार्यक्रम करणेस परवानगी मिळणेस मान्यता असावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**१५. रामनवमी उत्सव २०१५ मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कुस्त्यांच्या फड आयोजनाबाबत.**

श्री रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांनी दि.१६/०३/२०१५ चे अर्जान्वये कळविले आहे की, "दि.१४/०३/२०१५ रोजी शिर्डी नगरपंचायतीमध्ये शिर्डी ग्रामस्थांची बैठक संपन्न झाली. सालाबादप्रमाणे या वर्षी देखील श्री रामनवमी उत्सव मोठया उत्साहात करण्याविषयी सर्वच ग्रामस्थांची एक वाक्यता झाली. श्री साईनी सुरु केलेला हा रामनवमीचा उत्सव मोठया दिमाखात करण्याविषयी ग्रामस्थांनी अनेक सूचना केल्या. ग्रामस्थांनी केलेल्या या सूचना श्री साईबाबा संस्थान कडून अपेक्षित आहेत. त्या खालीलप्रमाणे-

१) श्री रामनवमी उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कुस्त्यांच्या फडासाठी सुमारे ९,७५,०००/- रुपये (नऊ लाख पंच्याहत्तर हजार रुपये) मात्र आवश्यक आहेत. तरी सदरचा निधी श्री रामनवमी उत्सवासाठी मिळावा ही आग्रही विनंती.

२) शिर्डीतील असणा-या इतर ग्रामदैवतांच्या मंदिरावर विदयुत रोषणाई करण्यात यावी. (श्री गणपती मंदिर, श्री शनिदेव, श्री महादेव मंदिर, श्री हनुमान मंदिर इ )

३) श्री साई भक्तांची वर्दळ असणा-या नगर-मनमाड रोड वरील दुभाजकावर, लक्ष्मीनगर ते साईआश्रम ( १००० रुम) पर्यत विदयुत रोषणाई करण्यात यावी.

४) शिर्डी गावामध्ये येणा-या साई पालख्याचे स्वागत करण्यासाठी पालखी मार्गावर स्वागत कमानी व स्वागत मंडप टाकणे विषयी विनंती आहे.

श्री रामनवमी उत्सव २०१५ करीता सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कुस्त्यांच्या फडासाठी आयोजनाकरीता शिर्डी ग्रामस्थांनी खर्च रु. ९,७५,०००/- संस्थान मार्फत करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

मागील वर्षी शिर्डी ग्रामस्थांनी रक्कम रुपये ८,९१,०००/-(रुपये आठ लाख एक्यान्नव हजार) मात्र मागणी केली होती. त्यापैकी रुपये ७,००,०००/- (सात लाख रुपये) मात्र रक्कम संस्थानकडून यात्रा कमिटीला आदा करणेकामी मान्याता देण्यात आली होती. त्याचप्रमाणे सदरची रक्कम शिर्डी ग्रामस्थांना (यात्रा कमिटी) यांना लेखाशाखेमार्फत देण्यात आलेली होती.

दिनांक ३०/०१/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.११ अन्वये श्री रामनवमी उत्सव २०१५ चे कार्यक्रमाचे नियोजनासह उत्सव साजरा करण्यासाठी एकत्रित रक्कम रुपये ६०,५५,०००/- मात्रचे खर्चात रुपये ७,००,०००/- मात्र रक्कम कुस्ती हंगामासाठी तरतुद केलेली आहे. या रक्कमेस मान्यता मिळालेली आहे.

शिर्डी ग्रामस्थ यांनी मागणी केलेली रक्कम रुपये ७,००,०००/- अधिक अतिरिक्त मागणी केलेली रक्कम रुपये २,७५,०००/- अशी एकुण रुपये ९,७५,०००/- मात्र रामनवमी उत्सव २०१५ मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कुस्त्यांच्या फड आयोजना संदर्भात निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१५ निमित्ताने कुस्त्यांचा फड व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनाकामी संस्थानतर्फे रु.९,५१,०००/- मात्र रक्कम श्री रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांना प्रचलित पध्दतीने आदा करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-५/ मुख्यलेखाधिकारी)

---

**१६. श्री रामनवमी उत्सव २०१५ निमित्त कावड धारकांना समाधी मंदिरामध्ये प्रवेश देणेबाबत.**

श्री रामनवमी उत्सवानिमीत्त उत्सवाचे पहिले दिवशी रात्रौ शिर्डी गावातील, शिर्डी पंचक्रोषीतील तसेच बाहेरुन आलेले साईभक्त कोपरगांव येथे गोदावरी नदीचे जल श्रींना स्नानासाठी आणणेकामी जातात व रामनवमी उत्सवाचे मुख्य दिवशी पहाटे श्रींना मंगलस्नानाकरीता गोदावरी नदी व विविध जल श्रोतातून जल पायी घेवून येतात. त्याकरीता संरक्षण विभागामार्फत सदरचे भक्तांना कावड पास देणेसाठी १०,००० कावड पासची छपाई करुन जंगली महाराज आश्रम जवळ नगर-मनमाड रोडचे कडेला सुरक्षा रक्षकांची नेमणूक करुन रात्री १२.०० नंतर पहाटे ४.०० वाजेपर्यंत कावड पासचे प्रत्येकी ०१ या प्रमाणे वाटप करण्यात येते व सकाळी सदरचे पास बघूनच भक्तांना समाधी मंदीदामध्ये प्रवेश देण्यात येतो.

पुर्वी साईभक्तांनी पायी आणलेले जल हे समाधी मंदीरामध्ये स्नानाने वेळी वापरण्यात येत असे. परंतू भक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता गेल्या ४ ते ५ वर्षापासून श्रींचे मुर्तीव समाधीचे संरक्षण व संवर्धनाकरीता सदर जल श्रींचे समाधी मंदिरामध्ये नेण्याऐवजी समाधी मंदीराचे दक्षिणेकडील पालखी बाहेर पडण्याच्या गेटमध्ये श्रींची जुनी अभिषेक मुर्ती

ठेवून त्यावर वाहून मग कावडीधारकांना समाधी मंदिरामध्ये दर्शनार्थ प्रवेश देण्यात येतो. तसेच सुरुवातीचे ०५ कावडीधारक साईभक्तांचे कावाडीची पुजा करुन फक्त त्यांचेच जल समाधी मंदीरामध्ये स्नानाकरीता वापरण्यात येते.

यावर्षी– साई, सेवा संस्थाचे अध्यक्ष श्री दत्तात्रय रामकृष्ण महाले रा. शिर्डी व इतर २२ साईभक्त यांनी दि.२०/०२/२०१५ चे अर्जान्वये श्री रामनवमी उत्सव २०१५ करीता श्री क्षेत्र गंगासागर (2000 कि.मी.) येथून गंगाजल सायकलवर रॅलीने घेवून येणार असून ते गंगाजल श्रींना स्नानासाठी वापरण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

दरवर्षीचे प्रथेप्रमाणे पहिले आलेले ०५ कावडधारकांसोबत गंगासागर येथून गंगाजल आणलेल्या २३ कावड धारकांना समाधी मंदीरात थेट प्रवेश देता येईल.

**उपरोक्त प्रस्तावार सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव २०१५ निमित्त श्रींचे मंगलस्नानाकरीता कोपरगाव येथून गंगाजल घेऊन प्रथम येणा-या ०५ व गंगासागर येथून गंगाजल घेऊन येणा-या कावडधारकांपैकी ०५ कावडधारकांनाच थेट मंदिरात प्रवेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**१७. श्रीरामनवमी उत्सवकाळात दर्शनरांगेतील साईभक्तांना मोफत पाणी पाऊच पिशवीचे वाटप करणेबाबत.**

सन-2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.21 (1) (घ)मध्ये भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे अशी तरतूद केली आहे.

सालाबादाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे दि.27/03/2015 ते 29/03/2015 अखेर 03 दिवस श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. प्रतिवर्षी प्रमाणे श्री रामनवमी उत्सवात साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणेची शक्यता आहे.

कॅन्टीन विभागामार्फत् उत्सव काळात दर्शनरांगेतील साईभंक्तांसाठी अतिरिक्त् पिण्याचे पाणी बाटली विक्रीचे स्टॉल् लावून पाणी बाटली विक्री करणेत येते.दर्शनरांगेतील 16 गुठे जागेत, प्रवेशदार गेट.नं.2 जवळील जागेत शांती निवास इमारतीचे तळमजल्यावरील दर्शनलाईन मध्ये मध्यवर्ती ठिकाणी ,शांती निवास, इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील दर्शनरांगेत मध्यवर्ती ठिकाणी व भक्त् निवास तळमजल्यावर दर्शन रांगेजवळ अशा 05 ठिकाणी पाणी बाटली विक्री केली जाते.

दर्शनरांगेतील साईभक्तांसाठी मोफत पाणी पाऊचचे वाटप करावयाचे झाल्यास वरील 5 ठिकाणी पाणी पाऊचचे वाटप करता येईल्.सन.2014 चे श्रीरामनवमी उत्सवात दि.07/04/2014 ते 09/04/2014 या 03 दिवसामध्ये दर्शनरागेत साईभक्तांना एकूण 189750 मोफत प्रसादलाडू पाकीटांचे वाटप करणेत आले होते.श्रीरामनवमी उत्स्व काळात उन्हाचे प्रमाण जादा असलेने व एका कुटूंब प्रमुखासमवेत सरासरी तीन माणसे याप्रमाणे वरील संख्येच्या चारपट पाणी पाऊचचे मोफत् वाटप करणे अपेक्षीत आहे. दर्शनरांगेतील भक्तसख्या 189750 x 4 =7,59,000 म्हणजेच अंदाजीत 8,00,000 पाणी पाऊच पिशवी वाटप करणे आवश्यक आहे.

श्रीरामनवमी उत्त्सव 2015 मध्ये दि.27/04/2015 ते 29/04/2015 अखेर 03 दिवस दर्शनरांगेतील साईभक्तांना मोफत पाणी पाऊच पिशवीचे वाटप करणेसाठी अंदाजे रु.80/ - प्रति शेकडा दरा प्रमाणे एकुण 8,00,000/- पाणी पाऊच पिशवी खरेदीकामी रु.6,40,000/- (रु.सहा लाख चाळीस हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने पाणी पाऊच खरेदी करणेबाबत मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव- २०१५ मध्ये दि.२७.०४.२०१५ ते दि.२९.०४.२०१५ अखेर ०३ दिवस दर्शनरांगेतील साईभक्तांचे सोयीसाठी मोफत पाणी पाऊचचे वाटप करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**१८. श्रीरामनवमी उत्सवकाळात दर्शनरांगेतील साईभक्तांना मोफत चहा, कॉफी, दुधाचे वाटप करणेबाबत.**

सन-2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.21 (1) (घ्)मध्ये भक्तांना जेवण पुरविणे व अन्न्छत्र चालविणे अशी तरतूद केली आहे.

सालाबादाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे दि.27/03/2015 ते 29/03/2015 अखेर 03दिवस श्रीरामनवमी उत्त्सव साजरा करण्यात येणार आहे. प्रतिवर्षी प्रमाणे श्री रामनवमी उत्सवात साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणेची शक्यता आहे.

कॅन्टीन विभागामार्फत् उत्सव काळात दर्शनरांगेतील साईभंक्तांसाठी मोफत चहा, कॉफी, दुधाचे वाटप करावयाचे असल्यास शांती निवास इमारतीचे तळमजल्यावरील दर्शनलाईन मध्ये मध्यवर्ती ठिकाणी तसेच, शांती निवास, इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील दर्शनरांगेत मध्यवर्ती ठिकाणी व भक्त् निवास दर्शनरांगेतील तळमजला च दर्शन रांगेतील पहिला मजला अशा 04 ठिकाणी मोफत चहा,कॉफी,दुधाचे मोफत वाटप करता येईल्

मागीलवर्षी श्रीरामनवमी उत्सवात दि.07/04/2014 ते 09/04/2014 या 03 दिवसामध्ये दर्शनरागेत साईभक्तांना एकूण 189750 मोफत प्रसादलाडू पाकीटांचे वाटप करणेत आले होते.त्याअनुषंगाने श्रीरामनवमी उत्स्व 2015 मध्ये दि.27/03/2015 ते 29/03/2015 असेतीन दिवस मोफत चहा,कॉफी,दुधाचे वाटप करावयाचे असल्यास खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं | तपशिल | अंदाजीत भक्तसख्या | प्रति कपासाठी होणारा खर्च | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| 01 | चहा | 3,00,000 | 2.91 | 8,73,000/- |
| 02 | कॉफी | 20,000 | 3.33 | 66,600/- |
| 03 | दुध | 10,000 | 4.34 | 43,400/- |
| **एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. नऊ लाख, त्र्याऐंशी हजार मात्र** | | | | **9,83,000/-** |

श्रीरामनवमी उत्सव 2015 मध्ये दि.27/04/2015 ते 29/04/2015 अखेर 03 दिवस दर्शनरांगेतील साईभक्तांना मोफत चहा, कॉफी, दुधाचे वाटप करणेसाठी अंदाजे रु.09,83,000/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.सदरचा खर्च कॅन्टीन विभाग व भांडार विभागाकडे उपलब्ध् असलेल्या मटेरीअर मधून करता येईल तरी सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव- २०१५ मध्ये दि.२७.०४.२०१५ ते दि.२९.०४.२०१५ अखेर ०३ दिवस दर्शनरांगेतील साईभक्तांचे सोयीसाठी चहा, कॉफी, दुधाचे मोफत वाटप करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.९,८३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**१९. श्री गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव -२०१५ उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी दरपत्रक (निविदा) मागविणेबाबत.**

सन २०१५ मध्ये संस्थान मार्फत साजरे करण्यात येणारे श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी या उत्सवासाठी भक्तमंडळ सभासद, देणगीदार, ग्रामस्थ इ. देणकामी पत्रिका छपाई करणेकामी रु.१५,००,०००/- मात्र खर्चास मान्यता घेणकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दि.६/११/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.९३९ "श्रींच्या तिनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका आवश्यकतेनुसार त्या त्या उत्सवाच्या वेळेस उपसमिती सभेच्या मान्यतेने छपाई करुन घेण्यात यावी असे ठरले."

सन २०१५ या वर्षातील श्री रामनवमी उत्सवासाठी एकुण १८२००० निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी रु.३२०३२०/- मात्र खर्च झालेला आहे. प्रत्येक उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाईकामी वर्षातून तीन वेळेस दरपत्रके मागविण्यात येतात. सदरचे काम दर उत्सवात करणे अत्यावश्यक असल्यामुळे रुटीन स्वरुपाचे आहे. यामध्ये फोर कलर पत्रिका छपाई करणे, पत्रिकेच्या घडया घालणे, पाकीटमध्ये भरणे इ.कामे प्रेसधारक यांचे कडून करुन घेता येईल. वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविता येईल.

श्रीगुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यति�थी उत्सव या दोन उत्सवातील कालावधीचे अंतर ८० दिवसाचे आहे. या कालावधीत वर्तमानपत्रात, जाहिरात देणे, निविदा फॉमची विक्री करणे, निविदा मागविणे,निविदा मा.उपसमितीचे सभेत उघडणे, पुरवठा आदेश देणे, पत्रिका मसुदा मंजुर करणे तदनंतर पत्रिका छपाई झालेनंतर १५ दिवसाचा कालावधी हा पत्रिकेत उदीप्रसाद भरणे, पत्रिका पोष्टात टाकणे या कामासाठी जात असल्याने उत्सवाचे काम वेळेवर पुर्ण होणेस अडचण निर्माण होईल.

याकरीता गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव -२०१५ च्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी विविध प्रेसधारक यांचे कडून एकाचवेळी निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व पत्रिका छपाई करणेकामी येणा-या अंदाजे रु.७,००,०००/- (रु.सात लाख ) मात्र खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावार निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सव- २०१५ च्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, कार्यासन-५)

---

**२०. देणगी स्वरुपात लिनन स्विकारणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयाकरीता माला मेहेरा रा.मुंबई या साईभक्ताने खालीलप्रमाणे लिनन देणगी म्हणुन दिलेले आहे.

| अ.नं. | कपडयाचा तपशील | एकुण नग | प्रती नग रु./पै. | एकुण किंमत रु./पै. |
|---|---|---|---|---|
| १ | पेशंट ड्रेस | ३०० | २५०.०० | ७५०००.०० |
| २ | सर्जन ड्रेस | १०० | २५०.०० | २५०००.०० |
| | | | एकुण रु. | १,००,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले लिनन रु.१०००००/- (रु.एक लाख मात्र) इतक्या रक्कमेचे आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाची एकत्रीत खरेदीची कार्यवाही चालु आहे, सदर लिनन उपलब्ध होणेस 2 ते 3 महिण्याचा कालावधी लागु शकतो. रुग्णालयात पेशंटची वाढती संख्या लक्षात घेता उपरोक्त लिनन अत्यंत गरजेचे होते.

सदर लिनन प्राप्त झालेले असुन देणगी म्हणुन स्विकारणेत आलेले आहे. तरी सदरच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२१. **रुग्णालयातील वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक व इतर कर्मचारी पदांचे मुलाखती घेणेकामी आलेल्या निवड समिती सदस्यांचे मानधनबाबत.**

संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकिय संचालक , वैद्यकिय अधिक्षक , इतर वैद्यिकय अधिकारी व इतर कर्मचारी असे एकूण २९ प्रकारची पदे भरणेकामी उमेदवाराकडून अर्ज मागणीसाठी संस्थान वेबसाईटवर दि. ३०/०७/२०१४ रोजीचे वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर उमेदवारांची मुलाखत घेणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे ओदशान्वये १) मा. संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन यांचे प्रतिनिधी डॉ चंदनवाले, अधिष्ठाता, बी जे मेडीकल कॉलेज, पुणे २) मा. संचालक आरोग्य सेवा मुंबई यांचे प्रतिनिधी मा डॉ.पवार उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ नाशिक ३) मा. व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून डॉ सोनवणे, जिल्हा शल्यचिकित्सक अहमदनगर यांची मुलाखती घेणकामी या त्रिसदस्यीय निवड समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार दि. ०१/०३/२०१५रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती पूर्ण झालेनंतर त्याच दिवशी निवड समितीने मुलाखतीसंबंधी कागदपत्रे (मार्कशिट)सिल केले होते. तदनंतर दि. ०६/०३/२०१५ रोजी उपरोक्त निवड समितीचे सदस्यांनी दि. ०१/०३/२०१५ रोजीचे शिलबंद पाकिट उघडून संबंधित सर्व कागदपत्राची छाननी करून अंतिम मार्कलिस्ट व गुणवत्ता यादी तयार केली.

त्रिसदस्यीय निवड समितीतील सदस्यांना उपरोक्त कामी प्रत्येकी रु. ११,०००/- मात्र मानधन चेकने अदा करणे आवश्यक आहे. तरी वरील निवड समिती सदस्यांना याकामी मानधन म्हणून प्रत्येकी रु.११,०००/- (रु. अकरा हजार मात्र) श्री साईबाबा हॉसिटलचे फायनान्स विभागामार्फत चेकव्दारे अदा करणेस मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालयातील वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक व इतर कर्मचारी पदांचे मुलाखती घेणेसाठी आलेल्या निवड समिती सदस्यांना प्रत्येकी रु.११,०००/- मात्र मानधन आदा करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२२. **सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता गावरान तुप खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीबाबत.**

मा.उच्च न्यायालयाचे निर्णयास अधीन राहुन सन २०१५-१६ चे गावरान तुप खरेदीची पुर्वतयारी करणेकामी वर्तमापनत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन, अमुल, गोकुळ, महानंदा, विकास, हटसन व वारणा इ. गावरान तुप उत्पादक संस्थेच्या वितरकांकडून ई-निविदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१५-१६ (एप्रिल- २०१५ ते मार्च- २०१६) करिता प्रसादालय, लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी आवश्यक गावरान तुप खरेदीकामी निविदा प्रसिध्द करणेबाबतची जाहिरात जनसंपर्क विभागास दिनांक १०.०३.२०१५ रोजी दुपारी ३.३० वाजता दिलेली आहे. सदरची जाहिरात मागील वर्षी मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार ज्या दैनिकात प्रसिध्द केली होती त्याच दैनिकात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत जनसंपर्क विभागास कळविण्यात आलेले आहे. सदर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी "मा.अध्यक्ष महोदयांनी तोंडी सुचित केल्याप्रमाणे विलंब टाळण्यासाठी निविदा तात्काळ पब्लिश करण्यात यावी निविदा अंतिम करण्याची कार्यवाही मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतर करण्यात येईल" असे निर्देश दिलेले आहे.

किराणामाल खरेदीची जाहिरात मागील वर्षी वर्तमान पत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत टाइम्य ऑफ इंडीया मुंबई, इंडीयन एक्सप्रेस मुंबई, हिंदुस्थान टाइम्स मुंबई, नवभारत टाइम्स दिल्ली, पंजाब केसरी सर्व आवृत्या, दैनिक भास्कर (हिंदी) औरंगाबाद या दैनिकात व शासकीय दराने मुंबई पुणे नाशिक व अहमदनगर या शहरात प्रसिध्द केली होती. त्यावेळी सदर जाहिरात वर्तमान पत्रांच्या स्थानिक प्रतिनिधीमार्फत प्रसिध्दीसाठी रुपये ६,५०,०००/- व व शासकीय दराने रुपये ११,०००/- असा एकुण सुमारे रुपये ६,६१,०००/- खर्च आला होता.

मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संदर्भीय टिपणीवर दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सदरची जाहिरात मागील वर्षी प्रसिध्द केलेल्या किराणामालाचे जाहिरातीप्रमाणे ०२ कॉलम x ०८ सें.मी. या आकारमानात प्रसिध्द करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | वर्तमानपत्राचे नांव | आवृत्ती | अंदाजे अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | टाईम्स ऑफ इंडीया | मुंबई | २,१६,६४०/- |
| ०२ | इंडीयन एक्सप्रेस | मुंबई | १,२९,९२०/- |
| ०३ | हिंदुस्थान टाइम्स | मुंबई | १,५६,८००/- |
| ०४ | नवभारत टाइम्स | दिल्ली | ८८,०००/- |
| ०५ | पंजाब केसरी | सर्व आवृत्या | ८३,२००/- |
| ०६ | दै.भास्कर (हिंदी) | औरंगाबाद | २४,०००/- |
| | | **एकूण रक्कम रुपये** | **६,९८,५६०/-** |

यापुर्वी संस्थानच्या जाहिराती उपरोक्त वर्तमानपत्रात द्यावयाच्या झाल्यास वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधीमार्फत प्रसिध्दीसाठी देण्यात येत होत्या. त्याप्रमाणे इंडीयन एक्सप्रेस या वर्तमानपत्रासाठी सीताराम चांडे (वनिता ॲडव्हटायझिंग एजन्सी, आश्वी), टाइम्य ऑफ इंडीया, हिंदुस्थान टाइम्स, नवभारत टाइम्स, पंजाब केसरी व दैनिक भास्कर या वर्तमान पत्रासाठी (कोठारी ॲडव्हटायझिंग एजन्सी, श्रीरामपूर), यांना देता येतील. याशिवाय महाराष्ट्र राज्यातील इतर स्थानिक वर्तमानपत्रातून मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १५.०९.२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७८६ अन्वये शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करणेसाठी मा.सहसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत **अ** दर्जाच्या ०४ मराठी दैनिकातून प्रसिध्दीस देता येईल.

त्यानुसार सदरची जाहिरात **१)** इंडीयन एक्सप्रेस, मुंबई या वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेसाठी सीताराम चांडे (वनिता ॲडव्हटायझिंग एजन्सी, आश्वी) यांना **२)** टाइम्य ऑफ इंडीया मुंबई, हिंदुस्थान टाइम्स मुंबई, नवभारत टाइम्स दिल्ली, पंजाब केसरी सर्व आवृत्या, दैनिक भास्कर (हिंदी) औरंगाबाद या वर्तमानपत्रासाठी (कोठारी ॲडव्हटायझिंग एजन्सी, श्रीरामपूर), यांना **३)** तसेच महाराष्ट्र राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक व अहमदनगर आदि ठिकाणच्या प्रत्येकी एका दैनिकात मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १५.०९.२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७८६ अन्वये शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करणेसाठी मा.सहसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत (रोटेशन पध्दतीने) पसिध्दीसाठी देण्यात आलेली आहे.

तरी सदरची जाहिरात अ.नं.१, २ व ३ नुसार प्रसिध्दीस देणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,९८,५६०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता संस्थानसाठी गावरान तुप खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**२३. श्री साईबाबा भक्तनिवास येथील लॉण्ड्रीचे स्टीम बॉयलरचे सन २०१५ -२०१६ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

श्री साईबाबा भक्तनिवासस्थानकडे लॉण्ड्रीतील कॅलेंडर व ड्रायर मशिनला लागणारी स्टीम तयार करणेकरीता 200 किलो क्षमतेचा थर्मेक्स कंपनीचा (RXA-2) स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे. थर्मेक्स कंपनीचे अहमदनगर जिल्हयाकरीता अधिकृत एकमेव सर्व्हिस डिलर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना दिनांक 14.10.2003 पासून स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात येत आहे. मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे सन 2014-2015 या वर्षाचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट 31 मार्च 2015 रोजी संपणार आहे. त्यांनी आतापर्यंत प्रति दोन महिन्यास एक प्रमाणे सर्व्हिसींग करुन दिलेल्या आहेत.

सन 2014-2015 करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट रु. 28,500/- + सर्व्हिस टॅक्स या प्रमाणे निश्चित करण्यात आलेले होते. सन 2015-2016 करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले आहे. त्यामध्ये त्यांनी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट रु. 30,500/- + सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे दर कळविलेला आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्री स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी रु. 30,500/- + सर्व्हिस टॅक्स रक्कमेस मा. उपसमितीची सभेत मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी दिनांक 1.4.2015 ते 31.3.2016 या कालावधीकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान येथील लॉण्ड्रीमशिनचे RXA-2 स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट थर्मेक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.30,500/- + सर्व्हिस टॅक्स खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा. उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०१.०४.२०१५ ते दि.३१.०३.२०१६ या कालावधीकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान कडील लॉण्ड्री मशिनच्या RXA-2 स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट थर्मेक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर मे.मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना देणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.३०,५००/- + सर्व्हिस टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**२४. श्रीरामनवमी उत्सव २०१५ व उन्हाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी वाढीव मंडप व्यवस्था करणेबाबत.**

**साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचा निर्णयः**

दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.०७ खालील प्रमाणे संमत झालेला आहे. *"सन २०१५ मधील श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्ताचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.*

*सामान्य प्रशासन, उत्सव विभाग यांनी श्री रामनवमी उत्सवानिमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणा-या खर्चाचा समावेश श्रीरामनवमी उत्सवाचे अंदाजपत्रकामध्ये केलेला असल्यामुळे सदरहू खर्च वगळता प्रस्तावातील ब मध्ये नमूद केलेप्रमाणे उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणा-या अंदाजे रु.२१,६७,०७१/- मात्रचे खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन,मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले".*

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी दि.२७/०३/२०१५ ते २९/०३/२०१५ अखेर श्रींचा श्रीरामनववमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून दि.०१/०३/२०१५ ते १५/०६/२०१५ अखेर एकूण १०७ दिवस मंदिर परिसर, भक्तनिवास परिसर, श्री साईनाथ रुग्णालय परिसर, साई प्रसादालय व जुने प्रसादालय या ठिकाणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेत येतात. सदर उन्हाळयासाठीचे मंडपांचा वापर श्रीरामनवमी उत्सवात होत असल्याने श्रीरामनवमी उत्सवात शिर्डी येथे फक्त तिन दिवसाकरिता पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलिस स्टेशनजवळ तसेच कुस्ती ग्राऊंडवर एक दिवसाकरिता मंडपाचा समावेश करण्यात येतो. याप्रमाणे श्रीरामनवमी व उन्हाळयाच्या कालावधीतील एकूण रु.२९,६८,४८१/- मात्र खर्चाचे मंडपाचे कामासाठी वर्तमान पत्रातील जाहिरातीद्वारे सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा. त्रिसदस्य समितीचे सभेत उघडून निर्णय होणेबाबत दि.१७/०२/२०१५ रोजीचे टिपणीद्वारे प्रस्ताव सादर केला होता. याबाबत दि.०९/०३/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो व मुख्यलेखाधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेत उन्हाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी येणारा खर्च रु.२१,६१,०७१/- मात्र हा रु. १० लक्ष पेक्षा जास्त असल्याने त्यासाठी ई– निविदा मागविण्यात याव्यात अशी सूचना केली आहे. मंडप उभारणीसाठी कालावधी कमी असल्यामुळे तसेच उन्हाळी मंडपाचा वापर श्रीरामनवमी उत्सवात होत असल्याने उन्हाळयाचे संपूर्ण कालावधीसह ई-निविदेद्वारे निविदा मागविणेस पुरेसा कालावधी उपलब्ध नाही. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी सो.ा. यांनी यापुर्वीचे उत्सवातील मंडप कामाचे मंजूर दरात सदर काम करुन घेणेबाबत संबंधीत ठेकेदाराशी चर्चा करावी असे निर्देश दिले आहेत. यापुर्वी श्री पुण्यतिथी उत्सव सन २०१४ मधील मंडप उभारणी कामाचे ठेकेदार रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदरचे दरात मंडप उभारणीकामी ठेकेदार यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी सदरची मंडप व्यवस्था यापुर्वीचे पुण्यतिथी उत्सवातील मंजूर दरात करणेकामी सहमती दर्शविली आहे. त्यानुसार श्रीरामनवमी उत्सवात मंदिर परिसर व इतर परिसरात वाढीव मंडप उभारणीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**मंडप कालावधी दि.२७/०३/२०१५ ते दि.२९/०३/२०१५ अखेर ०३ दिवस**

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | परिमाण/ एकक | दर (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे :-<br>मंदिर परिसरामध्ये समाधी मंदिर उत्तर बाजू चावडी गेट ते नगरद्वार गेट, सभाकुंड येथे व साई कॉम्प्लेक्स समोरील मोकळया जागेत (१६ आर) | २४,६०० चौ. फुट | २.०० प्र.चौ. फुट प्र.दिवस | १,४७,६००/- |
| ०२ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले ) उभारणेः-<br>समाधी मंदिर दक्षिण बाजू गुरुस्थान मंदिर, श्रींचे चावडी समोर, नंदादीप मागील बाजू, दर्शनव्दार ते शनिमंदिर गेट, शनि, महादेव, श्री गणेश मंदिर समोर, समाधी मंदिर उत्तरे कडील मंडप ते शाम सुंदरहॉल पर्यंत, गेट नं.३ ते श्री मारुती मंदिर गेट नं.४ चे बाहेरील बाजुने,उदी काउंटर समोर, दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, पिंपळवाडी रस्त्यावर नगर-मनमाड रस्ता व पिंपळवाडी रस्त्याचे फुटपाथव, दर्शन लाईन प्रवेशव्दार पूर्व व पश्चिम बाजू, लाडू कांऊटर समोर श्रीसाई प्रसाद निवासस्थान कार्यालया समोर, श्रीसाई प्रसदालय प्रवेशव्दार ते तिकीट काऊंटरपर्यत व श्री साईबाबांचे शिल्पापर्यंत इ. भागात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. | ५८,५०० चौ. फुट | १.७५ प्र.चौ. फुट प्र.दिवस | ३,०७,१२५/- |
| | | | **एकूण अपेक्षित अंदाजे खर्च रु.** | **४,५४,७२५/-** |

उपरोक्त प्रमाणे उन्हाळयाचे कालावधीत समावेश असलेले तसेच श्री रामनवमी उत्सवानिमित्त वाढीव मंडप व्यवस्था करणेकामी एकूण रक्कम रु.४,५४,७२५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

समाधी मंदिर परिसरात मोकळया जागेत एम.एस. स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रीकचे छत असलेले शेडस् उभारणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे दाखल करणेत आलेल्या Civil Application No.1776/2014 वरील मा. उच्च न्यायालयाचे दि. १४/०१/२०१५ चे आदेशान्वये समाधी मंदिर भोवतालचे परिसरात Permanent M.S. Structure वापरुन शेड उभारणी करणेत येऊ नये, उत्सव काळात यापुर्वी तात्पुरते स्वरुपात मंडप उभारणेत येत असून सदर पध्दती योग्य आहे, असे आदेश दिलेले आहेत.

तरी वरीलप्रमाणे श्रीरामनवमी उत्सवानिमित्त मंदिर परिसरात व इतर परिसरात वाढीव मंडप व्यवस्था करणेकामी येणारे रक्कम रु.४,५४,७२५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून पुण्यतिथी उत्सवातील मंजूर दरानुसार करणेकामी सदरहू प्रस्तावावर मा.उपसमिती सभेत निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सवानिमित्त भक्तांच्या सुविधेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंदिर परिसरात व इतर परिसरात वाढीव मंडप व्यवस्थेचे काम रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून पुण्यतिथी उत्सव-२०१५ चे मंजूर दराने करुन घेणेस व याकामी येणा-या रु.४,५४,७२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **दिनांक ०८.०४.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१४४** दिनांक ०८.०४.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील दरवाजे व खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

दि.३०/०८/२०१४ रोजी केंद्रीय गुप्तवार्ता विभाग भारत राज्य, गुप्तवार्ता विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई व जिल्हा विशेष शाखा अहमदनगर या विभागाचे अधिका-यांनी संयुक्तरित्या श्री साईबाबा समाधी मंदिराचे सुरक्षेबाबत आढावा घेतला सदरहू सुरक्षा आढाव्या दरम्यान मंदिराच्या दक्षिण बाजूस दोन खोल्यांच्या दरवाजांना आणि खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसवाव्यात तसेच दरवाजे व खिडक्या बंद ठेवाव्यात असे निर्देश दिलेले असल्याचे संदर्भिय पत्रान्वये संरक्षण विभाग यांना कळविले होते.

संरक्षण विभागाने कळविल्याप्रमाणे लाकडी जीन्याची खोली व मंदिर विभाग कार्यालय या दोन खोल्यांचे दोन खिडक्यांना व दोन पैकी एका दरवाजास बुलेटप्रुफ काच बसविणेकामी येणा-या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चाचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर मा. त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.८७६ खालील प्रमाणे झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील दोन खिडक्या व एक दरवाजाकरीता बुलेट प्रुफ काचा बसविणेकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीदवारे निविदा मागविणेस व याकामी अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे".*

त्यानुसार निविदा सुचना दि.१५/०१/२०१५ रोजीच्या दैनिक Mid day, Mumbai, या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतू निविदा विक्रीच्या दि.१६/०१/२०१५ ते दि.२७/०१/२०१५ चे मुदतीत एकही निविदा विक्री झाली नाही. त्यामुळे इकडील विभागाचे दि.३१/०१/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर फेरनिवीदा सुचना प्रसिध्द करुन दि.०२/०३/२०१५ पर्यंत सिलबंद निवीदा सादर करणेसाठी मुदत देण्यात आली होती.

उपरोक्त कामासाठी सिलबंद निवीदा सादर करण्याच्या विहित मुदतीत दोनच निवीदा प्राप्त झाल्याने याकामी संस्थानचे संकेतस्थळावर फेरनिवीदा सुचना प्रसिध्द करुन दि. १६/०३/२०१५ रोजी पर्यंत सिलबंद निवीदा सादर करणेस वाढीव मुदत देणेत आली. सदरहु वाढीव मुदतीत खालीलप्रमाणे एकूण तीन ठेकेदारांनी सिलबंद निवीदा सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | आवक क्र./ दिनांक |
|---|---|---|
| 1. | Jeet & Jeet Glass and Chem.P.LTD., Jaipur | 022883/ दि. 02/03/2015 |
| 2. | Secure Mobile (India) Delhi | 022742/ दि. 02/03/2015 |
| 3. | PEC Limited, New Delhi | 023852/ दि. 16/03/2015 |

वरील प्रमाणे प्राप्त ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थितीत निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| 1. | Jeet & Jeet Glass and Chem.P.LTD., Jaipur | **६,८३,९८२/-** |
| 2. | Secure Mobile (India) Delhi | ९,२७,६८०/- |
| 3. | PEC Limited, New Delhi | ८,५०,०४३/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील दरवाजे व खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेकामी Jeet & Jeet Glass and Chem.P.LTD., Jaipur यांचे रु.६,८३,९८२/- (अक्षरी रुपये सहा लाख त्र्याऐंशी हजार नऊशे ब्याऐंशी) (Exclusive of Entry tax, octroi or any other Maharashtra state taxes, which would be applicable at actual at time of invoicing) मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **झेरॉक्स मशिन मॉडेल नं.७५५६ चा ए.डी.एफ. पार्ट खरेदी करणे करीता पुरवठादारांकडून सिलबंद कोटेशन मा.उपसमितीचे सभेत उघडून निर्णय होणेबाबत.**

सामान्य प्रशासन विभागातील झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशीन मॉडेल नं.चा ए ७५५६.डीहा पार्ट खराब .एफ. पार्ट खरेदी करणेसाठी झाल्यामुळे सदर मशीनला नविन, झेरॉक्स मशीनच्या साहित्याच्या पुरवठादारांकडुन कोटेशन मागविणेस मा २०१५.०१.०६.उपसमितीचे दि.चे सभेत मान्यता मिळालेली आहे०३संदर्भ . नुसार पुरवठाधारकांना दर पत्रक मागणी करण्यात आलेली होती२०१५.०१.३१-दर पत्रक पाठविण्याची अंतिम दि. पर्यंत होती०१फक्त . पुरवठा धारकाकडुन कोटेशन प्राप्त झालेले होते०३कोटेशन उघडणे कामी कमीत कमी . कोटेशन आवश्यक होते.

संदर्भ-०४ नुसार Re-Quotation फेर कोटेशन मागविणेस मायांची टिपणी मंजुरीने .सो.अ.का. पाठविण्याची अंतिम दि कोटेशन .पुरवठाधारकांना सिलबंद कोटेशन मागणी करण्यात आलेली होती -२५ २०१५.०३.पर्यंत होती २०१५.०३.२५-दि .अखेर खालील निविदाधारकांनी आपले कोटेशन सादर केलेल्या आहे .

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | एक्स ॲक्ट सर्व्हीसेस, नागपुर | ०२३५०५ -दि२०१५.०३.१२- | बंद पाकीट |
| ०२ | युनिसिटी सोल्युशन,प्रालि., पुणे | ०२०२३८२७- दि२०१५.०३.१६- | बंद पाकीट |
| ०३ | इंटीग्रेटेट सिस्टीम, नासिक | ०२३८६४-दि२०१५.०३.१७- | बंद पाकीट |
| ०४ | अनामिका कॉम्पयुटर, औरंगाबाद | ०२३८६६-दि२०१५.०३.१७- | बंद पाकीट |
| ०५ | ओम साई मार्केटींग, औरंगाबाद | ०२३८६७ - दि२०१५.०३.१७. | बंद पाकीट |
| ०६ | युनिक्यु इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद | ०२३८६८- दि२०१५.०३.१७. | बंद पाकीट |
| ०७ | युनिसिटी सोल्युशन, प्रालि., पुणे | ०२२७७२-दि- ०२२०१५.०३. | बंद पाकीट |

उपरोक्त निविदामधील अ.क्र. ०७ युनिसिटी सोल्युशन, प्रा.लि., पुणे यांची निविदा, निविदामागणी पूर्वीच प्राप्त झालेली असल्यामुळे तिचा विचार न करता उर्वरीत विहित मूदतीत प्राप्त झालेल्या ०६ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थितीत निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नाव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | एक्स ॲक्ट सर्व्हीसेस, नागपूर | ९७,२३०/- |
| ०२ | इंटीग्रेटेट सिस्टीम, नाशिक | **८४,०००/-** |
| ०३ | युनिक्यु इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद | ८६,३१०/- |
| ०४ | अनामिका कॉम्पयुटर, औरंगबाद | ८५,५७५/- |
| ०५ | ओम साई मार्केटींग, औरंगाबाद | ८४,६७६/- |
| ०६ | युनिसिटी सोल्युशन, प्रा. लि, पुणे | १,०१,७०२/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, झेरॉक्स मशिन मॉडेल नं.७५५६ चा ए.डी.एफ. पार्ट खरेदी करणेकामी इंटीग्रेटेट सिस्टीम, नाशिक यांचे रु. ८४,०००/- (अक्षरी रुपये चौ-याऐंशी हजार) मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-१२)

---

०३ **श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्ही.आय.पी. हॉल तसेच आय.टी. विभाग व त्या शेजारील हॉलमध्ये सिलींग फॅन बसवून वायरींगचे काम करणेकामी प्राप्त झालेली टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.०९-१२-२०१४ चे सभेतील विषय नं.०२ निर्णय क्र.१०२१ (१३) अन्वये श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्हीआयपी हॉल तसेच आय.टी.विभाग व त्या शेजारील हॉलमध्ये सिलींग फॅन बसवून वायरींगचे काम करणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये ७,७६,५८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.२५-०२-२०१५ रोजी दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२६-०२-२०१५ ते दि.०९-०३-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती.व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१२-०३-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार सात टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे तीन टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक क्र / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.एस.जी.इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस, नाशिक | ०२३४६६ / ११-०३-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०२) | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ०२३५३५ / १२-०३-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.प्रवरा इलेक्ट्रीकल्स्, पुणे. | ०२३५३६ / १२-०३-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्हीआयपी हॉल तसेच आय.टी.विभाग व त्या शेजारील हॉलमध्ये सिलींग फॅन बसवून वायरींगचे काम करणेकामी प्राप्त झालेले ०३ टेंडर आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडण्यात येऊन त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१) | मे.एस.जी.इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस, नाशिक | ७,६२,२६१.०० |
| ०२) | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ७,३७,७५१.०० |
| ०३) | मे.प्रवरा इलेक्ट्रीकल्स्, पुणे. | **७,३०,७९०.४४** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्ही.आय.पी. हॉल तसेच आय.टी. विभाग व त्या शेजारील हॉलमध्ये सिलींग फॅन बसवून वायरींगचे काम करुन घेणेकामी मे.प्रवरा इलेक्ट्रीकल्स्, पुणे यांचे रु.७,३०,७९०.४४ (अक्षरी रुपये सात लाख तीस हजार सातशे नव्वद. चौरेचाळीस पैसे) मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०४ **श्री साई प्रसादालय गॅस प्लॅंट परीसरामध्ये फ्लेम प्रुफ लाईट फिटींग व अनुषंगिक साहित्यासह पुरविणे व बसविणेकामी प्राप्त झालेली टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०-०१-२०१५ चे सभेतील विषय नं.२२ अन्वये श्री साई प्रसादालय गॅस प्लॅंट परीसरामध्ये फ्लेम प्रुफ लाईट फिटींग व अनुषंगिक साहित्यासह पुरविणे व बसविणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये ६,००,२६९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.२५-०२-२०१५ रोजी दैनिक पुढारी अहमदनगर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२६-०२-२०१५ ते दि.०९-०३-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१२-०३-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार सहा टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे तीन टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक क्र / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.एस.जी.इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस, नाशिक | ०२३४६७ / ११-०३-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०२) | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ०२३५३४ / १२-०३-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.प्रवरा इलेक्ट्रीकल्स्, पुणे. | ०२३५३७ / १२-०३-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय गॅस प्लॅंट परीसरामध्ये फ्लेम प्रुफ लाईट फिटींग व अनुषंगिक साहित्यासह पुरविणे व बसविणेकामी प्राप्त झालेले ०३ टेंडर आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडण्यात येऊन त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१) | मे.एस.जी.इलेक्ट्रीकल सर्व्हीसेस, नाशिक | ५,८८,०६५/- |
| ०२) | मे.प्रकल्प इन्स्ट्रयुमेंटस, अहमदनगर | ५,७०,२५५/- |
| ०३) | मे.प्रवरा इलेक्ट्रीकल्स्, पुणे. | **५,६७,१९४/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय गॅस प्लॅंट परीसरामध्ये फ्लेम प्रुफ लाईट फिटींग व अनुषंगिक साहित्यासह पुरविणे व बसविणेकामी मे.प्रवरा इलेक्ट्रीकल्स्, पुणे यांचे रु.५,६७,१९४/- (अक्षरी रुपये पाच लाख सदुसष्ट हजार एकशे चौ-यान्नव) मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०५ **भांडार विभागाकरीता रोलींग शटर तयार करुन बसविणेकामी प्राप्त फेर- निविदा उघडणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 11/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 761 अन्वये भांडार विभागाकरीता रोलींग शटर तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द् करुन

निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 50,700/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दिनांक 19/01/2015 रोजी "दैनिक पुढारी" वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. या जाहीरातीस अनुसरुन व मुदतीत फक्त् एकच निविदेची विक्री झाली होती. तसेच भरलेली एकही निविदा संस्थानकडे प्राप्त् झाली नाही. निविदा उघडून कार्यवाही करणेस कमीत कमी तीन निविदेची आवश्यकता असल्याने व भांडार विभागाकरीता रोलींग शटरची गरज लक्षात घेता इकडील विभागाच्या दिनांक 14 फेब्रुवारी, 2015 चे मंजूर टिपणीन्वये याकामी फेर-निविदा बोलविणेसाठी पुनश्च् वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द् करणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार फेर-निविदा विक्रीसाठी दिनांक 08/03/2015 रोजी "दैनिक सार्वमत" या वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. तसेच वेबसाईटवर निविदा नोटीस अपलोड केली होती. निविदेची विक्री दिनांक 09/03/2015 ते 16/03/2015 अशी होती. या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | 3. | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा |
| 2. | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | | |

वरीलप्रमाणे एकूण 3 निविदाधारकांनी मुदतीत निविदा खरेदी केल्या होत्या. भरलेली निविदा स्विकारणेची तारीख 20/03/2015 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे निविदाधारकांच्या सिलबंद 3 निविदा प्राप्त् झालेल्या आहेत:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | 3. | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा |
| 2. | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | | |

उपरोक्तप्रमाणे भांडार विभागाकरीता रोलींग शटर तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | **२९,०००/-** |
| ०२ | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | ३९,९२६/- |
| ०३ | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा | ३७,१८०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागाकरीता रोलींग शटर तयार करुन बसविणेकामी साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी यांचे रु.२९,०००/- (अक्षरी रुपये एकोनतीस हजार) मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०६ **श्री साई धर्मशाळा विभागातील स्टोअरच्या खिडकींना ग्रील बसविणेकामी प्राप्त फेर– निविदा उघडणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 947 अन्वये श्री साई धर्मशाळा विभागातील स्टोअरच्या खिडकींना ग्रील बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द् करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 88,800/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दिनांक 19/01/2015 रोजी "दैनिक पुढारी" वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. या जाहीरातीस अनुसरुन व मुदतीत फक्त् एकच निविदेची विक्री झाली होती. तसेच भरलेली एकही निविदा संस्थानकडे प्राप्त् झाली नाही. निविदा उघडून कार्यवाही करणेस कमीत कमी तीन निविदेची आवश्यकता असल्याने व श्री साई धर्मशाळा विभागातील स्टोअरच्या खिडकींना ग्रील बसविणेची गरज लक्षात घेता इकडील विभागाच्या दिनांक 8 फेब्रुवारी, 2015 चे मंजूर टिपणीन्वये याकामी फेर-निविदा बोलविणेसाठी पुनश्च् वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द् करणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार फेर-निविदा विक्रीसाठी दिनांक 08/03/2015 रोजी "दैनिक सार्वमत" या वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. तसेच वेबसाईटवर निविदा नोटीस अपलोड केली होती. निविदेची विक्री दिनांक 09/03/2015 ते 16/03/2015 अशी होती. या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | 3. | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा |
| 2. | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | | |

वरीलप्रमाणे एकूण 3 निविदाधारकांनी मुदतीत निविदा खरेदी केल्या होत्या. भरलेली निविदा स्विकारणेची तारीख 20/03/2015 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे निविदाधारकांच्या सिलबंद 3 निविदा प्राप्त् झालेल्या आहेत:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | 3. | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा |
| 2. | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | | |

उपरोक्तप्रमाणे श्री साई धर्मशाळा विभागातील स्टोअरच्या खिडकींना ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१) | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | **६३,०००/-** |
| ०२) | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | ७९,१६४/- |
| ०३) | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा | ७९,५४०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई धर्मशाळा विभागातील स्टोअरच्या खिडकींना ग्रील बसविणेकामी साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी यांचे रु.६३,०००/- (अक्षरी रुपये त्रेसष्ट हजार) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**०७. श्री साईनाथ रुग्णालयाच्या मुख्य रस्त्यावर स्लाईडींग गेट बसविणेकामी प्राप्त फेर– निविदा उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 26/07/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्र.579 अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाच्या मुख्य् रस्त्यावर स्लाईडींग गेट बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द् करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 69,600/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दिनांक 19/01/2015 रोजी "दैनिक पुढारी" वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. या जाहीरातीस अनुसरुन व मुदतीत फक्त् एकच निविदेची विक्री झाली होती. तसेच भरलेली एकही निविदा संस्थानकडे प्राप्त् झाली नाही. निविदा उघडून कार्यवाही करणेस कमीत कमी तीन निविदेची आवश्यकता असल्याने व श्री साईनाथ रुग्णालयाच्या मुख्य् रस्त्यावर स्लाईडींग गेट बसविणेची गरज लक्षात घेता इकडील विभागाच्या दिनांक 12 फेब्रुवारी, 2015 चे मंजूर टिपणीन्वये याकामी फेर-निविदा बोलविणेसाठी पुनश्च् वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द् करणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार फेर-निविदा विक्रीसाठी दिनांक 08/03/2015 रोजी "दैनिक सार्वमत" या वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. तसेच वेबसाईटवर निविदा नोटीस अपलोड केली होती. निविदेची विक्री दिनांक 09/03/2015 ते 16/03/2015 अशी होती. या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | 3. | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा |
| 2. | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | | |

वरीलप्रमाणे एकूण 3 निविदाधारकांनी मुदतीत निविदा खरेदी केल्या होत्या. भरलेली निविदा स्विकारणेची तारीख 20/03/2015 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे निविदाधारकांच्या सिलबंद 3 निविदा प्राप्त् झालेल्या आहेत:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | 3. | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा |
| 2. | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | | |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाच्या मुख्य् रस्त्यावर स्लाईडींग गेट बसविणेकामी प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१) | साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी | **४१,०००/-** |
| ०२) | सुपर फेब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | ५०,६४७/- |
| ०३) | विरसाई फेब्रिकेटर्स, पुणतांबा | ७५,३१०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या मुख्य रस्त्यावर स्लाईडींग गेट बसविणेकामी साई बजरंग फेब्रिकेशन ॲण्ड् मशीनरीज, साकुरी यांचे रु.४१,०००/- (अक्षरी रुपये एक्केचाळीस हजार) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**०८ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी बेंचेस खरेदीकामी तांत्रिक व व्यापारी लिफाफे उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयास आवश्यक असलेले १०० नग टु सिटर बेंचेस विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८,७५,०००/- मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०.०१.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.०२ (२५) नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव श्री

साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडून दि.११.०२.२०१५ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावामध्ये खरेदी करावयाचे बेंचेसचा तपशिल दिलेला आहे, तो खालीलप्रमाणे

| अ.नं. | बेंचेस तपशिल | साईज | मागणी संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | Godrej Make Achiver Two Seater Bench Model– 3 | Hd-744mm<br>W- 1100mm<br>D – 915mm<br>Hs – 440mm | 100 नग |

त्यानुसार खरेदी विभागाकडील दि.१३.०२.२०१५ रोजीचे टिपणीनुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली आहे. प्रस्तावित कोऱ्या निविदेची किमंत रक्कम रु.३००/- मात्र अशी ठेवणेत आली होती. तसेच निविदेसोबत लिफाफा क्रमांक १ मध्ये बयाणा रक्कम रु.९,०००/- (अक्षरी रुपये नऊ हजार मात्रची) लेखाशाखेतील भरणा पावती अथवा राष्ट्रीयकृत बँकेच्या कोपरगांव/राहाता/शिर्डी शाखेवरील Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi यांचे नांवे डिमांड ड्रॉफ्ट तसेच दुकान नोंदणी दाखला, कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबतचे प्रमाणपत्र व्हॅट टिन नंबर, पॅन कार्ड वगैरे कागदपत्रे व लिफाफा क्रमांक २ मध्ये मुळ निविदा मागणी करणेत आले होते.

दि.०५.०३.२०१५ ते दि.१४.०३.२०१५ अखेर निविदा विक्री करुन, पुर्ण भरलेली निविदा दि.१८.०३.२०१५ पर्यंत बंद पेटीत मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती तीन निविदांची विक्री झालेली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा क्रमांक |
|---|---|---|
| ०१. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | ०१ |
| २. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ०२ |
| ०३. | मे.खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | ०३ |

तरी बंद पेटीत प्राप्त झालेल्या निविदांचे तांत्रिक व व्यापारी लिफाफे पुढील मा.उप समितीचे सभेत उघडून, बॅचेस खरेदी बाबत निर्णय घेता येईल. प्रथम तांत्रिक लिफाफे उघडून, त्यातील मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. त्यानंतर तांत्रिक दृष्टया पात्र निविदाधारकांचेच व्यापारी लिफाफे उघडून, निर्णय घेता येईल.

तरी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरिता आवश्यक १०० नग बेंच खरेदीकामी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी बेंचेस खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे तुलनात्मक दर प्राप्त होऊ शकत नाहीत, याकरिता सदरहूकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेत येऊन, फेरनिविदांची मागणी करणेत यावी तसेच फेरनिविदा प्राप्त झाल्यानंतर सध्याच्या दोन्ही निविदाही विचारात घेतल्या जाव्या, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०९ **पाणी पुरवठा विभागास फ्रेमसह चेंबरवरील झाकणे खरेदीकामी प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

पाणी पुरवठा विभागासाठी फ्रेमसह चेंबरवरील झाकणे खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,५३,०६३/- (अक्षरी रुपये सहा लाख त्रेपन्न हजार त्रेसष्ट) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०९.१२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०२१ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.११.०२.२०१५ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

पाणी पुरवठा विभागास सदर साहित्याची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पातून निविदा प्रक्रिया होत नसल्यामुळे सदरची खरेदीही प्रचलित पद्धतीनेच दि.०४.०३.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली होती. सदरच्या निविदा विक्री करणेकामी दहा निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी तीन निविदांची विक्री झालेली आहे.

सदरच्या निविदांचे लिफाफे निविदा पेटीमध्ये स्विकारणेत आलेले आहेत. सदर निविदांची पेटी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून प्रथम प्राप्त निविदेतील लिफाफा क्रमांक १ उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांची निविदा पात्र ठरविता येईल. नंतर पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडून योग्य निर्णय घेता येईल.

उपरोक्त प्रमाणे पाणी पुरवठा विभागास फ्रेमसह चेंबरवरील झाकणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ. नं. | साहित्याचा तपशील व मागणी | साईज | नग | मे.पुनम एजन्सीज, कोपरगांव | मे. श्रीनिवास सिमेंट प्रॉडक्टस् कोपरगांव | मे. श्रीपाद कॉक्रीट, कोपरगांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | २४"x३६"x३" | ४३ | २९००/- | **१५४७/-** | १९१९/- |
| २ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | २४"x२४"x३" | २६ | २८००/- | **११७५/-** | १४६८/- |
| ३ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | ३६"x३६"x३" | १९ | ४४००/- | **२७२१/-** | ३४०२/- |
| ४ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | १८"x२४"x३" | ७ | १९५०/- | **११८२/-** | १४७८/- |
| ५ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | १८"x१८"x३" | १५ | १४००/- | **९७३/-** | १२१६/- |
| ६ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | १८"x३६"x३" | ११ | २४००/- | **१२३६/-** | १५३२/- |
| ७ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | १४"x२०"x१.५" | ०२ | ९५०/- | **५३१/-** | ६६४/- |
| ८ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | १६"x२२"x१.५" | १ | ९५०/- | **३५६/-** | ४४४/- |
| ९ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | १२"x१२"x२" | १ | ७५०/- | **२५९/-** | ३२३/- |
| १० | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | ३०"x४२"x३" | ५० | २९००/- | **२७२१/-** | ३१३०/- |
| ११ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | २७"x२७"x३" | ४० | २८००/- | **११७५/-** | १३५१/- |
| १२ | आर.सी.सी. चेंबर झाकणे फ्रेमसह | राऊंड झाकणे (गोल)२१" व्यास x3" जाड | २० | २८५०/- | १११५/- | **७७६/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागास फ्रेमसह चेंबरवरील झाकणे खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्तयातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१० **संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजूने बार्बेड वायर फेन्सिंग करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम 21 मधिल पोटकलम (1) च्या खंड (क्) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** मौजे शिर्डी येथील स.नं.124 पैकी 1.20 हे. आर क्षेत्रामधील मिळकतीमध्ये चिकूचा बाग आहे. सदरहु बागेस संरक्षणाचे दृष्टीने 450 मी. कंपाउंड करणे आवश्यक आहे. तसेच स. नं. 126 पैकी शिर्डी नांदुर्खी रस्त्याचे दक्षिण बाजूस पाण्याचे टाकी (ESR) लगत संस्थानची मिळकत आहे. सदरहु मिळकतीसही संरक्षणाचे दृष्टीने सदरचे क्षेत्रास 460 मी. लांबीचे कंपाउंड करावे लागणार आहे. तुर्त सदरहु मालमत्तांच्या संरक्षणाचे दृष्टीने बार्बेड वायर फेन्सिंग करणे व गेट बसविणेसाठी सन 2013-2014 चे जिल्हा दरसुचीनुसार रु.2,57,824/- खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव:-** तरी उपरोक्त विषयांकीत बागेस बार्बेड वायर फेन्सिंग करणे व गेट बसविणेसाठी रु.2,57,824/- मात्र इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजूने बार्बेड वायर फेन्सिंग व गेट बसविणेस तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.२,५७,८२४/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्तावन्न हजार आठशे चोवीस) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

११ **सन २०१५/२०१६ या सालासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीसाठी आवश्यक केमिकल/ डिटर्जन्ट संयुक्त खरेदीबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद** - १) - २१ चा (१) चा (ग) - भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२) - (ख) भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

**मा.व्यवस्थापन मंडळावा ठराव-** १) दि.२६/०३/२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील संमत विषय नं.३२ व निर्णय क्र.२३२.

२) दि.१७/०९/२०१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील संमत विषय नं.६४ व निर्णय क्र.६७३.

**प्रस्तावीक-** साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व इतर विभाग यांचेकडील बेडशिट, उशीकव्हर, चादर, गादीखोळ, पडदे, ब्लँकेट, टॉवेल, नॅपकीन, गाडीचे शिटकव्हर, सोहळे, बस्कर, आदी कपडयांची धुलाई साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमधुन केली जाते.

संस्थान अधिनस्त रुग्णालयाकडील कपडयांची धुलाई साईनाथ रुग्णालय लॉण्ड्रीमार्फत केली जाते. दोनही ठिकाणी धुलाईसाठी वापरात येणारे लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंन्ट साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामार्फत संयुक्त प्रस्ताव ठेवून मान्यतेसाठी सादर करण्यात येतो. खरेदी, खरेदी विभागामार्फत टेंडर पध्दतीने एकत्रित केली जाते.

उपरोक्त संदर्भ क्र.०१ नुसार दि.२६/०३/२०११ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये येथून पुढे संस्थानचे भक्तनिवासस्थान, रुग्णालये व इतर विभागांचा लॉण्ड्री केमिकल खरेदीकामी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले असल्याने उभय विभागांचा संयुक्त प्रस्ताव सादर करुन माहे - मार्च २०१५ अखेर आवश्यक केमिकल/डिटर्जंन्ट खरेदी करण्यास उपरोक्त संदर्भ क्र.०२ चे ठरावान्वये मान्यता देण्यात आली त्यानुसार केमिकल/डिटर्जंन्ट माहे - मार्च २०१५ अखेर संपणा-या ०१ वर्षासाठी खरेदी करण्यात आलेले होते.

**विभागाची मागणी-** सन २०१४/२०१५ या वर्षाकरीता मे.मिनिटेक हायजिन मेकर्स, अंधेरी (पश्चिम) मुंबई, यांचेकडून खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने पुरवठा आदेश जा.क्र.एसएसएस/खरेदी-साभनि/५९५३/२०१४ दि.२२/०३/२०१४ अन्वये उभय लॉण्ड्रीसाठी केमिकल/डिटर्जंन्ट खरेदी एकत्रित करण्यात आली होती. आता साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग व रुग्णालय विभागासाठी (साईबाबा भक्तनिवासस्थान मागणी पत्र दि.२४/०२/२०१५ प्रमाणे व रुग्णालय मागणी पत्र दि.२६/०२/२०१५) सन २०१५/२०१६ या वर्षाकरीता खालील प्रमाणे विभागवार लॉण्ड्री केमिकल/ डिटर्जंन्टची आवश्यकता भासणार आहे. सघ्या उभय विभागाकडील शिल्लक साठा व आवश्यक मालाची विगतवारी खालीलप्रमाणे.

**विभागांकडील शिल्लक साठा-**

| अ.नं | तपशिल | साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील दि.२३/०२/२०१५ अखेरचा शिल्लक साठा. किलो/ लिटर | रुग्णालयाकडील दि.२६/०२/२०१५ अखेरचा शिल्लक साठा. किलो/लिटर |
|---|---|---|---|
| १ | नॉक्स पॉवर | १,४७६.२०० कि.ग्रॅम | --- |
| २ | नॉक्स ऑक्सी | १,४५१.२०० लि.मिली | --- |
| ३ | नॉक्स सोर | ८२०.६०० कि.ग्रॅम | --- |
| ४ | नॉक्स २०० एस | ८८.३०० लि.मिली | --- |
| ५ | नॉक्स १०० | --- | ४७८ किलो |
| ६ | नॉक्स बुस्ट | --- | ४७८ किलो |
| ७ | नॉक्स सोर | --- | २३९ किलो |
| ८ | नॉक्स वूल | --- | १५२ लिटर |
| ९ | बी.एस.आर. | --- | १४५ लिटर |
| १० | एमरॉल | --- | १०५ लिटर |
| ११ | ब्लिचिंग लिक्वीड | --- | १२१ लिटर |

आवश्यक केमिकल/डिटर्जंन्ट मागणी-

**अ) साईबाबा भक्तनिवासस्थान-**

| अ.नं | धुण्यासाठीचे कपडे | अंदाजे आवश्यक डिटर्जंन्ट पावडर (किलो/ग्रॅम) | अंदाजे आवश्यक लिक्वीड (लिटर/मिली) | अंदाजे दर प्रति किलो/लिटर रु.पैसे | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॉटन बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ. (रंगीत/पांढरे धुण्यासाठी) | २००० किलो | --- | ९०.०० | १,८०,०००.०० |
| २ | कॉटन बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, टॉवेल.इ. (रंगीत/पांढरे धुण्यासाठी) | --- | २००० लिटर | १००.०० | २,००,०००.०० |
| ३ | वुलन रग, ब्लँकेट.इ. | --- | ५० लिटर | १५०.०० | ७,५००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | सिन्थॅटीक कपडे (पडदे.इ.) | १०० किलो | --- | १००.०० | १०,०००.०० |
| ५ | कपडे न्युट्रलाईज करणेसाठी | १००० किलो | --- | ६०.०० | ६०,०००.०० |
| **एकूण रुपये – ४,५७,५००.००** | | | | | |

**ब) साईनाथ रुग्णालय–**

| **अ.नं** | **धुण्यासाठीचे कपडे** | **अंदाजे आवश्यक डिटर्जंन्ट पावडर (किलो/ग्रॅम)** | **अंदाजे आवश्यक लिक्वीड (लिटर/मिली)** | **अंदाजे दर प्रति किलो/लिटर रु.पैसे** | **एकूण रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| १ | कलर बेडशिट, उशिकव्हर, चादर, टॉवेल, शर्ट, पॅन्ट (रंगीत/ पांढरे कपडे धुण्यासाठी) | २१६० किलो | --- | ९०.०० | १,९४,४००.०० |
| २ | ब्लॅकेट इत्यादी कपडे धुण्यासाठी | --- | ४०० लिटर | १५०.०० | ६०,०००.०० |
| ३ | तेलकट डाग काढणेकामी | --- | ४०० लिटर | १००.०० | ४०,०००.०० |
| ४ | रक्ताचे डाग काढणेकामी | --- | ४०० लिटर | १००.०० | ४०,०००.०० |
| ५ | कपडे न्युट्रलाईज करणेसाठी | १००० किलो | --- | ६०.०० | ६०,०००.०० |
| **एकूण रुपये – ३,९४,४००.००** | | | | | |

आपणास आवश्यक धुलाई केमिकल/डिटर्जंन्ट खरेदीकामी आवश्यक मटेरियलचे गर्व्हरमेंट नॉर्मस नुसार, कंन्टेंन्स, परसेंन्टेज निश्चिती व माहितीसाठी, दि.१८/०२/२०१५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभे मधील विषय नं.१३ व निर्णय क्र.४१ नुसार श्री सुरेश ब्राम्हणकर यांची संस्थान परिसरातील स्वच्छता व किडनाशक तांत्रिक सल्लागार म्हणुन सेवाभावी नियुक्ती करण्यात आलेली असल्याने सदरबाबत अधिक माहिती हेतु त्यांना दि.२८/०३/२०१५ रोजी शिर्डी येथे पाचारण करण्यात आले.

प्रशासकीय अधिकारी श्री.बी.डी.साबळे सो., प्र.अधिक्षक श्री.ए.एम.लाड व लॉण्ड्री लिपीक श्री.के.बी.सदाफळ यांचे उपस्थितीत सदर बाबत चर्चा करण्यात आली. सदर चर्चेनुसार श्री.ब्राम्हणकर, तांत्रिक सल्लागार यांनी दि.२८/०३/२०१५ रोजी आवश्यक लॉण्ड्री केमिकल व डिटर्जंन्टमध्ये समाविष्ट घटकांची सुची त्यांचे सही शिक्क्यानिशी सादर केली असुन ती सोबत अवलोकनार्थ सलग्न आहे.

नमुदप्रमाणे आवश्यक केमिकल/डिटर्जंन्ट खरेदी करतेवेळी त्यात समाविष्ट घटकांचा विचार करावा लागेल.

**१) समाविष्ट घटक टक्केवारीसह व इतर आवश्यक प्रमाणपत्रे-**

| **अ.नं** | **तपशिल** | **समाविष्ट घटक** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | डिटर्जंन्ट पावडर<br>कॉटन बेडशिट, उशिकव्हर,चादर, टॉवेल, शर्ट, पॅन्ट (रंगीत/पांढरे कपडे धुण्यासाठी) | सर्फएक्टंट (मुख्य क्रियाशिल घटक) | १० ते १८ % |
| | | बिल्डर (फॅसपेट/झिवोलाइटस) | २८ ते ४८ % |
| | | ब्लिच | १० ते २० % |
| | | ब्लिच ॲक्टीवेटर | ३ ते ८ % |
| | | फिलर्स | ५ ते ३० % |
| | | गंधप्रतिबंधक | २ ते ६ % |
| | | एन्साइन्स | ०.५ % |
| | | चकाकणारा पदार्थ | ०.१ ते ०.३ % |
| | | फेस | ०.१ ते २.० % |
| | | परफ्युम - किमान आर्दता | ८ ते १० % |
| २ | लिक्वीड<br>कॉटन बेडशिट, उशिकव्हर,चादर, टॉवेल, शर्ट, पॅन्ट (रंगीत/पांढरे कपडे धुण्यासाठी) | सर्फएक्टंट (मुख्य क्रियाशील घटक) | १० ते १८ % |
| | | बिल्डर (फॅसपेट/झिवोलाइटस) | २८ ते ४८ % |
| | | ब्लिच | १० ते २० % |
| | | ब्लिच ॲक्टीवेटर | ३ ते ८ % |
| | | गंधप्रतिबंधक | २ ते ६ % |
| | | एन्साइन्स | ०.५ % |
| | | चकाकणारा पदार्थ | ०.१ ते ०.३ % |
| | | फेस | ०.१ ते २.० % |
| | | परफ्युम - किमान | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | लिक्वीड (वुलन रग, ब्लॅकेट धुण्याकरीता) | एन्झाइम्स, ब्लिच व चमकवणारा घटकनसलेला व पी एच न्युटरन नसलेला इथॅनन व युथ्यालस्टर १० % च्या कमी स्पेसिफिक गॅव्हिडी १.००३+/- ०.०१ % व पुर्णपणे पाण्यात विरघळणारा. | |
| ४ | लिक्वीड (रक्ताचे डाग काढणेकामी) | इथिलिन डाय अमाइन/ टेट्रासोडिअम साल्ट | (४०%) ४.० |
| | | अमोनियम हायड्रॉसाईड | (२८%) ८.० |
| | | टोर्मॅमिन अम्फोटेरिक एल एच सर्फएक्टंट | ४.० % |
| | | इसोपोपॅनल | ८.० % |
| | | इथॅलॅनी ग्लायकोमोनोबटलीएदर | ४.० % |
| ५ | पावडर (कपडे न्युट्रलाईज करणेकरीता) | मुख्य किमान घटक फॉर्मीक ॲसिड | १२ % |
| | | सिट्रीक ॲसिड १ ते ५ % किमान प्रमाण असलेले व इतर घटक पर्यावरनास हानी कारक नसणारे पाण्यात संपुर्णपणे विरघळणारा. | |

**२)** BIS (Bureau of Indian Standards) या संस्थेद्वारे वेळोवेळी संशोधित मानकांप्रमाणे (IS4955:2001) असलेबाबतचा दाखला सलग्न असणे गरजेचे आहे.

**३)** लॉण्ड्री उत्पादने ECOMARK असावीत तसेच याबाबत सक्षम दाखला असावा.

वरीलप्रमाणे केमिकल/डिटर्जंन्ट खरेदीकामी पुढीलप्रमाणे विभागावार अंदाजे खर्च अपेक्षित आहे. (अ + ब)

| अ.नं. | विभागाचे नाव | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान | ४,५७,५००.०० |
| २ | साईनाथ रुग्णालय | ३,९४,४००.०० |
| | **एकूण बेरीज-** | ८,५१,९००.०० |

(अक्षरी रुपये आठ लाख एक्कावण्ण हजार नऊशे मात्र)

**संस्थान अधिनियम २००४ नुसार छाननी करुन अनुमान-** उपरोक्तप्रमाणे लॉण्ड्री केमिकल/डिटर्जंन्ट खरेदी नमुद अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन तथा समंत व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार करता येईल. सदर खरेदीकामी अंदाजे रु. ८,५१,९००/- (अक्षरी रुपये आठ लाख एक्कावण्ण हजार नऊशे मात्र) अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतुद दोन्ही विभागांचे सन २०१५/२०१६ चे अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली आहे. प्रस्तुतचा खर्च रुपये १० लाखापेक्षा कमी असल्याने मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठाची मंजुरी आवश्यक नाही.

**विभागाचा अभिप्राय-** सदरचे केमिकल/डिटर्जंन्ट खरेदीकामी अंदाजे रु.८,५१,९००/- (अक्षरी रुपये आठ लाख एक्कावण्ण हजार नऊशे मात्र) खर्च येणार आहे. तरी उपरोक्त प्रमाणे विभागनिहाय केमिकल/डिटर्जन्ट खरेदीकामी येणा-या खर्चास व खरेदी, खरेदी विभागामार्फत टेंडर पध्दतीने करण्यास मंजुरीकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५/२०१६ करिता साईबाबा भक्तनिवासस्थान व संस्थान रुग्णालये लॉण्ड्रीसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे केमिकल/ डिटर्जन्ट खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८,५१,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**१२ गावरान तुप प्रायव्हेट लॅबमध्ये तपासणी करुन आणलेल्या खर्चास मा.उपसमितीचे सभेमध्ये कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

साईभक्तांना प्रसाद लाडू व बुंदी बनविणेकामी गावरान तुप खरेदी केले जाते.खरेदीची ऑर्डर ही खरेदी विभाग यांचेकडून दिली जाते, आलेला माल नमुन्याप्रमाणे तपासणे व त्याच्या नोंदी ठेवणेकामी खरेदी, भांडार व प्रसादालय हे रजिष्टरला अहवाल नोंदी असतात. या पध्दतीशिवाय दक्षता पथकही माल तपासणीसाठी नेमलेले आहे. आलेले गावरान तुप खाजगी लॅबमधून तपासुन घ्यावे, असे वरीष्ठांनी आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार गावरान तुप मे.फुड हायजीन & हेल्थ् लेबॉरेटरी, हडपसर, पुणे यांचेकडून तपासुण आणणेकामी रुपये 43,780/- मात्र खर्चास मंजुरी घेणेत आलेली होती. त्याप्रमाणे मे.फुड हायजीन & हेल्थ् लेबॉरेटरी, हडपसर, पुणे यांचेकडून गावरान तुप तपासुण आणणेकामी रुपये 36,101/- मात्रचा खर्च झालेला असुन उर्वरित रक्कम रुपये 7,679/- मात्रची जनरल पावती करणेत आलेली आहे.

तरी मे.फुड हायजीन & हेल्थ् लेबॉरेटरी, हडपसर, पुणे यांचेकडून गावरान तुप तपासुण आणणेकामी झालेल्या रु.36,101/- (अक्षरी रुपये छत्तीस हजार एकशे एक मात्रचे) खर्चास मा.उपसमितीचे सभेमध्ये कार्योत्तर मंजुरी असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, दक्षता पथक)

---

**१३ बसेसचा वार्षिक टॅक्स खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम-२०१४ मधील तरतुदः-** १७ (०१), २१ (०१-ग,ज).

**प्रस्ताविकः-** वाहन विभागाकडील स्कुल बसेसचा वापर श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे विद्यार्थी शाळेत ने-आण करणे कामी तसेच प्रवासी बसेसचा वापर श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे ने-आण करणेकामी होत आहे. सदर बसेसचा दरवर्षी आर.टी.ओ. कार्यालयात वार्षिक टॅक्स भरणे आवश्यक असुन दि.११/०३/२०१५ रोजी मा. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचे एटी फॉर्मनुसार, खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरावी लागणार आहे.

| अ.नं. | बस क्रमांक | वाहन प्रकार | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-सी-८८५१ | स्कुल बस | ५,७२४.०० |
| ०२ | एमएच-१७-टी-८५०१ | स्कुल बस | ५,२००.०० |
| ०३ | एमएच-१७-टी-८५०२ | स्कुल बस | ५,२००.०० |
| ०४ | एमएच-१७-टी-८५०३ | स्कुल बस | ५,२००.०० |
| ०५ | एमएच-१७-टी-८५०४ | प्रवासी बसेस | ५४,०००.०० |
| ०६ | एमएच-१७-टी-८५०५ | प्रवासी बसेस | ५४,०००.०० |
| ०७ | एमएच-१७-टी-३१०३ | स्कुल बसेस | ५,८२४.०० |
| ०८ | एमएच-१७-टी-३१०४ | स्कुल बसेस | ५,८२४.०० |
| ०९ | एमएच-१७-टी-३३०१ | प्रवासी बसेस | ५९,४००.०० |
| १० | एमएच-१७-टी-३३०२ | प्रवासी बसेस | ५९,४००.०० |
| | **एकुण रक्कम (रु.)** | | **२,५९,७७२.००** |

उपरोक्त प्रमाणे १० बसेस वाहनांचा आर.टी.ओ. कार्यलयात वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.२,५९,७७२/- (अक्षरी रक्कम रु.दोन लाख एकोणसाठ हजार सातशे बहात्तर) मात्र खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल. सदर टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे अॅडव्हान्स डी.डी. आदा करावी लागणार आहे.

**मागणीः-** तरी वरील प्रमाणे १० बसेसचा वार्षिक टॅक्सची रक्कम मा. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणेस व याकामी येणा-या एकुण रक्कम रु.२,५९,७७२/- (अक्षरी रक्कम रु.दोन लाख एकोणसाठ हजार सातशे बहात्तर) मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे वाहन विभागाकडील प्रस्तावित १० बसेसच्या वार्षिक टॅक्ससाठी एकुण रु.२,५९,७७२/- मात्र भरण्यात आलेल्या रकमेस कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**१४ मालमत्ता विभागाकरिता ऑफिस फर्निचर खरेदीबाबत.**

संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने सुरु करण्यात आलेला आहे. सदर विभागाचे कार्यालयीन कामकाजासाठी बांधकाम विभागाकडील रुम नं.६३ येथे (पुर्वीचे भुसंपादन कक्ष) कर्मचारी बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्या रुममध्ये असलेले फर्निचर (टेबल, खुर्च्या, कपाटे) वापरण्यात येत होते.

जा.नं.एसएसएसटी/काअ/५०९८/२०१५ दि.११/०२/२०१५ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर सिंहस्थ कुंभमेळा व साई समाधी शताब्दी कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून त्यांची बैठक व्यवस्था बांधकाम विभागामध्ये करण्यात आलेली आहे. त्यामुळे बांधकाम विभागाकडील दि.०५/०२/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मालमत्ता विभागाकरीता रुम नं.६५ देण्यात आलेली आहे. त्यानुसार मालमत्ता विभागाचे कार्यालय रुम नं.६५ मध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

मालमत्ता विभागाचे नवीन कार्यालयासाठी खालीलप्रमाणे फर्निचर आवश्यक आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | साईज | वर्णन | कंपनी | संख्या | अंदाजे दर प्रती नग रु | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ऑफिस टेबल | 1370Wx690Dx740H mm | T-9 | गोदरेज | ०४ नग | १७,०००/- | ६८,०००/- |
| २ | स्टील कपाट | 915Wx485Dx1980H mm | | गोदरेज | ०३ नग | २०,०००/- | ६०,०००/- |
| ३ | खुर्ची (Revolving Chair) | Model No.7002 | | गोदरेज | ०४ नग | १०,०००/- | ४०,०००/- |
| ४ | संगणक टेबल | | | | ०२ नग | ८,०००/- | १६,०००/- |
| ५ | प्लॅस्टिक खुर्ची | | | | ०६ नग | ६००/- | ३६००/- |
| | | | | | | एकुण रक्कम रुपये | १,८७,६००/- |

तरी वरील दर्शविल्याप्रमाणे फर्निचर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून फर्निचर खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे येणा-या रु.१,८७,६००/- पर्यंतचे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मालमत्ता विभागाकरिता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे ऑफिस फर्निचर विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,८७,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

१५ **अतिथीगृह व मंदिर परिसर मिटींग हॉलकरीता युपीएस व बॅट-या खरेदी करणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

अतिथीगृह व मंदिर परीसरातील मिटींग हॉलमध्ये मा.व्यवस्थापन समितीमध्ये व इतर महत्त्वाच्या मिटींग चालू असतात. अशा वेळेस महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यास जनरेटर सुरु होईपर्यंत काही वेळ पुर्णत: अंधार होतो. सबब सभागृहात चालू कामकाजात व्यत्यय येऊन कामकाज विस्कळीत होते. म्हणून त्याठिकाणी पर्यायी इर्मजन्सी प्रकाशव्यवस्थेसाठी इन्व्हर्टर/ युपीएस बसवावे लागणार आहे. आपणाकडे हे युपीएस/ इन्व्हर्टर उपलब्ध नसल्याने ते नविन खरेदी करावे लागणार आहेत. याकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | कंपनी | साईज | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | युपीएस | ल्युमिनस/ मायक्रोटेक्स/ सुकाम | 2 KW/ 24V 1PHASE 50HZ | ०२ नग | रु. ९,०००/- | रु. १८,०००/- |
| ०२) | लिड ॲसीड बॅट-या/ ड्राय बॅट-या | SF सोनिक- हाय पॉवर/ एक्साईड/ कमिन्स/ ल्युमिनस | 12V 180 AH PBx 1800 | ०४ नग | रु.१३,०००/- | रु. ५२,०००/- |
| | | | | | **एकुण रक्कम:-** | **रु. ७०,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे अतिथीगृह व मंदिर परीसरातील मिटींग हॉलकरीता इर्मजन्सी लाईटबाबत नवीन युपीएस व बॅट-या खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ७०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अतिथीगृह व मंदिर परीसरातील मिटींग हॉलकरीता इर्मजन्सी लाईटसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने नवीन युपीएस व बॅट-या खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

१६ **श्री साईप्रसादालय व परिसरात असलेल्या विभागातील कर्मचा-यांसाठी वाहने पार्किंग जागेस कंपाऊंड करणेबाबत.**

श्री साई प्रसादालय विभागातील तसेच साई प्रसादालय परिसरात असलेल्या माहिती तंत्रज्ञान विभाग, लाडू निर्मिती विभाग तसेच मेकॅनिकल विभागातील कर्मचारी त्यांची वाहने प्रसादालयाकडील पुर्व बाजूस पार्कींग करीत असतात. परंतु कर्मचाऱ्यांच्या वाढत्या वाहन संख्येमुळे, सदरची जागा अपूरी पडत असलेने, कर्मचाऱ्यांना वाहने पार्कींगकरीता अडचणी येत आहेत. मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्री साई प्रसादालयात राऊंड घेतला असता, कर्मचाऱ्यांचे पार्किंगकरीता साई प्रसादालयातील पश्चिम बाजुकडील स.नं. 87/88 मधील (कुस्ती मैदान दक्षिण बाजुचे) जागेत पार्कींगची व्यवस्था करणेबाबत सूचना दिल्या आहेत.

सदरचे जागेत वाहने पार्किंग चालू करणेपूर्वी सुरक्षिततेच्यादृष्टीने चेंनलिंक जाळीचे कंपाऊंड व लोखंडी गेट करणे आवश्यक् आहे. तसेच वाहने सावलीत लावणेकरीता पार्कींग शेड तयार करणेकामी बांधकाम विभागामार्फत स्वतंत्र प्रस्ताव सादर करता येईल.

सदरचे प्रस्तावित जागेत कर्मचारी वाहने संख्या विचारात घेता 135 x 90 जागेत चेनलिंक कंपाऊंड व गेट तयार करावे लागेल. याकामी आवश्यक् मटेरिअल शिल्लक् नसल्याने सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| **अ.नं.** | **तपशील / साईज** | **मागणी** | **अंदाजे दर रुपये** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| 1. | एम.एस. ॲंगल – 50 x 50 x 5 एम.एम. | 350 किलो | 62/- | 21,700/- |
| 2. | एम.एस. ॲंगल – 40 x 40 x 5 एम.एम. | 1300 किलो | 62/- | 80,600/- |
| 3. | एम.एस. ॲंगल – 25 x 25 x 5 एम.एम. | 500 किलो | 62/- | 31,000/- |
| 4. | जी.आय. चैनलिंक जाळी 1.5’ x 1.5’ x 8 गेज, उंची – 8 फुट | 1300 किलो | 85/- | 1,10,500/- |
| 5. | एम.एस. स्वेअर पाईप 40 x 40 x 3 एम.एम. | 70 किलो | 74/- | 5,180/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6. | एम.एस. स्वेअर पाईप<br>25 एम.एम x 25 एम.एम x 18 गेज | 90 किलो | 74/- | 6,660/- |
| 7. | एम.एस. सिट – 8' x 4' x 18' गेज | 60 किलो | 78/- | 4680/- |
| 8. | 'सी' चॅनल – 125 x 65 एम.एम. | 160 किलो | 62/- | 9920/- |
| 9. | 2" मेल-फिमेल बिजागरी | 6 नग | 150/- | 900/- |
| 10. | 12" हेवी हॅड्रफ | 2 नग | 80/- | 160/- |
| 11. | एशियन मेक काळा कलर | 4 लिटर्स | 350/- | 1400/- |
| | | | **एकूण रुपये :** | **2,72,700/-** |

उपरोक्तप्रमाणे कर्मचाऱ्यांचे पार्किगकरीता साई प्रसादालयातील पश्चिम बाजेकडील स.नं. 87/88 मधील जागेत पार्कीगची व्यवस्था करणेकामी अंदाजे रुपये 2,72,700/- (अक्षरी रुपये दोन लाख, बहात्तर् हजार, सातशे) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द् करुन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलाविण्यास व याकामी येणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री साईप्रसादालय व प्रसादालय परिसरात असलेल्या विभागांमधील कर्मचा-यांच्या वाहने पार्किंग जागेस कंपाऊंड करणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,७२,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**१७ हमाली कामाचे टेंडरबाबत.**

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे गहु, तांदुळ, हरबरा, कडधान्ये व इतर वस्तु गोडावूनमध्ये उतरवून थप्पी मारणेचे हमाली काम श्री.रामराव शंकर गायकवाड, रा.शिर्डी यांना देण्यात आले होते.

सदर कामी या आर्थिक वर्षात एप्रिल २०१४ ते १३ मार्च २०१५ अखेर निव्वळ हमाली खर्च रु.३,२६,४१०.०० इतका झालेला आहे. तो वेळोवेळी विभागाकडील पेटीकॅश मधुन अदा केलेला आहे. सदर हमाली कामाची मुदत दि. ३१.०३.२०१५ रोजी संपत आहे, या कामासाठी सन २०१४-१५ करिता रु. ९,००,०००.०० (अक्षरी रुपये नऊ लाख मात्र) इतकी तरतुद आहे.

यापुर्वी सन २०१२-१३ करिता हमाली काम देणेकामी परिसरातील हमालांकडुन विहित पद्धतीने निवीदा मागविणेसाठी जनसंपर्क विभागामार्फत स्थानिक वृत्तपत्रात (सार्वमत) मध्ये जाहिरात देणेत आली होती. तथापि, त्यावेळी जेमतेम ४ हमालांनी निवीदा भरल्या होत्या. त्यातील निम्नतम दरधारकास कार्यादेश देण्यात आला होता.

संस्थानमधील या जड कामाव्यतीरीक्त बाहेरील इतर कामात अल्प श्रमात जास्त मोबदला मिळत असल्याने तिकडे हमाल लोकांचा कल जास्त दिसुन येतो तसेच हमाली काम स्थानिक पातळीवरील असल्याने बाहेरील हमाल टेंडर भरणेबाबत उदासीन दिसुन येतात.

तरी **अ)** कायदेशीर बाबींची पुर्तता करणेकामी याबाबत ई-निविदा प्रक्रिया होणे गरजेचे आहे. परंतु हमाल लोक हे अशिक्षीत किंवा जेमतेम स्वाक्षरी करणे इतपतच शिक्षीत असतात. त्यामुळे त्याचा फायदा होईलच असे वाटत नाही. त्यामुळे सन २०१५-१६ चे वार्षीक हमाली काम देणेकामी प्रचलित पद्धतीनुसार जनसंपर्क विभागामार्फत स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देउन परिसरातील हमालांकडून निवीदा मागविणेस तथा त्यातील निम्नतम दर धारकास कार्यादेश देणेस मान्यता असावी.

**ब)** तसेच उपरोक्त निवीदा प्रक्रीया पुर्ण होउन निम्नतम दरधारकास कार्यादेश देईपर्यंत कामाची गैरसोय होऊ नये म्हणुन श्री.रामराव शंकर गायकवाड यांचेकडून मागील वर्षातील अट क्र.१० नुसार पुर्वीचे दर व अटी/ शर्तीवर काम करुन घेणेकरीताचे उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे गहु, तांदुळ, हरबरा, कडधान्ये व इतर वस्तु गोडावूनमध्ये उतरवून थप्पी मारणेचे हमाली काम करुन घेणेकामी प्रचलित पध्दतीने स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, परिसरातील हमालांकडून निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच हमाली कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मागील वर्षातील ठेकेदार श्री.रामराव शंकर गायकवाड यांचेकडून पुर्वीचे दर व अटी/ शर्तीवर हमालीचे काम करुन घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**१८ मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर- २०१५ बाबत.**

श्री साईबाबा संस्थान व लायन्स क्लब ऑफ शिर्डी साई, शिर्डी यांचे संयुक्त विद्यामाने मोफत मोतीबिंदू शस्त्रकिया आयोजन करणे कामी परवानगी मिळणे बाबत मा. अध्यक्ष लायन्स क्लब ऑफ शिर्डी साई यांनी दिनांक २४/०२/२०१५ रोजीच्या अर्जाने विनंती केलेली आहे. या शिबीरामध्ये शिर्डी व शिर्डी परिसरातील माहे. एप्रिल – २०१५ च्या दुस-या आठवडयामध्ये संस्थान रुग्णालयामध्ये नेत्र तपासनी कामी आलेल्या व ज्या रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे अशा रुग्णांची यादी तयार करण्यात येणार असून त्यातील पहिल्या १ते १०० नेत्र रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

उपरोक्त १ ते १०० रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रियेकरिता येणारा खर्च, लायन्स क्लब ऑफ शिर्डी साई, शिर्डी हे स्वतः करणार असून ते रु. १,००,०००/- रक्कमेचा A/c. Payee चेक श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडे जमा करणार आहेत. असे त्यांनी सांगितले आहे.

उपरोक्त प्रमाणे निवड झालेल्या रुग्णांवर श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नेत्रविभागाकडे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करणार आहेत. सदर मोतीबिंदू शस्त्रक्रिया कामी कराव्या लागणा-या विविध खालील (अ.नं. ०१ ते ०६ करीता) बाबींसाठी प्रती रुग्णांकरीता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | POST MEDICIN | RS. | 250.00 |
| 2. | VISCO | RS. | 150.00 |
| 3. | GOGGAL COST | RS. | 20.00 |
| 4. | OPERATION COST | RS. | 550.00 |
| 5. | HOSPITAL ACCOMMODATION CHARGES ETC. | RS. | 06.00 |
| 6. | OTHER (TEA, LUNCH, DINNER) | RS. | 22.00 |
| | | **एकूण - RS.** | **998.00** |

उपरोक्त प्रमाणे प्रति रुग्णास रु. ९९८/- मात्र इतकाखर्च अपेषित आहे. त्यानुसार १०० रुग्ण x प्रति रुग्ण रु. ९८०/- याप्रमाणे एकूण रु. ९९,८००/- मात्र इतका अंदाजे खर्च येईल.

निवड झालेल्या आवश्यक त्या गरजू रुग्णांकरीता संस्थानचे रुग्णालयात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करणेबाबत रुग्णालयाचे नेत्र विभागाचे नेत्ररोगतज्ञ,वैद्यकिय अधिक्षक, तसेच वैद्यकिय संचालक, यांची चर्चा झालेली असून, झालेल्या मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर माहे – एप्रिल – २०१५ च्या शेवटच्या आठवडयात आयोजित करता येईल, असे ठरले आहे.

सदर शिबीराची प्रसिध्दी करावयाची झाल्यास याकामी बातमी वजा जाहीरात देता येईल तसेच शिबीराचे कामी आवश्यक असणारे फ्लेक्स बोर्ड तयार करावे लागतील. सदर कामी अंदाजे रु.५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरिल प्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयात लायन्स क्लब ऑफ शिर्डी साई, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजन करणे कामी परवानगी मिळणेस विनंती आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे लायन्स क्लब ऑफ शिर्डी साई, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजन करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

१९ **श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथोलॅब विभागाकरिता Rotary Microtome (Semi Automated) खरेदी करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथोलॅब या विभागाने दि.०९/०१/२०१५ रोजीचे मागणी पत्रान्वये ०१ नग Rotary Microtome (Semi Automatic) ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Microtome हे सन २००९ साली खरेदी केलेले असून ते व्यवस्थित काम देत नाही, तसेच सध्या रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झाल्यामुळे रुग्णांची संख्या वाढत आहे, त्यामुळे त्यांनी नवीन ०१ नग Rotary Microtome (Semi Automatic) ची मागणी केलेली आहे.

दि.14/11/2013 रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ९०० अन्वये वरील मागणीप्रमाणे Rotary Microtome (Semi Automatic) ०१ नग विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ८२५५२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. व त्यासाठी विहित पध्दतीने तिस-यांदा निविदा मागवून प्राप्त तांत्रिक निविदा येत्या समिती सभेपुढे समक्ष उघडण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. तेंव्हा त्याच मंजूर दराने ०१ नग Rotary Microtome (Semi Automatic) खरेदी करता येईल.

तरी १ नग Rotary Microtome (Semi Automatic) खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ८२५५२५/- चे खर्चास तसेच तसेच श्री साईबाबा रुग्णालयाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या मशिनचे मंजूर दराने खरेदी करण्यास मान्यता असावी ही विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथोलॅब विभागाकरिता आवश्यक असलेले ०१ नग Rotary Microtome (Semi Automated) मशिन, श्री साईबाबा रुग्णालयाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या मशिनचे मंजूर दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.८,२५,५२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२० **मे.सिमेंन्स कंपनीचे ५०० एम.ए. एक्स-रे मशिनचे दुरुस्तीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलमधील रेडीओलॉजी विभागात रूग्णांचे एक्स-रे काढण्यासाठी मे सिमेन्स ली. मुंबई या कंपनीचे 500mA एक्स-रे मशिन (Model- HD/KLH) पुरवठा आदेश क्र. 6366/2004 अन्वये एकुण रू. 6,25,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले असुन सदर मशिन दि. 21/08/2004 रोजी कार्यान्वीत करण्यात आले

आहे. सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 20/08/2005 रोजी संपला आहे. मशिनचे नियमीत दुरूस्ती व देखभाल करणेसाठी कंपनीकडे दि. 01/04/2014 ते 31/03/2015 या कालावधीकरीता वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेत येत आहे. (AMC) कालावधी दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची व कन्झ्युमेबलची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या दि. 08/03/2015 पासुन एक्स-रे मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र क्र. 1119, दि.10/03/2015 अन्वये कळविले आहे. त्यानुसार कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटीकरीता आले असता त्यांनी सदर एक्स-रे मशिनची तपासणी करून मशिनचा H.T. Transformer & Exposure Release Switch हा पार्ट खराब झाला असुन बदलणेची आवश्यकता असल्याचे त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट क्र. 27802, दि. 09/03/2015 अन्वये कळविले आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र. HCP-EST- 032015-043 दि. 13/03/2015 व HCP-EST-032015-020 दि. 11/03/2015 (रूग्णालये प्राप्त दि. 13/03/2015 ) अन्वये तसेच दि. 16/03/2015 चे ई-मेल द्वारे सर्व करांसहीत एकुण रू. 1,44,047/- (अक्षरी- एक लाख चव्वेचाळीस हजार सत्तेचाळीस मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रकमेची आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधी सोबत झालेल्या चर्चेनुसार सदर H.T. Transformer & Exposure Release Switch बदललेनंतर रक्कम अदा होणेस स्वीकृती दर्शविली आहे. सदर H.T. Transformer & Exposure Release Switch करीता कंपनीने सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे. सदर एक्स-रे मशिनचे स्पेअर पार्ट करीता मे. सिमेन्स ली. मुंबई हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर एक्स-रे मशिनचे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात.

तरी मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडुन एक्स-रे मशिन करीता H.T. Transformer & Exposure Release Switch बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.1,44,047/- च्या खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडुन श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एक्स-रे मशिनचा H.T. Transformer & Exposure Release Switch बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु.१,४४,०४७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**२१ श्री साईनाथ रुग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. या विभागाकरिता Pediyatric Pulse Oxymeter चे खरेदीबाबत.**

<u>**प्रास्ताविक–**</u> श्री साईनाथ रुग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. या विभागाने दि. १६/१२/२०१४ चे मागणी पत्रकान्वये ०१ नग Pediaetric Pulse Oxymeter ची मागणी केलेली आहे. कारण Pluse Rate & $Spo_2$ दोन्ही दिसतात.

सदर Pediaetric Pulse Oxymeter चे खरेदीकामी अंदाजे रु. ५००००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>**मागणी–**</u> श्री साईनाथ रुग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. या विभागाने Pediaetric Pulse Oxymeter दि. १६/१२/२०१४ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०२/०२/२०१५) अन्वये मागणी केलेली आहे.

<u>**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–**</u> अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

<u>**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–**</u> श्री साईनाथ रुग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. या विभागात Pediaetric Pulse Oxymeter ची मागणी केलेली आहे. कारण Pluse Rate & Spo2 दोन्ही दिसतात. त्यामुळे सदर ०१ नग Pediaetric Pulse Oxymeter चे खरेदी विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करता येईल.

तरी उपरोक्त ०१ नग Pediaetric Pulse Oxymeter चे विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. ५००००/- इतक्या खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील पेडीयाट्रीक ओ.पी.डी. या विभागाकरिता ०१ नग Pediyatric Pulse Oxymeter खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**२२ श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T. I & II या विभागाकरिता Surgical Instrument खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T. I या विभागाने दि. २८/१०/२०१४ आणि CVTS O.T. II या विभागाने दि. २९/१०/२०१४ रोजीच्या मागणी पत्रकान्वये काही Instrument ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करतानी अडचणी निर्माण होतात.

सदर Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडून ई – मेलव्दारे दर पत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांनी त्यांचे दि. ०१/०१/२०१५ रोजीचे ई - मेलपत्रान्वये दर कळविले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| Sr. No. | Description | CVTS O.T. I | CVTS O.T. II | Total Qty. | App. Rate Per in Rs. | App. Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Stilli Scissor 8” | 12 | 12 | 24 | 845.00 | 20280.00 |
| 2 | Staut Scissor Curved 8” | 12 | 12 | 24 | 710.00 | 17040.00 |
| 3 | Needle Holder 2-0 | 12 | 12 | 24 | 3020.00 | 72480.00 |
| 4 | Needle Holder 3-0 | 12 | 12 | 24 | 3020.00 | 72480.00 |
| 5 | Tubing Clap 8” | 12 | 12 | 24 | 2535.00 | 60840.00 |
| | **App. Total Amt. in Rs.** | | | | | **243120.00** |

उपरोक्त Surgical Instrument खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,४३,१२०/- इतका खर्च अपेक्षित आहे.
**मागणी-** श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T. I या विभागाने दि. २८/१०/२०१४ आणि CVTS O.T. II या विभागाने दि. २९/१०/२०१४ (औषध भांडार अनुक्रमे प्राप्त दि. ३०/१०/२०१४ आणि दि. १४/११/२०१४) चे मागणी पत्र.
**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** – अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.
**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सध्या त्यांचेकडे असलेले Surgical Instrument हे वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करतानी अडचणी निर्माण होतात. त्यामुळे त्यांनी खालील Instrument ची मागणी केलेली आहे. सदर Instrument ची विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी उपरोक्त Surgical Instrument खरेदी विहीत पद्धतीने निविदा मागवून करणेस व याकामी येणा-या रु. २,४३,१२०/- इतक्या खर्चास मान्यता असावी.
**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T. I & II या विभागाकरिता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे Surgical Instrument विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.२,४३,१२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२३ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता सर्जिकल Implant खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर या विभागाने दि.२८/०१/२०१५ रोजीचे मागणी पत्रकान्वये सर्जिकल Implant ची मागणी केलेली आहे. कारण सध्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत गरिब व गरजू रुग्ण दाखल होतात तसेच योजनेअंतर्गत आपणास रुग्णास सर्व प्रकारचे उपचार हे मोफत करावे लागतात. सदर पेशंटच्या पाठ व मणक्यामधील अंतर भरुन काढण्यासाठी सदर Screw व Plate चा वापर होतो. त्यामुळे त्यांनी खालील प्रमाणे सर्जिकल Implant ची मागणी केलेली आहे.

| Sr. no. | Description | Size |
|---|---|---|
| 1. | Titanium Polyaxial Pedicle screw 4.5mm | 25mm/30mm/35mm/40mm/45mm/50mm |
| 2. | Titanium Polyaxial Pedicle screw 5.5mm | 25mm/30mm/35mm/40mm/45mm/50mm |
| 3. | Titanium Polyaxial Pedicle screw 6.5mm | 25mm/30mm/35mm/40mm/45mm/50mm |
| 4. | Titanium Anterior Cervical Plate | 21.5mm/23/25/27.5/30/32.5/35/37.5/40/42.5/45/47.5/50/52.5/55/57.5/60/62.5/65/67.5/70 |
| 5. | Bone Screw for cervical plate 4mm | 10mm/12/14/16/18/20/22/24 |
| 6. | Lock screw for cervical plate | Standard |
| 7. | Connecting rod 6mm width for Mono/ poly screw | 60mm/70mm/80mm/100mm/120mm/140 mm/160mm/180mm/200mm |
| 8. | Titanium cage Kidney Type | 7mm/8mm/9mm/10mm/11mm/12mm |
| 9. | Plif cage | 20mm/22mm/24mm/28mm/30mm |
| 10. | Mesh cage | 10mm |
| 11. | Transverce connector | Standard |

उपरोक्त सर्जिकल Implant खरेदीकामी M/s. Saili Surgical, Shirdi यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| Sr. no. | Description | Size | Rate Per in Rs. | Qty. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Titanium Polyaxial Pedicle screw 4.5mm (each 05) | 25mm/30mm/35mm/40mm/45mm/ 50mm | 3850.00 | 30 | 115500.00 |
| 2. | Titanium Polyaxial Pedicle screw 5.5mm (each 05) | 25mm/30mm/35mm/40mm/45mm/ 50mm | 3850.00 | 30 | 115500.00 |
| 3. | Titanium Polyaxial Pedicle screw 6.5mm (each 05) | 25mm/30mm/35mm/40mm/45mm/ 50mm | 3850.00 | 30 | 115500.00 |
| 4. | Titanium Anterior Cervical Plate (each 01) | 21.5mm/23/25/27.5/30/32.5/35/37.5 /40/42.5/45/47.5/50/52.5/55/57.5/60 /62.5/65/67.5/70 | 11500.00 | 21 | 241500.00 |
| 5. | Bone Screw for cervical plate 4mm (each 10) | 10mm/12/14/16/18/20/22/24 | 950.00 | 80 | 76000.00 |
| 6. | Lock screw for cervical plate | Standard | 950.00 | 10 | 9500.00 |
| 7. | Connecting rod 6mm width for Mono/poly screw (each 04) | 60mm/70mm/80mm/100mm/120m m/140mm/160mm/180mm/200mm | 2250.00 | 36 | 81000.00 |
| 8. | Titanium cage Kidney Type (each 02) | 7mm/8mm/9mm/10mm/11mm/ 12mm | 7500.00 | 12 | 90000.00 |
| 9. | Plif cage (each 02) | 20mm/22mm/24mm/28mm/ 30mm | 7500.00 | 10 | 75000.00 |
| 10. | Mesh cage (each 02) | 10mm | 4500.00 | 02 | 9000.00 |
| 11. | Transverce connector (each 10) | Standard | 2250.00 | 10 | 22500.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | | **951000.00** |

**मागणी**– श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभाग यांचे दि.२८/०१/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि.०२/०२/२०१५) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देशन, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय**– तरी वरीलप्रमाणे सर्जिकल Implant विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.९,५१,०००/- चे खर्चास तसेच सदर प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता प्रस्तावात नमूद सर्जिकल Implant विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.९,५१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२४ **जादा वैद्यकिय बिलाचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** – १) जा. नं. एसएसएस-वशी रुगणालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक**– खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी**–

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल मध्ये उपचार घेतलेले** | | | | | | |
| 1 | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग- साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - परिचारिका | आई | Daibetis | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 3135.00 | 3135.00 |
| 2 | डॉ. अजितकुमार तुकाराम वाघ<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- RMO | वडील | Peritonial Dialysis | डॉ.वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 49986.00 | 49986.00 |
| 3 | श्री.सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग- ध्वनिक्षेपण<br>हुद्दा- प्र. प्रमुख | मुलगा | Heart Disease | डॉ.वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 8306.00 | 7645.00 |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | श्री. देवरे प्रशांत महादू विभाग- श्री साईनाथ रुग्णालय हुद्दा- फार्मासिस्ट | आई | General | डॉ. वर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 4079.00 | 4079.00 |
| 5 | श्री. रवि श्रावण चौधरी विभाग- वहान विभाग हुद्दा- ड्रायव्हर | आई / वडील | Daibetis / Cervical Spondylysis | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 6543.00 | 6543.00 |
| 6 | सुचिता राजीव मुठाळ विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा - सि. इनचार्ज | सासू / सासरे<br>पती | Asthama / Daibetis<br>Thyroid | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 4746.00 | 4197.00 |
| 7 | श्री.वाणी भाऊसाहेब रघुनाथ विभाग- पाणीपुरवठा हुद्दा- मदतनीस | वडील | Asthama | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | 302.00 | 302.00 |
| 8 | थोरात संगिता संजय विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा - सि. इनचार्ज | पती | Daibetis | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 9048.00 | 7883.00 |
| 9 | श्री.सुकदेव शंकर बारहाते विभाग- पाणीपुरवठा हुद्दा- तारतंत्री | आई | Daibetis | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 1445.00 | 1445.00 |
| 10 | डॉ. सुरवसे संतोष विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- ज्यू. इंटेसेव्हिस्ट | स्वतः | Heart Disease | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | 23877.00 | 23877.00 |
| 11 | डॉ. जपे प्रितम बाळासाहेब विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा - सर्जन | स्वतः | Hepatitis | डॉ.मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 37016.00 | 36478.00 |
| 12 | श्री.दिलीप भाऊसाहेब जगदाळे विभाग- प्रसादालय हुद्दा- मदतनीस | वडील / आई | Daibetis / General | डॉ. साबळे | श्री साईनाथ हॉस्पिटल | 1645.00 | 1645.00 |
| 13 | डॉ. पितांबरे मैथीली विभाग- साईनाथ रक्तपेढी हुद्दा - B.T.O. | सासू | Daibetis | डॉ. जपे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 14851.00 | 13619.00 |
| 14 | श्री. कोते मिनीनाथ भाऊसाहेब विभाग - ज्यु. कॉलेज हुद्दा-प्रयोगशाळा सहाय्यक | वडील | Daibetis, Blood Pressure | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | 1138.00 | 1138.00 |
| 15 | बोधक वैशाली विलास विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा - परिचारिका | स्वतः | HBSAg | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 30279.00 | 30279.00 |
| 16 | श्री. सरदार अमोल भगवंत विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा – RMO | वडील | Chronic Prostatitis & Blood Pressure | डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 11504.00 | 10929.00 |
| 17 | श्री.गुंजाळ संतोष शिवाजी विभाग - प्रसादालय हुद्दा - फिटर | आई | GH Secreting Pitutary Adenoma | डॉ. म्हात्रे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 16150.00 | 16150.00 |
| 18 | श्री.कोते प्रकाश भाऊसाहेब विभाग - भक्तनिवास हुद्दा - मदतनीस | स्वतः | Kidney Dialysis | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | 18001.00 | 17906.00 |
| | | | | | **एकूण रक्कम रु.** | **242051.00** | **237245.00** |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम २,३७,२४५/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा. उप समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान कायम कर्मचा-यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२५ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता फर्नीचर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताविक:-** श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागाने त्यांचे विभागात सध्या असलेली फर्निचर वापरुन खराब झालेली आहे तसेच काही वॉर्डमध्ये रुग्णांची संख्या वाढल्यामुळे सध्या त्यांचेकडे असलेली फर्निचर कमी पडत आहे. त्यामुळे त्यांनी नवीन हॉस्पिटल फर्निचरची मागणी केलेली आहे. सदर मागणीबाबतचे सविस्तर तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.९२६६७५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही मा. उप समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतर विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदी करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ - २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** तरी सोबतच्या तक्त्यात नमूद केलेप्रमाणे जा. क्र. एसएसएस/वशी/ खरेदी/ ३३६५/ २०१४, दि. १८/१०/२०१४ रोजीचे परिपत्रकान्वये फर्निचर खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ९२६६७५/- चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता फर्नीचर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,२६,६७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२६ **साबण, वॉशिंग पावडर, बॅटरी सेल इ. साहित्य खरेदीकामी पुरवठा आदेश देणेस व मंजूर रक्कमपेक्षा जास्तीच्या खर्चास मान्यता असावी.**

श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरिता दैनंदिन वापरासाठी लागणारे साबण, वॉशिंग पावडर, बॅटरी सेल, पेन्सील सेल इ. साहित्य दरवर्षी वार्षिक औषधे खरेदीमध्ये निविदा मागवुन खरेदी करण्यात येतात. सन २०१३-१४ या वर्षात सदरचे खरेदीकामी कोणाचीही ई-निविदा प्राप्त झालेली नव्हती त्यामुळे दि.०७/०३/२०१४ चे मंजुर टिपणीन्वये व मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१२/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४५२ (ब) अन्वये स्थानिक विक्रेत्याकडून कोटेशन मागवुन खरेदी करण्यात आली होती. सदर साहित्यामधील खालील साहित्याचा साठा संपत आलेला आहे. त्यामुळे खरेदी करणे गरजेचे आहे.

सदर साहित्याची पुढील वार्षीक सन २०१५-१६ मध्ये मागणी केलेली असून सदर खरेदीची प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी आजुन चार ते पाच महिने लागेल तो पर्यंत कामाची गैरसोय होऊ नये म्हणून स्थानिक पुरवठाधारकांकडून कोटेशन मागवुन खरेदी करता येईल.

दोन्ही रुग्णालयांच्या दैनंदिन वापरासाठी वार्षीक मागणीतील खालील प्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Simple Shaving Blades Qty. in Nos. | 2500 | 1.25 | **3125.00** |
| 02. | Soap 125 GM | 250 | 30 | **7500.00** |
| 03. | Washing Powder Packing in KG | 250 | 40 | **10000.00** |
| 04. | Steel Battery Cell Hyper (Pencil) | 100 | 10 | **1000.00** |
| 05. | Steel Battery Cell Hyper (Big) | 50 | 15 | **750.00** |
| 06. | Steel Battery Cell Hyper (Medium) | 50 | 15 | **750.00** |
| 07. | Battery Cell 9.0 Volt (For Pacemaker) | 10 | 40 | **400.00** |
| | **Total** | | | **23525.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे रक्कम रु.२३,५२५/- (अक्षरी – तेवीस हजार पाचशे पंचवीस मात्र रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१०/०१/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये उपरोक्त साहित्य खरेदीकामी कोटेशन मागविण्यास मंजुरी मिळालेली असून त्यानुसार एकुण ८ कोटेशनधारकांकडून दि.१०/०२/२०१५ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरुन४ कोटेशन प्राप्त झाले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

१) M/s. Nikhil Agencies, Kopergaon (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०२/२०१५)
२) M/s. Shirode & Sons, Kopergaon (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०२/२०१५)
३) M/s. Trimurti Electricals & Entertainment Shirdi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.११/०२/२०१५)
४) M/s. Aasha Agencies, Kopergaon (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०२/२०१५)

वरील सर्व कोटेशन हे मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे. तर अ.नं. १ व ४ यांना कोटेशन मागणी पत्र पाठविले नसून त्यांनी स्वतःहून कोटेशन पाठविले आहे. तुलनात्मक दर मिळणेच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकतो, त्यामुळे वरील दोन्ही कोटेशन विचारात घ्यावे असे मत आहे.

वरील प्रमाणे प्राप्त बंद कोटेशन दि.२७/०२/२०१५ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आलेले असून त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निम्नतम दरानुसार मा.उप कार्यकारी अधिकारी सो यांची मान्यता घेऊन खरेदी करावे असे ठरले. तुलनात्मक तक्त्यामधील दरानुसार अ.नं.१,२ व ३ करिता M/s. Shirode & Sons, Kopergaon यांचे निम्नतम दरानुसार एकुण रु.२२५००/- ती अ.नं.४ करिता M/s. Shirode & Sons, Kopergaon व M/s. Trimurti Electricals & Entertainment Shirdi यांचे दोघांचेही दर सारखेच असल्यामुळे दोघांनाही प्रत्येकी ५० नगांसाठी रक्कम रु.४२५/- चा पुरवठा आदेश देण्यात येत आहे.तसेच अ.नं. ५,६ व ७ करिता M/s. Trimurti Electricals & Entertainment Shirdi यांचे निम्नतम दरानुसार एकुण रु.१८३०/- पुरवठा आदेश देण्यात येत आहे.त्यानुसार दि.१०/०१/२०१५ रोजीचे टिपणीन्वये उपरोक्त साहित्य खरेदीकामी एकुण रक्कम रु.२३५२५- इतक्या खर्चाची मंजुरी मिळालेली होती. परंतु प्रत्यक्षाततुलनात्मक तक्ता पाहताएकुण रु.२५१८०/- इतका खर्च येत आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी येणा-या एकुण रक्कम रु.१६५५/- च्या वाढीव खर्चास तसेच सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे साहित्य खरेदीस पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साबण, वॉशिंग पावडर, बॅटरी सेल इ. साहित्य खरेदीकामी संबंधीतांना पुरवठा आदेश देणेस व मंजूर रकमेपेक्षा रु.१,६५५/- मात्र येणा-या जास्तीच्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२७ **श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन २०१५-१६ या वर्षाकरिता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक 18/02/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 30 (32) अन्वये श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त् निवासस्थान येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी बाहेरील निविदाधारकांकडून विहीत पध्दतीने निविदा मागविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 6,30,000/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार निविदा विक्रीसाठी दिनांक 22/03/2015 रोजी 'दैनिक पुढारी' या वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे वेबसाईटवर निविदा नोटीस अपलोड करुन पाठविण्यात आली होती. निविदा विक्री दिनांक 24/03/2015 ते 30/03/2015 अशी होती. या कालावधीत खालील निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | मे. अशोका एअर कंडिशनिंग इंडस्ट्रीज, अहमदनगर | 3. | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट् सोल्युशन प्रा. लि., पुणे |
| 2. | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | | |

वरीलप्रमाणे निविदा विक्री कालावधीत एकूण 3 निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या. निविदा सबमिशन तारीख 03/04/2015 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे 3 निविदा प्राप्त् झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | मे. अशोका एअर कंडिशनिंग इंडस्ट्रीज, अहमदनगर | 3. | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट् सोल्युशन प्रा. लि., पुणे |
| 2. | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | | |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त् निवासस्थान येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१) | मे. अशोका एअर कंडिशनिंग इंडस्ट्रीज, अहमदनगर | १०,४०,०००/- |
| ०२) | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | **३,४२,३१५/-** |
| ०३) | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट् सोल्युशन प्रा. लि., पुणे | ४,९९,९९९/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त् निवासस्थान येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रु.३,४२,३१५/- निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही -मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२८ **श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे सन २०१५-१६ या वर्षाकरिता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक 18/02/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 30(33) अन्वये श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी बाहेरील निविदाधारकांकडून विहीत पध्दतीने निविदा मागविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 4,75,000/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार निविदा विक्रीसाठी दिनांक 22/03/2015 रोजी 'दैनिक पुढारी' या वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे वेबसाईटवर निविदा नोटीस अपलोड करुन पाठविण्यात आली होती. निविदा विक्री दिनांक 24/03/2015 ते 30/03/2015 अशी होती. या कालावधीत खालील निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | मे. अशोका एअर कंडिशनिंग इंडस्ट्रीज, अहमदनगर | 3. | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट् सोल्युशन प्रा. लि., पुणे |
| 2. | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | | |

वरीलप्रमाणे निविदा विक्री कालावधीत एकूण 3 निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या. निविदा सबमिशन तारीख 03/04/2015 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे 3 निविदा प्राप्‍त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | मे. अशोका एअर कंडिशनिंग इंडस्ट्रीज, अहमदनगर | 3. | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट् सोल्युशन प्रा. लि., पुणे |
| 2. | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | | |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये |
|---|---|---|
| ०१) | मे. अशोका एअर कंडिशनिंग इंडस्ट्रीज, अहमदनगर | ७,५४,६५०/- |
| ०२) | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | **३,४८,१३९/-** |
| ०३) | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट् सोल्युशन प्रा. लि., पुणे | ३,९९,९९९/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रु.३,४८,१३९/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यता यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही -मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२९ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील संगणक दुरुस्ती देखभालीसाठी आवश्यक असणारे संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये विविध विभागांत संगणक संच कार्यान्वीत आहे.सदर संगणक संच कायम वापरात असल्याने त्यात वेळोवेळी बिघाड निर्माण होतात त्याचे दुरूस्ती करता स्पेअर पार्टसची आवश्यकता असते. याकामी सन-2014-2015 या आर्थिक वर्षा करीता संगणकिय साहित्याचे स्पेअर पार्टस खरेदी करुन काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 5,00,000/-(अक्षरी पाच लाख रुपये मात्र) चे खर्चास मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.19/09/2014 रोजी सभेतील निर्णय क्रं.783 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे वेबसाईटवर माहिती तंत्रज्ञान विभागमार्फत निवीदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निवीदा सादर करण्याची अंतीम मुदत दि.31/01/2015 ठेवण्यात आली होती.त्यानुसार सदर कालावधीमध्ये निवीदा प्राप्त झालेल्या आहे.

परिशिष्ट "अ"

| अ.नं. | निवीदा धारकांचे नाव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| 01. | M/s. Saisiddhi Printres, Kopargaon | 5094 | दि.03/02/2015 |
| 02. | M/s. Sujata Computers Pvt.Ltd, Pune | 5098 | दि.03/02/2015 |
| 03 | M/s. Surendra Traders, Nashik | 5119 | दि.05/02/2015 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निवीदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील संगणक दुरुस्ती देखभालीसाठी आवश्यक असणारे संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या निविदांमधील मूळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा व मा.कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने त्यामधील निम्नतम दरधारकांस सदरहूकामी पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

३० **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना-** संस्थानतर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि.३० जुलै, २०१५ ते दि.०१ ऑगस्ट २०१५ अखेर श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग,स्टेज,कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ निमित्त करावयची व्यवस्थाः (कालावधी दि.३०/०७/२०१५ ते दि.०१/०८/२०१५ अखेर ०३ दिवस)

**०१. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | श्रींचे चावडीसमोरील जागेत १८' उंचीचा | ५०'x३०' | १५००.०० |
| २ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरासमोर | ६०'x४०' | २४००.०० |
| ३ | द्वारकामाई ते रथ पालखी गेट पर्यंत | १६०'x१७' | २७२०.०० |
| ४ | समाधी मंदिर गेट नं.३ ते मारुती मंदिरापर्यंत १५' उंचीचा | ५०'x२०' | १०००.०० |
| ५ | श्री मारुती मंदिर ते शामसुंदर हॉलपर्यंत दक्षिणोत्तर १५ उंचीचा | ६०'x२५'<br>३५'x२०' | १५००.००<br>७००.०० |
| ६ | गेट नं.४ करीता बाहेरील बाजूस | ५५'x२५' | १३७५.०० |
| ७ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता कनात व बिछायतीसह | १५'x१५' | २२५.०० |
| ८ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह. | १५'x१५' | २२५.०० |
| ९ | पालखी स्वागता करीता तसेच माहिती केंद्रासाठी स्वागत कक्ष येथे माहिती केंद्रासाठी कनात व बिछायतीसह. | १५'x१५' | २२५.०० |
| १० | जुने प्रसादालय प्रवेशद्वार (नगर – मनमाड फुटपाथ व आतील बाजूने मोबाईल लॉकर पर्यंत) | ३०'x१०' | ४५०.००<br>११२५.०० |
| ११ | साई धर्मशाळा येथे पालखी ठेवण्यासाठी | ९०'x६०'<br>९०'x४०' | ५४००.००<br>३६००.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **२१४४५.००** |
| | **अंदाजे रु.१.५० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (०१ साठी) रुपये-** | | **९६,५०३.००** |

**०२. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिर उत्तर बाजूस,चावडी गेट ते नगरद्वार गेटपर्यंत १८' उंचीचा. | २८४'x१९'.५'' | ५५१५.२८ |
| २ | गेट नं.३ समोरील मोकळया जागेत (१६ आर जागेत) | २१०'x८०' | १६८००.०० |
| ३ | साई कॉम्प्लेक्स समोर पिंपळवाडी रस्त्यांवर दर्शन रांगेसाठी. | २९२'x१८' | ५२५६.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **२७५७१.००** |
| | **अंदाजे रु.२.२० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (०२ साठी) रुपये-** | | **१,८१,९६७.००** |

**०३. पालखीतील पदयात्री साईभक्तांचे निवासासाठी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कनात व बिछायतीसह (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)**

**कालावधीः – ३०.०७.२०१५ ते दि.०१.०८.२०१५ अखेर ०३ दिवस.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | शिंगवे नाईक येथे | ४०'x६०' | २४००.०० |
| २ | गुहा, ता. राहुरी येथे | ४०'x६०' | २४००.०० |
| ३ | निर्मळपिंप्री, ता. राहाता येथे. | ४०'x६०' | २४००.०० |
| **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | | **७२००.००** |
| **अंदाजे रु.२.२० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (०३ साठी)रुपये-** | | | **४७,५२०.००** |

**०४. मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे स्टेज व्यवस्थाः – (कालावधी दि.३०.०७.२०१५ ते दि.०१.०८.२०१५ अखेर ०३ दिवस)**

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर रु. प्रति चौ.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे स्टेज व्यवस्थाः – मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्थाः – ३ उंचीचे स्टेज, स्टेजवर सिंथेटीक मॅटींग, स्टेजचे मागील बाजूस आकर्षक रंगाचा पडदा, व कलाकरांचे मेकअपसाठी १६'x१०' साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे तसेच सदरहू कार्यक्रमासाठी फायबर खुर्च्या ३०० नग इ. सह स्टेज व्यवस्था साईज – १६'x२४' | ३८४ चौ.फुट | २०/- | २३,०४०/- |
| **एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च (०४ साठी )** | | | | **२३,०४०/-** |

**बॅरीकेडींगः** – कालावधी ३०.०७.२०१५ ते दि.०१.०८.२०१५ अखेर ०३ दिवस.

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण / एकक | अंदाजे दर रु. प्रति चौ.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेटींग करणे. | ९०० रनिंग फुट | ६.६ | १७,८२०/- |
| **एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च (०५ साठी )** | | | | **१७,८२०/-** |
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ साठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षीत एकूण अंदाजे खर्च-** | | | | **३,७१,३५२/-** |

वरील तक्तयांत नमूद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ निमित्त श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.३,७१,३५२/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

तरी वरीलप्रमाणे गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ निमित्त मंडप व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.३,७१,३५२/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,७१,३५२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**३१ सन- २०१५ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट- कलम (१) अन्वये *"...भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे..." अशी* तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि.३० जुलै २०१५ ते दि.०१ ऑगस्ट २०१५ अखेर श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. साईभक्तांचे पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून दि.०१/०७/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ९२ दिवस मंदिर परिसरात विविध ठिकाणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेत येतात. सदर मंडपाचा वापर गुरुपौर्णिमा उत्सवात साईभक्तांसाठी होतो. पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे पावसापासून संरक्षण होणेकामी मंदिर परिसरात मंडप उभारणीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**(अ) पावसाळयाकरीता ताडपत्रीचे छत असलेले (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले ) कापडी मंडप व्यवस्थाः – कालावधी दि.०१/०७/२०१५ ते दि.३०/०९/२०१५ अखेर एकूण ९२ दिवस.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिरबाहेर पडण्याचा मार्ग ते श्री गुरुस्थान मंदिराचे समोरील बेसमेंटचे पश्चीम बाजू पर्यंत (पुर्व - पश्चिम) | १५०'x१०' | १५००.०० |
| २ | बेसमेंटचे पश्चिम बाजूस (दक्षिण – उत्तर) | ५०'x१५' | ७५०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजूस, दक्षिणोत्तर असा | ४५'x४०' | १८००.०० |
| ४ | व्हि.आय.पी. दर्शन रांगेसाठी (शनि गेट) | ६५'x०८' | ५२०.०० |
| ५ | गेट नं.०३ समोर | ४५'x२०' | ९००.०० |
| ६ | जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम प्रवेशद्वारासमोर | ३०'x७०'<br>२५'x२०' | २१००.००<br>५००.०० |
| ७ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ नंदादिप समोर | ११५'x३५' | ४०२५.०० |
| ८ | साईप्रसाद नं.०२/ चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत. | १५'x६०'<br>१५'x२०' | ९००.००<br>३००.०० |
| ९ | लाडू विक्री काऊंटर समोर | ६०'x३०' | १८००.०० |
| १० | नगर मनमाड रस्ता पुर्व बाजू फुटपाथवर | ४३०'x८' | ३४४०.०० |
| ११ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू फुटपाथवर | ४००'x७' | २८००.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **२१३३५.००** |
| | **अंदाजे रु.०.२२ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (अ साठी)रुपये-** | | **४,३१,८२०.००** |

**(ब) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले)–**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | **मंडपाची साईज** | **चौरस फुट** |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिरासमोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह ) | ६१'x६१' | ३७२१.०० |
| २ | उदी वाटप कांऊटर समोर | ४५'x३०' | १३५०.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **५०७१.००** |
| | **अंदाजे रु.०.१९ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (ब साठी)रुपये-** | | **८८,६४१.००** |
| | **पावसाळयासाठी करावयाच्या मंडप व्यवस्थेसाठी अपेक्षीत खर्च (अ+ब )एकूण रु.** | | **५,२०,४६१.००** |

वरील तक्यांत नमूद केलेप्रमाणे पावसाळयाचे कालावधीत श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.५,२०,४६१/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

तरी वरीलप्रमाणे पावसाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.५,२०,४६१/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई– निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१५ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु..५,२०,४६१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३२ **संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२५ (पैकी) मधील साईनगर मैदानाचे उत्तर बाजूने चैनलिंक जाळीचे फेन्सिंग करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम 21 मधिल पोटकलम (1) च्या खंड (क्) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** साईनगर येथिल संस्थानचे मैदानात व परिसरातील इमारतींचे पार्कीगमध्ये / समोरील भागात रस्त्यांचे बाजूला या भागातील रहिवाशी, कर्मचारी, रुग्णांचे नातेवाईक व विद्यार्थी वाहने लावतात. या परिसरात असंख्य् दुचाकी व चार चाकी वाहने लावलेली असतात. त्याचा फायदा घेवून वाहनचोरी, इमारतीमधील रुमचे लॉक तोडुन मौल्यवान वस्तूंची/ साहित्य् चोरीच्या घटना, छोटेमोठे अपघात होत असल्याने पुर्व-पश्चिम वॉल कंपाउंड व रोडला रोड स्टोन बसविणेबाबत प्र.संरक्षण अधिकारी यांनी कळविले आहे.

सदर मैदानाचे पुर्व व पश्चिमेकडील बाजूचे रस्त्यावर रहदारीचे नियंत्रणाचे दृष्टीने पाईपचे गेट (Boom barricade) तयार करून बसविणेत आलेले आहे. तथापि त्यामुळे चोरीच्या घटनांवर नियंत्रण आलेले दिसुन येत नाही. उपरोक्त सुचनेनुसार साईनगर मैदान व परिसरातील इमारतींचे संरक्षणाचे दृष्टीने उत्तर बाजुने सदरचे क्षेत्रास 170 मी. लांबीचे कंपाउंड करावे लागणार आहे. सदरचे मैदानातील काही भाग ओपन स्पेसमध्ये आहे तसेच या भागात श्री साईबाबा हॉस्पीटलचे डॉक्टरांचे निवाससाठी इमारत प्रस्तावीत आहे.

**प्रस्ताव:-** तरी तुर्त साईनगर मैदानाचे उत्तरेकडील बाजूस चेनलिंक जाळीचे फेन्सिंग करुन गेट बसविणेसाठी सन 2014-2015 चे जिल्हा दरसुचीनुसार रु.2,59,554/- मात्र इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२५ (पैकी) मधील साईनगर मैदानाचे उत्तर बाजूने चैनलिंक जाळीचे फेन्सिंग करणेस व याकामी येणा-या रु.२,५९,५५४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**३३ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत शिर्डीत होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापनासाठी स्थापन करणेत यावयाचे संस्थानचे दक्षता पथकातील सदस्यांना प्रशिक्षण देणेबाबत.**

नाशिक येथे संपन्न होणा-या सिहंस्थ कुंभमेळ्यानिमित्त शिर्डी येथे दिनांक २७ ऑगष्ट २०१५ ते २६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत श्रींच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन व त्या अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या विविध उपाययोजनांबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे उपस्थितीत दि.२४/११/२०१४ व दि.२९/११/२०१४ रोजीचे बैठकीत ठरलेप्रमाणे शिर्डी शहर व परिसरात शासकीय तसेच निमशासकीय विभागांनी करावयाची कामे व उपाययोजनांबाबतचे तपशिलासह प्रस्ताव संबंधीत विभागाचे सक्षम प्राधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी सादर करणेबाबत कळविलेले होते .

**अ)** त्यानुसार मा. निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर यांना उपरोक्त दि.२६/१२/२०१४ रोजीचे पत्राने त्यांचे विभागाकडून करावयाच्या सुविधांबाबत व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेबाबत पत्रव्यवहार केलेला होता.

**ब)** उपरोक्त दि. २६/१२/२०१४ रोजीचे पत्रास अनुसरुन निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर यांनी दि. १७/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ निमित्त शिर्डी येथे आपत्ती व्यवस्थापन आराखडा व उपाययोजना करणेबाबत या कार्यालयाकडे आवश्यक ते तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने सदरची कामे आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा, पुणे यांचेमार्फत करून घेण्यात यावे, असे कळविलेले होते.

**क)** उपरोक्त दिनांक १७/०१/२०१५ रोजीचे पत्राने निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर यांनी कळविलेप्रमाणे, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा -२०१५ करीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथिल आपत्ती व्यवस्थापन करणे, उपाययोजनांबाबत प्रस्ताव तयार करणे व संस्थानचे आपत्ती व्यवस्थापन पथकातील कर्मचा-यांना आवश्यक ते प्रशिक्षण देणेकामी तारीख व वेळ मिळावी व आपले संस्थेच्या आपत्ती व्यवस्थापन केंद्रामार्फत तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करणेत यावे, अशी विनंती दि.१४/०२/२०१५ व दि. २३/०३/२०१५ रोजीचे पत्राव्दारे मा. महासंचालक, यशदा, पुणे यांना करणेत आली होती.

इकडील दि. १४/०२/२०१५ व दि. २३/०३/२०१५ रोजीचे पत्रास अनुसरुन, आपत्ती व्यवस्थापन विभाग यशदा, पुणे यांनी त्यांचे दि. २६/०३/२०१५ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

*.. .. सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ च्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी या ठिकाणी साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे कालावधीसाठी व्यवस्थापन करणेसाठी संस्थानचे दक्षता पथकातील सदस्यांस प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी यशदाच्या परिपत्रकानुसार खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आले आहेत.*

*A) यशदामध्ये प्रशिक्षण (डी.एस.सी.)= २०००/- प्रती व्यक्ती, प्रती दिवस.*

*B) बाह्य प्रशिक्षणासाठी= ८००/- प्रती व्यक्ती, प्रती दिवस, शिर्डी येथे प्रशिक्षण घेण्यासाठी पुढील बाबी अपेक्षित आहे.*

*१) प्रशिक्षण कार्यक्रमासाठी हॉलची व्यवस्था (LCD Projector व White Board)*

*२) प्रशिक्षणार्थी करीता दोन वेळेसचा चहा व दुपारचे भोजन यासाठी लागणारा खर्च एकूण रु.१००/- (रुपये शंभर मात्र) प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिन याप्रमाणे यशदाकडून अदा करण्यात येईल. सदर व्यवस्था आपल्या कार्यालयामार्फत करणे अपेक्षित आहे. तसेच यशदाच्या धोरणानुसार सदर प्रशिक्षण खर्चाच्या **५०%** रक्कम अग्रीम दिल्यास प्रशिक्षण सुरु होईल. ३० प्रशिक्षणार्थी यांचे ०३ दिवसांचे एक प्रशिक्षण या करीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.*

***एका प्रशिक्षणाचा दर (किमान ३० प्रशिक्षणार्थी)***

| | |
|---|---|
| *यशदा प्रशिक्षण(२०००x०३x३०) = १,८०,०००/-* | *=९०,०००/- (५०% रक्कम) अग्रीम* |
| *शिर्डी येथे बाह्य प्रशिक्षण(८००x०३x३०) = ७२,०००/-* | *=३६,०००/- (५०% रक्कम) अग्रीम* |

*उपरोक्त दराला आपली मान्यता मिळाल्यास आपल्या आवश्यकतेनुसार एकूण प्रशिक्षणाची संख्या ठरवून सदर प्रशिक्षणांची ५०% आगाऊ रक्कम मा. महासंचालक, यशदा ह्या नावावर चेक अथवा डी.डी. व्दारे देण्यात यावी. आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी द्यावयाच्या सहाय्याबाबत प्रत्यक्ष चर्चा करुन निर्णय घेता येईल.*

**ड)** यशदा, पुणे यांनी त्यांचे उपरोक्त दि. २६/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये, संस्थानमार्फत उभारण्यात येणारे वाहनतळे, निवास व्यवस्था, दर्शनरांग, संस्थान परीसरातील आपत्ती व्यवस्थापनासाठी जे दक्षता पथक तयार करणेत येणार आहे, त्या पथकातील सदस्यांना प्रशिक्षण देणेसाठी सविस्तर प्रस्ताव दिलेला आहे. त्यापैकी दुसरा पर्याय म्हणजेच शिर्डी येथे बाहय प्रशिक्षण (०३ दिवस) हा पर्याय उचित असून, याकामी किमान ३० कर्मचा-यांना प्रशिक्षण द्यावयाचे ठरल्यास रुपये **७२०००/-** मात्र अधिक यशदा, पुणे यांचेकडून येणा-या प्रशिक्षकांसाठी निवास व भोजनव्यवस्था संस्थानला करावी लागणार आहे. (परंतु यशदा, पुणे यांनी याबाबत त्यांचे पत्रात काही नमूद केलेले नाही.)

याबाबींचा विचार करीता, कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थान परीसरासह नियोजीत वाहनतळे, दर्शन रांगा इत्यादीसाठी संभाव्य गर्दीचे आपत्ती व्यवस्थापनाकरीता निमित्त करावयाचे नियोजन व उपाययोजना याबाबत यशदा, पुणे या संस्थेकडून संस्थान आस्थापनेवरील कमीत कमी ३० कर्मचा-यांना ०३ दिवसांचे प्रशिक्षण द्यावयाचे ठरल्यास अंदाजे रक्कम रुपये ७२,०००/- मात्र तसेच इतर व्यवस्था (जसे प्रशिक्षण हॉल, प्रशिक्षणासाठी एलसीडी प्रोजेक्टर व इतर साहित्य, प्रशिक्षकांची भोजन व निवासव्यवस्था इत्यादी) करावी लागणार आहे. संस्थान आस्थापनेवरील अशा प्रशिक्षणार्थ्यांची निवड सामान्य प्रशासन विभाग यांचेकडून करणेत येईल. असा प्रशिक्षण वर्ग आयोजित करणेबाबत सामान्य प्रशासन विभाग व संरक्षण विभाग यांचेमार्फत उचित कार्यवाही करणेत येईल.

तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी तयार करावयाचा आराखडा व मार्गदर्शन याबाबत यशदा, पुणे यांचेशी समक्ष चर्चा करुन निर्णय घेता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे संस्थान परीसरासह नियोजीत वाहनतळे, दर्शन रांगा इत्यादीसाठी संभाव्य गर्दीचे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण संस्थान आस्थापनेवरील किमान ३० कर्मचा-यांना देणेकामी व याकामी येणा-या रुपये ७२,०००/- मात्रचे खर्चास व संस्थानतर्फे प्रशिक्षणासाठी हॉल एलसीडी प्रोजेक्टर व व्हाईट बोर्डची व्यवस्था करणेस तसेच मा. महासंचालक,यशदा, पुणे यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे याकामी अग्रीम रक्कम रुपये ३६,०००/- मात्र यांचेकडे जमा करणेस मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, दक्षता पथक)

---

**३४ संस्थानमधील एनर्जी ऑडीटबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

सध्या वीजेच्या जाणवणा-या वीज तुटवडा कमी करण्यासाठी केंद्र सरकारमार्फत एनर्जी कॉन्झर्व्हेशन ॲक्ट-२००१ पास झाला आहे. कमीत कमी वीजेचा वापर करुन वीजेची मागणी व वीजेचे उत्पादन यातील दरी कमी करु शकतो. यासाठी एनर्जी ऑडीट महत्त्वाचे आहे.

या एनर्जी ऑडीटमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

०१). योग्य क्षमतेच्या वीजेच्या दिव्यांचा वापर

०२). झिरो पॉवर कन्झम्पशन रेग्युलेटर वापर

०३). लोड कंट्रोल करुन मॅक्झीमम डिमांड कमी करणे.

०४). वापरलेले युनिटस् व मॅक्झीमम डिमांड यांचे गुणोत्तर

०५). पॉवर फॅक्टर वाढविण्यासाठी कॅपॅसिटरचा उपयोग

०६). इफिएन्ट स्ट्रीट लाईटचा उपयोग

०७). ६०% पेक्षा जास्त लोडने चालणा-या इलेक्ट्रीकल मोटार्स

०८). **विद्युत सुरक्षा:-** सामग्रीची मांडणी आराखडा, तापमान, देखभालीसाठीच्या जागेची उपलब्धता.

०९). **संरक्षण:-** कमाल विद्युत भार लक्षात घेऊन त्यानुसार केबल्स, स्विचगिअर, ट्रान्सफॉर्मर, डीजी सेटस आदींची क्षमता पुरेशी आहे का ?

१०). **विद्युत संरक्षण:-** रिलेची सुरक्षा व्यवस्था आणि त्यातील त्रुटींची पातळी.

११). थर्मल इमेजिंग आणि ‘हॉट स्पॉटस’ यांचा शोध

१२). विद्युत मापक यंत्रणा पुरेशी आहे का, ते पाहणे. मीटरची स्थिती आणि क्षमता जोखणे.

१३). **‘आर्थिंग ’ची पाहणी:-** आर्थिंगची रचना आणि कामगिरी यांचा सविस्तर अभ्यास

१४). अति महत्त्वाच्या विभागांमध्ये विद्युतपुरवठा कायम राहण्यासाठीच्या उपाययोजना आढावा (उदा.समाधी मंदिर, आय.टी.सर्व्हर रुम) व्यवस्थापन आणि बॅक-अप व्यवस्थेची पाहणी, आपत्कालीन योजना.

१५). गेल्या वर्षभरातील विजेचा वापर आणि दर आकारणी योजना

१६). विविध ऊर्जा स्त्रोतांचा अभ्यास विद्युत, लायटिंग, वातानुकुलित यंत्रणा, बॉयलर, डिझेल आणि एलपीजी

१७). विविध उपकरणे आणि सयंत्रे यांचा आराखडयानुसार आणि प्रत्यक्ष ऊर्जा वापर याचा अभ्यास.

१७). विविध उपकरणे आणि सयंत्रे यांचा आराखडयानुसार आणि प्रत्यक्ष ऊर्जा वापर याचा अभ्यास.

१८). अस्तित्वात असलेल्या सौरऊर्जा यंत्रणेचा अभ्यास

एनर्जी ऑडीटमध्ये स्टाफकडून केल्या जाणा-या कामामध्ये त्यांचे कामाबद्दलचे ज्ञान, कामात झोकून देण्याची प्रवृत्ती, नियमावली व कामातील जबाबदारी याचाही आढावा घेतला जातो. कारण स्टाफ स्वत:च्या जबाबदा-या ओळखून काम करु लागेल व टेक्नीकली त्याचे ज्ञान वाढले जाईल, तेव्हा एनर्जी सेव्हींग्जचे लक्ष्य काही प्रमाणात आपोआप गाठले जाते.

एनर्जी ऑडीटमध्ये सध्याचा वीज वापर तपासून त्यानुसार एनर्जी सेव्हींग्जकरीता उपाययोजना केल्यास वीज वापर १५ % ते १६% नी कमी होतो.

याकामी मे.प्रिमिअम लाईटींग सोल्युशन्स, मुंबई या कंपनीने संस्थानचे एनर्जी ऑडीट करुन देण्याबाबत पत्र दिले असून त्यांच्या श्री.विवेक प्रधान यांनी संस्थानला दि.२७ जानेवारी २०१५ ला भेट दिली होती व पाहणी केली होती. काही दिवसानंतर त्यांच्या काही इंजिनिअर्सनी शिरडीस येऊन संस्थान इमारतींची व त्यात बसविण्यात आलेल्या इलेक्ट्रीकल इन्स्टॉलेशन्सची पाहणी केली व माहिती घेतली. मे.प्रिमिअम लाईटींग सोल्युशन्स, मुंबई या कंपनीस मानाचे एमएसडीयुके २०१४ हे ॲवार्ड मिळालेले असून कंपनीने इटाली तसेच लंड्न याठिकाणी काम केलेले असून भारतात मुंबई एअरपोर्ट, कॅडबरी, इन्फोसिस, गोदरेज ॲड बॉईस, स्टेट बँक ऑफ इंडिया, सिंडिकेट बँक, देक्कम ओडीसी अशा ठिकाणी काम केलेले आहे.

आता मे.प्रिमिअम लाईटींग सोल्युशन्स, मुंबई या कंपनीने संस्थानचे एनर्जी ऑडीट विनामुल्य करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. एनर्जी ऑडीट करण्यासाठी कोणतीही फी ते आकारणार नाहीत. फक्त ज्यावेळी

संस्थानचे एनर्जी ऑडीट करण्यासाठी मे.प्रिमिअम लाईटींग सोल्युशन्स, मुंबई या कंपनीचे इंजिनिअर्स येतील त्यावेळी १० दिवसाकरीता त्यांना साईनिवासमधील एक रुम मोफत द्यावी लागणार आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मे.प्रिमिअम लाईटींग सोल्युशन्स, मुंबई या कंपनीकडून संस्थानचे एनर्जी ऑडीट विनामुल्य करुन घेणेस व याकामी मे.प्रिमिअम लाईटींग सोल्युशन्स, मुंबई यांच्या इंजिनियर्सना निवासासाठी साईनिवास इमारतीमधील एक खोली १० दिवसांकरीता मोफत उपलब्ध करुन देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**३५ कनिष्ठ महाविद्यालयाकरीता प्रयोगवहया (जर्नल) छपाई करणेबाबत.**

सन २०१५-१६ कनिष्ठ महाविदयालयातील इ.११ वी विज्ञान शाखेत २४० विदयार्थी व १२वी विज्ञान शाखेत २४० याप्रमाणे ४८० विदयार्थी शिक्षण घेत आहेत.या वर्गातील विदयार्थ्यांना भौतिकशास्त्र, रसायणशास्त्र, जीवशास्त्र, माहिती तंत्रज्ञान व गणित या विषयासाठी प्रयोगवहयांची (जर्नल) आवश्यकता आहे.

**मागणी:-** खालीलप्रमाणे प्रयोगवहयांची छपाई करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | छपाई संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | भौतिकशास्त्र – जर्नल | ५०० | ७५.०० | ३७५००.०० |
| ०२ | रसायनशास्त्र - जर्नल | ५०० | ६५.०० | ३२५००.०० |
| ०३ | जीवशास्त्र – जर्नल | ५०० | ८०.०० | ४००००.०० |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान – जर्नल | ५०० | ६०.०० | ३००००.०० |
| ०५ | गणित - जर्नल | ४०० | ७०.०० | २८०००.०० |
| | | | **एकूण रुपये-** | **१६८०००.००** |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** वरीलप्रमाणे प्रयोग वहयांची (जर्नल) छपाई करणे आवश्यक आहे.

१) वरीलप्रमाणे प्रयोग वहयांची (जर्नल) छपाई करणेस तसेच त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,६८,०००/- (अक्षरी रुपये एक लाख,अडुसष्ट हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) जनसंपर्क कार्यालयामार्फत नगर,नाशिक,पुणे व मुंबई येथील वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस तसेच त्याकामी येणा-या खर्चास मान्यता असावी.

३) छपाई खरेदीवर १० % सेवाशुल्क आकारुन प्रयोगवहयांची विदयार्थ्यांना विक्री करण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,६८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**३६ कनिष्ठ महाविद्यालयाकरीता उत्तरपत्रिकांची करणेबाबत.**

सन २०१५-१६ मध्ये कनिष्ठ महाविदयालयातील ११ वी व इ.१२ वी कला,वाणिज्य व विज्ञान शाखेत १४४० विदयार्थी शिक्षण घेणार आहेत. या वर्गातील विदयार्थ्यांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात चाचणी व सत्र परीक्षेसाठी उत्तरपत्रिकांची आवश्यकता आहे.

**मागणी:-** खालीलप्रमाणे उत्तरपत्रिकांची छपाई करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | पेपर साईज | छपाई संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | उत्तर पत्रिका (पुरवणी) २ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | A 4 | ३०,००० प्रती | १.२५ पैसे प्रती नग | ३७५००.०० |
| ०२ | उत्तर पत्रिका (पुरवणी) ४ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | A 4 | १५,००० प्रती | २.२५ पैसे प्रती नग | ३३७५०.०० |
| ०३ | उत्तर पत्रिका ८ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | A 4 | २०,००० प्रती | ३.२५ पैसे प्रती नग | ६५०००.०० |
| ०४ | उत्तर पत्रिका १२ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | A 4 | ३५,००० प्रती | ४.०० पैसे प्रती नग | १४००००.०० |
| ०५ | उत्तर पत्रिका १६ पानी ७० जीएसएम व्हाईट मॅपलिथो पेपर | A 4 | ५,००० प्रती | ४.५० पैसे प्रती नग | २२५००.०० |
| | | | | एकूण रुपये- | २,९८,७५०.०० |

वरील उत्तरपत्रिकांची छपाई करणेकामी अंदाजे रुपये- २,९८,७५०/- (अक्षरी रुपये- दोन लाख, आठ्यान्नव हजार, सातशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१५-१६ उत्तरपत्रिका बजेट तरतूद रक्कम रु.६,००,०००/- मधून करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-**

१) वरीलप्रमाणे उत्तरपत्रिकांची छपाई करणेस, त्याकामी येणा-या अंदाजे रु. २,९८,७५०/- (अक्षरी रुपये- दोन लाख, आठ्यान्नव हजार, सातशे,पन्नास ) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) जनसंपर्क कार्यालयामार्फत नगर, नासिक, पुणे, मुंबई येथील वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस तसेच त्याकामी येणा-या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,९८,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**३७ जनहित याचिका क्र.२५/ २०१२ मधील मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांचे चौकशीचे कामकाजाचे बीलाबाबत.**

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात श्री संजय भा. काळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक 25/2012 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. 10/12/2014 रोजी दिलेल्या आदेशा नुसार चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची नेमणुक केलेली आहे.

श्री ॲड. पी.एस. परांजपे साहेब, चौकशी अधिकारी यांनी दि. 24/01/2015 पासून चौकशीचे कामकाजास सुरुवात केली असुन ते चौकशीकामी दि. 24/01/2015, दि. 14/02/2015 व दि.08/03/2015 रोजी उपस्थित होते. सदर चौकशीचे कामकाजाचे तीन बीले मा. श्री पी.एस. परांजपे सो ा. यांनी दि. 10/03/2015 रोजी संस्थानला सादर केली असुन त्याचा खालील प्रमाणे तपशिल आहे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1) | 24/01/2015 | PSP/14-15/055 दि.10/03/2015 | 25,000/- |
| 2) | 14/02/2015 | PSP/14-15/057 दि.10/03/2015 | 25,000/- |
| 3) | 08/03/2015 | PSP/14-15/060 दि.10/03/2015 | 25,000/- |
| 4) | इतर खर्च बील | PSP/14-15/062 दि.10/03/2015 | 15,000/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | **90,000/-** |

उपरोक्त प्रमाणे जनहित याचिका क्रमांक 25/2012 मधील चौकशीचे कामकाजा कामी तीन तारखांचे रक्कम रुपये - 90,000/- (नव्वद हजार) मात्रचे बील चौकशी अधिकारी, मा. श्री.पी.एस. परांजपे साहेब, यांनी मागणी केलेली आहे. मा. श्री पी.एस. परांजपे साहेब, यांनी दिलेल्या दि. 10/03/2015 रोजीचे पत्रा मध्ये त्यांना महाराष्ट्र शासनाने अधिसुचने व्दारे महाराष्ट्र शासनाचे पॅनल 'अ' ॲडव्होकेट म्हणून नेमणूक केलेली असल्याचे नमुद केलेले आहे. त्याबाबत दि. 21/09/2013 रोजीचे अधिसुचनेची झेरॉक्स प्रत त्यांनी सोबत जोडली आहे. सदर फी अदायगी करीता 13/03/2015 रोजीचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी सो ा. यांचे "सध्या प्रस्तावित केल्याप्रमाणे अदा करणेत यावे दरम्यान "अ" प्रमाणे माहिती घेण्यात यावी" असे निर्देश दिलेले आहेत. प्रस्तुतचे निर्देशास अनुसरुन सदरचे बील अदायी कामी लेखाशाखा विभागाकडे पाठविण्यात आले आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो ा. यांचे शेऱ्या नुसार "अ" प्रमाणे माहिती पुढील प्रमाणे आहे. महाराष्ट्र शासनाच्या विधी अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम 1984 च्या सेवाशर्ती नुसार विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि. 27/03/2008 च्या आदेशा मध्ये विधी अधिकारी यांना किती मानधन द्यावे याबाबत नमुद कलेले आहे. परंतू चौकशी अधिकारी यांना किती मानधन द्यावे याबाबत नमुद केलेले नाही. मा. श्री पी.एस.परांजपे सो ा यांनी त्यांचे पत्रात त्यांना दि. 21/09/2013 चे महाराष्ट्र शासनाचे अधिसुचना प्रमाणे तीन वर्षाकरीता नियुक्ती देण्यात आलेली आहे. व त्यांना "अ" मंडळ समुपदेशी म्हणून नियुक्त करण्यांत आले असून त्याकरीता महाराष्ट्र सरकार (विधी व न्याय विभाग) यांचे रिझोल्युशन नं. डीजीपी-2806/एम.एस. 129(42)14 मंत्रालय मुंबई दि. 16/01/2008 प्रमाणे सुप्रिम कोर्टात ग्रुप "अ" ॲडव्होकेट करीता रेग्युलर मॅटर करीता रु. 5000/- प्रत्येक दिवशी व मिस्लेनिअस मॅटर करीता रु. 4000/- प्रत्येक दिवशी नमुद केलेली आहे. परंतू चौकशी अधिकारी यांना किती मानधन द्यावे याबाबत नमुद केलेले नाही.

मा.उच्च न्यायालयाच्या दि. 10/012/2014 रोजीच्या आदेशात पॅरा नं. 5] The expenditure and charges of such inquiry shall be borne by respondent no.2. असे नमुद आहे. त्यानुसार मा. श्री पी.एस.परांजपे सो ा यांनी मागणी केलेले बील संस्थानला अदा करावे लागणार आहे.

तरी जनहित याचिका क्रमांक 25/2012 मधील चौकशीचे कामकाजा कामी चौकशी अधिकारी, मा. श्री पी.एस. परांजपे साहेब, यांना त्यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांचे रक्कम रु. 90,000/- बीले अदा करणेचे कार्यात्तर मंजूरीस सादर व पुढील येणारे बीले अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, जनहित याचिका क्र.२५/ २०१२ मधील चौकशीचे कामकाजाकामी चौकशी अधिकारी, मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब, यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे तीन तारखांचे रक्कम रु. 90,000/- मात्र फी सध्या आदा करणेत यावी. तसेच चौकशी अधिकारी यांना प्रत्येक तारखेस किती फी द्यावी, याबाबत विधिज्ञांकडून मार्गदर्शन घेण्यात येऊन, फी निश्चित करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.०३** **दिनांक २६.०४.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१४५** दिनांक २६.०४.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०४** **सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत फेरसादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सि.व्ही.टी.एस विभागातील डॉक्टरांनी त्यांना मिळत असलेल्या इन्सेंटीव्हमध्ये वाढ करणेबाबत मागणी केली आहे. सदर प्रस्ताव दि.१६/०४/२०१५ रोजीचे सभेमध्ये फेर सादर करण्यात आला होता. त्यावर इतर रुग्णालयांकडील इन्सेन्टीव्हबाबत अधिक माहिती संकलित करणेत यावी तसेच याबाबत अधिक माहिती न मिळाल्यास १५ दिवसांच्या आत विशेष सभा घेण्यात येईल, असे ठरले होते.

**इन्सेन्टीव्ह बाबत पार्श्वभुमी:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय सेवा देणेबाबत व शिर्डी सारख्या ठिकाणी सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध होऊन टिकुन राहण्यासाठी डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रुग्णांना आकारण्यात येणा-या बिलातील विशिष्ट रक्कम देणेबाबत मा.व्य.स.सभेमध्ये निर्णय संमत झाला आहे. गरीब व गरजु रुग्णांना कमीत कमी दरात हृदयशस्त्रक्रिया वैद्यकिय सेवा देण्यास अनुसरुन इतर रुग्णालयांच्या तुलनेत दर कमी ठेवुन त्याप्रमाणे डॉक्टरांनाही इन्सेंटीव्ह ठरविण्यात आला होता. सि.व्ही.टी.एस. विभागात विशेषता बायपास सर्जरीबाबत मे २००६ पासून ते आजपर्यंत दर आकारणी व सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ, इन्टेंसिव्हीस्ट डॉक्टर व परफयुजनिस्ट यांना देण्यात येणारा इन्सेंटीव्ह यामध्ये झालेले बदल थोडक्यात खालील प्रमाणे :-

| निर्णय क्र.५५०/ दि.१९.०८.२००६ | | निर्णय क्रं.७७०/ दि.२२.०९.२००७ | | निर्णय क्रं.१९६/ दि.०८.०३.२००९ | | निर्णय क्रं.८२०/दि.०८.१०.२०१२ (JD & RGJAY) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६५,००० | १४,००० | ७५,००० | १५,००० | ८३,००० | १५,००० | १,२५,००० | १५,००० |

निर्णय क्रं.५५०/ दि.१९.०८.२००६ पासुन सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ डॉक्टरांची रक्कम तीच असुन त्यानंतर पुढील ५ वर्षात दर आकारणी रु.६५,०००/- वरुन रु.८३,०००/- व सध्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत ती रु.१,२५,०००/- करण्यात आली असून डॉक्टरांना देण्यात येणा-या इंन्सेन्टीव रकमेत कोणतीही वाढ करण्यात आलेली दिसत नाही. या विभागातील डॉक्टरांनी वाढलेल्या दरास अनुसरुन इंन्सेन्टीव्ह रकमेत वाढ करणेबाबत मागणी केली होती, तथापी राजीव गांधी जीवनदायी योजना प्रत्यक्ष दर अंमलबजावणीचे वेळी विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. तथापि, यामध्ये अदयाप वाढ करण्यात आलेली नाही. कार्डीयाक सर्जन यांनी सदर बाबत प्राधान्याने विचार करण्यात यावा असे दि.१९.०८.२०१३ रोजीचे पत्रान्वये लेखी विनंती केली आहे. सदर प्रस्ताव मा.व्य.स. सभेपुढे दि.०५.०६.२०१४ रोजी सादर करण्यात आला होता निर्णय क्रं.३४४ अन्वये तो स्थगित ठेवण्यात आला होता, आपल्या हॉस्पिटलला चांगल्या डॉक्टरांची सेवा सतत पुढे चालु राहण्यासाठी या प्रस्तावावर पुनःश्च विचार होणे आवश्यक असल्याने प्रस्ताव फेर सादर केला होता. यावर निर्णय क्र.९८/दि.१२.०३.२०१५ अन्वये सविस्तर चर्चा होऊन तत्वतः मान्यता देण्यात आली होती व त्यानंतर दि.१६/०४/२०१५ रोजीचे सभेत फेर सादर करण्यात आला होता. त्यामध्ये इतर रुग्णालयांकडील इंन्सेन्टीव्हबाबत अधिक माहिती संकलित करणेत यावी तसेच याबाबत अधिक माहिती न मिळाल्यास १५ दिवसाच्या आत सभा घेण्यात येऊन निर्णय घेतला जाईल, असे ठरले होते. त्यास अनुसरुन सदरबाबत इतर रुग्णालयांकडे विचारणा केली असता अधिकृत माहिती प्राप्त होऊ शकलेली नाही. तथापि, महाराष्ट्रामध्ये कार्यरत असलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेप्रमाणेच आंध्रप्रदेशामध्ये कार्यरत असलेल्या आरोग्य श्री योजनेच्या स्किमचा जी.आर. उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये डॉक्टरांना इंन्सेन्टीव्ह म्हणून देण्याची रक्कम नमूद केलेली आहे. ही रक्कम देऊ केलेल्या पॅकेज रकमेच्या ३५ % इतकी नमूद केलेली आहे. त्यास अनुसरुन प्रस्तावित व तुलनात्मक असे **परिशिष्ट अ** सोबत जोडले आहे. महाराष्ट्रामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या स्किममध्ये डॉक्टरांना विशिष्ट रक्कम ठरविलेली नाही. सदर रक्कम रुग्णालयपरत्वे ज्या त्या रुग्णालयांवर अवलंबून राहिल, अशी माहिती मिळाली आहे. इतर रुग्णालयांमध्ये त्याप्रमाणे रक्कम अदा करण्यात येत आहे. श्री साईबाबा रुग्णालयामध्येही इंन्सेन्टीव्ह देण्यात येत आहे. तथापि, सदर रकमेत ऑगष्ट २००६ पासून वाढ करण्यात आलेली नव्हती.

1. ऑगष्ट २००६ पासून सी.व्ही.टी.एस. विभागातील होणारी मुख्यता “बायपास सर्जरी” चा दर रु.६५,०००/- होता तो सध्या रु.१,२५,०००/- इतका झालेला आहे. साधारणता अशाच प्रकारे इतरही दर आहेत, अवलोकनार्थ् सोबत परिशिष्ट अ जोडले आहे.
2. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यरत असल्याने संपूर्ण रक्कम प्राप्त होत आहे, सवलतीचा बोजा सोसावा लागत नाही.
3. साधारणता ८ ते ९ वर्षात इंन्सेन्टीव्ह मध्ये वाढ झालेली नाही. तथापि, तज्ञ डॉक्टरांच्या अनुभवात वाढ झाली असून अवघड शस्त्रक्रिया सुध्दा होत आहेत.

सदर बाबींचा विचार करता आंध्रप्रदेशामध्ये कार्यरत असलेल्या शासकीय आरोग्य श्री योजनेच्या स्किमप्रमाणे डॉक्टरांना देण्यात येणा-या इंन्सेन्टीव्हमध्ये परिशिष्ट अ मध्ये प्रस्तावित केलेनुसार अथवा त्याचे अवलोकन होऊन इंन्सेन्टीव्हमध्ये वाढ करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१४६** **आजचे सभेत उपरोक्त प्रस्तावावर चर्चा करणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर हे उपस्थित होते. सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबतचा विषय समितीने त्यांना समजावून सांगितला व याकामी आवश्यक असलेली कागदपत्रे त्यांना देण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांनी सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचे तांत्रिक मार्गदर्शन घ्यावे व त्याचा अहवाल अंतीम निर्णयासाठी पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०५** **कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील यापुर्वी कपात केलेल्या इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करण्यास व फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजिस्ट यांनाही ते दर लागू करणेबाबत फेरसादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागातील डॉक्टरांनी त्यांना मिळत असलेल्या इंन्सेन्टीव्हमध्ये वाढ करणेबाबत व फिक्स मानधनावरील कार्डीयालॉजिस्ट यांनांही ते दर लागू करणेबाबत प्रस्ताव दि.16/04/2015 रोजीचे सभेमध्ये फेरसादर केला होता. त्यावर इतर रुग्णालयांकडील इन्सेन्टीव्हबाबत अधिक माहिती संकलित करण्यात यावी. तसेच अधिक माहिती न मिळाल्यास 15 दिवसांचे आत विशेष सभा घेण्यात येईल, असे ठरले होते.

**<u>इन्सेन्टीव्हबाबत थोडक्यात पार्श्वभुमी:-</u>** कार्डीयालॉजी विभागातील डॉक्टरांना मासिक वेतना व्यतिरीक्त कामाचे विशिष्ट प्रमाणात मोबदला देण्याबाबत वेळोवेळी मा.व्य.स. चे सभेत निर्णय संमत झाले आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणे :-

1. निर्णय क्र.196/दि.08.03.2009 अन्वये लागु असलेल्या इन्सेव्टीव्ह दरास अनुसरुन एकूण दोन कार्डीओलॉजिस्ट यांना प्रत्येकी मासिक वेतना व्यतिरिक्त साधारणत: रु.20 ते 25 लाखांपर्यंत इन्सेन्टीव्ह दिला जात होता. सध्या या दोन कार्डीओलॉजिस्ट यांना आर्थिक गैरव्यवहार व कामातील निष्काळजीपणामुळे खातेनिहाय चौकशीकरिता सेवा निलंबित करण्यात आले आहे.

2. दरम्यानच्या कालावधीत मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हल ॲप्लीकेशन नं.2797/2014 दि.19.03.2014 अन्वये, सहा महिने कालावधीकरिता कार्डीयालॉजिस्ट नेमणुकीस मान्यता मिळाली होती. त्यास अनुसरुन 2 पुर्णवेळ फिक्स मानधनावर व 5 व्हिजिटींग कार्डीओलॉजिस्टंचा पॅनल विहीत पध्दतीने नियुक्त करण्यात आला होता. पैकी डॉ.मनोहर शिंदे या कार्डीयालॉजिस्ट यांना मासिक रु.3 लाख मात्र इन्सेन्टिव्ह मंजुर करण्यात आला होता व नियुक्तीचे वेळी कार्डीओलॉजिस्ट यांनी मागणी केलेनुसार खालीलप्रमाणे पर केस इन्सेन्टीव्ह मंजुर करण्यात आला होता.

| **पुर्वीचा इन्सेन्टीव दर (रुपये)**<br>निर्णय क्र.196/दि.08.03.2009 | | **नव्याने लागू करण्यात आलेला इन्सेन्टीव्ह दर (रुपये)**<br>क्र.343 दि.05.06.2014 | |
|---|---|---|---|
| ॲजिओग्राफी | १,०००/- | ॲजिओग्राफी | ३००/- |
| ॲजिओप्लास्टी १ व २ स्टेन्टकरिता इतर सर्व समकक्ष प्रोसिजर्स | ८,०००/- व १०,०००/- | ॲजिओप्लास्टी १ व २ स्टेन्टकरिता इतर सर्व समकक्ष प्रोसिजर्स | ३०००/- |
| २ डी इको, टीएमटी | १८०/- | २ डी इको, टीएमटी | १८०/- |

डॉ.मनोहर शिंदे यांना सर्व प्रकारच्या प्रोसिजर्सचा व कामाचा जास्त अनुभव असल्याने त्यंनी दरमहा रु.3 ऐवजी 4 लाखाची नियुक्ती कालावधीमध्ये मागणी केली होती. तथापि, त्यांच्या कामाचा अभिप्राय पाहून वाढ करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे सांगण्यात आले होते.

3. सहा महिने कालावधीकरिता नेमणूका केल्यानंतर कॅथलॅब विभागाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा :-

इन्सेव्टीव्ह दर कमी झाल्याने मासिक साधारणत: रु.40 ते 45 लाखांवरुन इन्सेन्टीव्ह रु.15 ते 20 लाखापर्यंत आला. म्हणजे साधारणत: रु.20 ते 25 लाखांपर्यंत मासिक आर्थिक बोजा कमी झाला. इन्सेन्टीव्ह दर कमी झाल्याने व्हिजिटींग एकूण 05 डॉक्टरांच्या पॅनेलपैकी दोन डॉक्टर व्हिजिट देण्याचे बंद झाले. उर्वरित डॉक्टरांनीही इन्सेन्टीव्ह वाढीची मागणी केली आहे.

तथापि, सहा महिने कालावधी पुर्ण झाल्यानंतर आपल्या मागणीचा विचार केला जाईल असे त्यांना वेळोवेळी सांगण्यात येऊन पुर्वीच्या दोन कार्डीओलॉजिस्ट यांच्या सेवा निलंबनाच्या कालावधीत रुग्णांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेणेबाबत त्यांना सांगण्यात आले होते.

4. मा.मुबंई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन नं.290/2015 दि.12.01.2015 अन्वये, या कार्डीओलॉजिस्ट डॉक्टरांना पुढील एक वर्षांकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे व त्यास अनुसरुन त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. तथापि, या डॉक्टरांच्या मागणीप्रमाणे इन्सेन्टीव्ह वाढ झालेली नसल्याने सदर कार्डीऑलॉजिस्ट सोडून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पैकी व्हिजिटींग डॉक्टरांनी लेखी मागणी केली आहे तर मासिक फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजिस्ट डॉ.मनोहर शिंदे व डॉ.प्रशांत पवार यांनीही दि.04/02/2015 रोजी एक महिना नोटीस कालावधी नमूद करुन राजीनामा पत्रे दिली आहेत.

5. व्हिजिटींग डॉक्टर नाशिक, औरंगाबाद येथून व्हिजिट देण्यासाठी येत असतात, त्यांना किमान व्हिजिटची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी इन्सेन्टीव्हमध्ये प्रमाणावर वाढ करण्याची मागणी केली आहे.

6. डॉ.मनोहर शिंदे यांनी मासिक फिक्स रु.3 लाख मानधनाऐवजी वेतनाचे प्रमाणात साधारणत: मासिक फिक्स मानधन व लागु असलेल्या इन्सेन्टिव्ह दराप्रमाणे प्रति केस काम केल्याच्या प्रमाणात इन्सेन्टिव्हची मागणी केलेली आहे.
कॅथलॅब विभागाच्या कामाचा आढावा घेतला असता रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे, त्यास अनुसरुन कार्डीओलॉजिस्ट डॉक्टर यांची आवश्यकता आहे. तथापि, कार्डीओलॉजिस्ट यांना इतरत्र ठिकाणी मिळत असलेल्या इन्सेन्टीव्हच्या प्रमाणात आपल्या रुग्णालयामध्ये सध्याच्या इन्सेन्टीव्ह दरामध्ये काही प्रमाणात वाढ करणे व्यवहार्य वाटत आहे. त्यास अनुसरुन पुर्वीचे इन्सेन्टीव्ह दर, डॉक्टरांची मागणी व प्रस्तावित केलेले दर आपले अवलोकनार्थ खालीलप्रमाणे सादर केले आहेत :-

| कॅथलॅब प्रोसिजर्स | मा.व्य.स. निर्णय क्र.196/8.3.2009 पुर्वीचा दर | मा.व्य.स.निर्णय क्र.343/5.06.2014 सध्याचे दर | **डॉक्टरांची मागणी** | प्रस्तावित दर (रु.) |
|---|---|---|---|---|
| अॅजिओग्राफी | 1000/- | 300/- | 1,500/- | 1,000/- |
| अॅजिआप्लास्टी 1 व 2 स्टेन्टकरिता | 8000 (Single Stent) व 10,000 (Double Stent) | 3000 (Single & Double) | 8000 (Single Stent) व 10,000 (Double Stent) | 8,000 (Single Stent) व 10,000 (Double Stent) |
| 2 डी इको, टीएमटी | 180/- | 180/- | 420/- | **250/-** |
| TEE Test | 180/- | 180/- | 700/- | **500/-** |
| BMV, BPV/BAV, POBA, COA Dilation, PDA Coil Closure | 7500/- | 3,000/- | 7,500/- | **7,500/-** |
| ASD,VSD,PDA Device Closure, IVC Filter, | 10,000/- | 3,000/- | 10,000/- | **10,000/-** |
| Permanent Pacemaker, | 8000+2000 (सर्जन) | 3000+2000 (सर्जन) | 10,000/- (8,000+2000 सर्जन) | 10,000/- (सर्जन वापरल्यास पैकी 2000 सर्जनसाठी) |

तसेच पुर्णवेळ कार्डीओलॉजिस्ट डॉ.मनोहर शिंदे रुजू झाल्यापासून त्यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये या विभागातील काही नवीन प्रोसिजर्स सुरु केल्या आहेत त्यापैकी काही प्रोसिजर्सचा समावेश राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत असल्याने त्या कराव्या लागतील, त्याव्यतिरिक्त सुध्दा काही प्रोसिजर्स आहेत, त्यांचे दर ठरवून त्याही आपल्या हॉस्पिटलमध्ये सुरु करता येतील. थोडक्यात अशा प्रोसिजर्स, राजीव गांधी योजनेनुसार त्यांचे दर व इतर नवीन प्रोसिजर्स यांचे सर्वसाधारण दर व त्यावर डॉक्टरांनी मागणी केलेले इन्सेन्टीव्ह दर खालीलप्रमाणे :-

| **I . राजीव गांधी योजनेत समाविष्ट असलेल्या परंतु नव्याने सुरु करता येणा-या प्रोसिजर्स** | | | | |
|---|---|---|---|---|
| नवीन कॅथलॅब प्रोसिजर्स | मा.व्य.स. निर्णय क्र.196 दि.08.03.2009 पुर्वीचा दर | प्रस्तावित दर (राजीव गांधी योजनेतील मंजूर दरपत्रकानुसार) | डॉक्टरांची इन्सेन्टीव्ह मागणी | **प्रस्तावित दर (रु.)** |
| Aorta Interventions | 0 | 1,10,000/- | 15000/- | 10,000/- |
| CoA Stenting | 0 | 80,000/- | 10000/- | 10,000/- |
| Peripheral Interventions | 0 | 60,000/- | 10,000/- | 10,000/- |
| Carotid Interventions | | 1,50,000/- | 12,000/- | 10,000/- |
| EPS+RFABasic Arrythmias | 0 | 70,000/- | 10,000/- | 10,000/- |
| EPS+RFA Complex Arrythmias | 0 | 95,000/- | 12,000/- | 12,000/- |
| **II . राजीव गांधी योजनेव्यतिरिक्त नवीन प्रोसिजर्स खालीलप्रमाणे** | | | | |
| Pediatric Echo | 0 | 1,000/- | 500/- | 500/- |
| Dual chamber PPI/ | 0 | 30,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 10,000/- |
| ICD (Defrilator) | 0 | 70,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 15,000/- |
| BiVPacing | 0 | 60,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 16,000/- |
| Combo Device (Pacing) | 0 | 80,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 16,000/- |
| EPS | 0 | 5,500/- | 3000/- | 1,000/- |

कार्डीओलॉजिस्ट यांचे इंन्सेन्टीव्ह वाढीचा प्रस्ताव मा.व्य.स. सभेत सादर करण्यात आला होता. दि.12/03/2015 रोजीचे सभेत त्यास तत्वत: मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन डॉक्टरांनी काम पुर्ववत काम सुरु ठेवलेले असुन सदर प्रस्ताव दि.16/04/2015 रोजीचे सभेत फेरसादर करण्यात आला होता. त्यामध्ये इतर रुग्णालयांकडील इंन्सेन्टीव्हबाबत माहिती अधिक संकलिक करण्यात यावी व अधिक माहिती न मिळाल्यास 15 दिवसांच्या आत विशेष सभा घेण्यात येऊन निर्णय घेतला जाईल, असे ठरले होते. त्यास अनुसरुन इतर रुग्णालयांकडे विचारणा केली असता अधिकृत माहिती प्राप्त होऊ शकलेली नाही. तथापि, महाराष्ट्रामध्ये कार्यरत असलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेप्रमाणेच आंध्रप्रदेशामधेही कार्यरत असलेल्या आरोग्य श्री योजनेचा जी.आर. उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये पॅकेज रकमेच्या 35% इतकी रक्कम इंन्सेन्टीव्ह म्हणून डॉक्टरांना देण्याचे नमूद केले आहे. आपल्या रुग्णालयामध्ये सध्या देत असलेला इन्सेन्टिव्ह कमी असल्याने डॉक्टरांनी वाढीची मागणी वेळोवेळी केली आहे. त्या प्रमाणात या विभागात होणारी अँजिओप्लास्टी प्रोसिजर रु.60,000/- वजा रु.12,500/- स्टेंट चार्जेस वजा जाता 35% रु.16,625/- पैकी डॉक्टरांची मागणी यापुर्वीइतकी असलेली रक्कम रु.8000/- ते 10000/- इतकी उपरोक्तप्रमाणे आहे.

1. ऑगष्ट 2006 पासून कॅथलॅब विभागातील शस्त्रक्रिया/ प्रोसिजर्स वरील इंन्सेन्टीव्ह दरात वाढ झालेली नाही तर मागिल वेळी त्यामध्ये कपात झाली आहे.

2. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत संपूर्ण रक्कम प्राप्त होत असल्याने साधारणत: सध्या सवलतीचा बोजा पडत नाही.

3. शस्त्रक्रिया /प्रोसिजर्स मध्ये वापरण्यात येणा-या इंम्प्लांटसचे खरेदी दर त्या मानाने कमी झाले असून ड्रग कोटेड स्टेंट वापरामुळे दयावी लागणारी सवलत कमी झाली आहे.

4. डॉक्टरांची संख्या वाढल्याने कॅथलॅब विभागाचे कामकाज चांगल्या प्रकारे चालू असून अनुभवी डॉक्टर्स टिकुन राहण्यास व नव्याने मिळण्यास मदत होईल.

5. राजीव गांधी योजनेअंतर्गत किमान एक कार्डीयॅलॉजिस्ट पुर्ण वेळ असणे आवश्यक आहे. डॉ.मनोहर शिंदे यांना कामाचा चांगला अनुभव असुन कार्डियॅलॉजी विभागासबंधीत इंम्प्लांटस खरेदीमध्ये त्यांच्या अनुभवाचा मोठया प्रमाणावर किंमती कमी मिळण्यास फायदा होत आहे.

तरी या सर्व बाबींचा विचार करता कार्डीओलॉजिस्ट डॉक्टरांनी इंन्सेन्टीव्हमध्ये मागतलेली वाढ होण्यास व डॉ.मनोहर शिंदे कॉर्डीयॅलॉजिस्ट यांना मासिक फिक्स रु.3 लाख मानधनाऐवजी मासिक वेतनाच्या प्रमाणात साधारणत: रुपये 60,000/- मात्र मानधन देवुन पुर्णवेळ ठेवण्यास अधिक इतर कार्डीयॅलॉजिस्ट प्रमाणे त्यांना कामाच्या प्रमाणात प्रतिकेस इन्सेन्टिव्ह लागू करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१४७** **आजचे सभेत उपरोक्त प्रस्तावावर चर्चा करणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर हे उपस्थित होते. कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील यापुर्वी कपात केलेल्या इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करणेबाबतचा विषय समितीने त्यांना समजावून सांगितला व याकामी आवश्यक असलेली कागदपत्रे त्यांना देण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांनी कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवर डॉक्टरांना इन्सेन्टीव्ह देणेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचे तांत्रिक मार्गदर्शन घ्यावे व त्याचा अहवाल अंतीम निर्णयासाठी पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०६** **डॉ.हरिष हुकूमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी चौकशी अधिकारी नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलुन व इतर साहीत्याचा वापर करणेकरता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रुग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी आलेल्या आहेत. सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि.०३.०८.२०१४ २०१४ सभेत सविस्तर चर्चा झालेली आहे. सदरच्या सभेत निर्णय क्र. ६०६ असा पारित करणेत आला की, डॉ. आर. व्ही. प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांची या प्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी प्रथम डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांना कारणे दाखवा नोटीस बजवावी त्यासाठी विशिष्ट वेळ देवून संबंधितांचे लेखी म्हणणे मागविणेत यावे संबंधितांचे लेखी खुलासे प्राप्त झालेनंतर चौकशी अधिकारी यांनी चौकशीकामी सुरुवात करावी. चौकशी पूर्ण झालेनंतर चौकशी अधिकारी यांनी चौकशीचा अहवाल एक महिन्याचे आत मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर करावा असे ठरले.

मा. व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांना दि. २०.०८.२०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मायांनी दि. २२.०८.२०१४ रोजी विनंती अर्ज सादर करुन खुलासा सादर करणेकामी दोन महिन्याच्या मुदतीची मागणी केली होती. चौकशी अधिकारी यांनी त्यांना दि. ०९.०९.२०१४ रोजी लेखी खुलासा सादर करणेकामी सात दिवसाची मुदत दिली. याबाबत त्यांना लेखी पत्राव्दारे कळविले आहे. तरी देखील त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही.

प्राथमिक चौकशीत सकृत दर्शनी असे दिसून येते की, डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवरील आरोपात तथ्य आहे. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९८३ अन्वये डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर दि. ०६.११.२०१४ रोजी रितसर आरोपपत्र बजावलेले आहे. तथापि खाते चौकशीत साक्षीदारांवर दबाव आणू नये तसेच कागदपत्रांमध्ये फेरफार, बदल, नष्ट करु नये यासाठी आरोपीत डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांना दि. ०८.११.२०१४ पासून तात्पुरते संस्थान सेवेतून सेवा निलंबीत करण्यात आले आहे. तसेच या निर्णयात असे म्हटले आहे की, चौकशी अधिकारी यांनी पुढील चौकशी करुन लवकरात लवकर चौकशी अहवाल सादर करावा असे ठरले. त्यानंतर डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी निलंबन आदेश व आरोपपत्र यांचेविरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपिठ, औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन क्र. १००५५ व १००६०/२०१४ दाखल केलेले आहेत.

आता, डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर आरोपपत्र बजावले असुन खाते निहाय चौकशी सुरु करणे आहे. त्यासाठी स्वतंत्र चौकशी अधिकारी यांची नेमणूक करावी लागेल कारण सदर प्रकरण डॉ. रामायणम व्यंकट प्रभाकरराव यांनी प्राथमिक चौकशीत चौकशी अधिकारी म्हणून काम केलेले आहे. तसेच सदर आरोपीत डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा यांनी डॉ. रामायणम व्यंकट प्रभाकरराव यांचेवर आक्षेप व आरोप केलेले आहेत. संस्थान कर्मचा-यांच्या खाते चौकशी कामी संस्थानने १९९२ पासून अॅड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. परंतु त्यांचे वयोमान व आरोपांचे स्वरुप विचारात घेता सदर खाते चौकशीकामी स्वंतंत्र चौकशी अधिकारी पदी सोबतचे परिशिष्ट 'अ' मधील संस्थानचे अॅडव्होकेट पॅनेलवर असलेल्या अॅडव्होकेट्स पैकी एका अॅडव्होकेटची नेमणूक करता येईल त्यांचे मदतीसाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉ. अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ यांची मदत घेता येईल. खाते चौकशीत डॉ. रामायणम व्यंकट प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांना सादरकर्ते अधिकारी म्हणून काम करता येईल.

अशाप्रकारचा प्रस्ताव यापूर्वी दि. ०९.१२.२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर विषय नं. १७ निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. १०३६ प्रमाणे सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय झालेला आहे की, डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्ट यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन खाते चौकशी स्थगित होण्यासाठी अर्ज केलेला आहे, त्या अर्जावर निकाल होईपावेतो, सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.

सदर प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपिठ, औरगाबाद यांनी खाते चौकशी स्थगित ठेवणेबाबत कुठलाही आदेश पारीत केलेला नाही. अशा परिस्थितीत सदरची खाते चौकशी स्थगित ठेवणे कायदेशिररित्या योग्य होणार नाही.

तरी सदर प्रकरणी वर नमुद केल्याप्रमाणे खाते चौकशीकामी स्वतंत्र चौकशी अधिकारी पदी सोबतचे परिशिष्ट 'अ 'मधील संस्थानचे अॅडव्होकेट पॅनेलवर असलेल्या अॅडव्होकेट्स पैकी एका अॅडव्होकेटची नेमणूक करता येईल त्यांचे मदतीसाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉ. अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ, नाशिक यांची मदत घेता येईल. खाते चौकशीत डॉ. रामायणम व्यंकट प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांना सादरकर्ते अधिकारी म्हणून काम करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेकामी फेरसादर.

**निर्णय क्र.१४८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन समितीने असा निर्णय घेतला की, चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रक्कम रु.५,०००/- मात्र प्रवास भत्ता व आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत, चौकशी अधिकारी यांना सदरहू चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस रक्कम रु.७,५००/- मात्र देण्यात यावेत. परंतु पुढे असेही ठरले की, त्यांना मानधनापोटी जास्तीत जास्त २० तारखांचे प्रत्येकी रु.७,५०० प्रमाणे एकंदर रु.१,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही. २० तारखांपेक्षा जास्त तारखा चौकशी कामी पडल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तारखेस त्यांना फक्त प्रवास भत्ता व आहार भत्ता व इतर खर्चापोटी रु.५,०००/- मात्र देण्यात येतील. त्रीसदस्यीय समितीने पुढे असेही ठरवले की, चौकशी अधिकारी म्हणून निवृत्त सरकारी अधिकारी किंवा निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नेमणुक करावी व त्यांचेकडे प्रथम उपरोक्तप्रमाणे मानधन व खर्च देण्यास संस्थान तयार आहे, असे सांगून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहेत काय, अशी विचारणा करावी व इच्छुक असल्यास संबंधिताकडून तसे लेखी संमती पत्र घेण्यात घ्यावे.**

**त्याच प्रमाणे सहायक तज्ञ म्हणून डॉ.अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ, नाशिक यांची नेमणुक करण्यात यावी, असे दि.२६/०४/२०१५ चे सभेमध्ये निर्णय क्र. १४० अन्वये ठरवण्यात आलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी तज्ञ सहायकाची जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हाच त्यांना पाचारण करावे व त्यांनी भाग घेतलेल्या चौकशीच्या प्रत्येक तारखेस तज्ञ सहाय्यकास वरील प्रमाणे प्रत्येक तारखेस रु.५,०००/- मात्र प्रवास खर्च, आहार भत्ता व इतर खर्चापोटी आणि मानधन म्हणून रु.७,५००/- मात्र देण्यात यावे. डॉ.धर्माधिकारी, नाशिक यांना तसे कळवावे व त्यांनी सहमती दर्शविल्यास त्यांचे लेखी संमती पत्र घ्यावे. जर ते अनुच्छूक असतील तर दुस-या तज्ञ सहायकाची नेमणूक करण्यात यावी, असे एकमताने ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.१४९** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** साईभक्तांच्या शिर्डी येथील भेटीत भाविकांना दर्शन व्यवस्था, विविध पास व्यवस्था याबाबत पुरेशी माहिती सहजरित्या उपलब्ध होत नसलेने खाजगी एजंट (पॉलीसीवाले) यांचेकडून त्रास होत असलेबाबत तक्रारी येत आहेत. याचा विचार करुन संस्थानने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

साईभक्तांच्या सोयीसाठी दर्शन व्यवस्था, पास व्यवस्था, संस्थानची निवास/ भोजन व्यवस्था, प्रसाद व्यवस्था व अन्य सर्व सुविधांबाबत सुलभतेने माहिती उपलब्ध करणेसाठी संस्थानने मंदिर व शहर परिसरात विविध भागात सहज समजेल अशा पध्दतीने फलक लावावेत, ज्यायोगे भक्तांची फसवणूक होणार नाही. तसेच संस्थानच्या वेबसाईटवरही याबाबत सुलभ अशा प्रकारची माहिती प्रदर्शित करावी.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.१४३ ते १४९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-**xxx** | स्वाक्षरित/- **xxx** | स्वाक्षरित/- **xxx** |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी